सोलापूर तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | बुधवार, दि. २५ मार्च २०२६ | वर्ष - ३ रे | अंक ३४५ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# देशातील पहिला इच्छामृत्यू! हरीश राणाची प्राणज्योत मालवली

नवी दिल्ली: भारतात इच्छामृत्यूची परवानगी मिळवलेला पहिला व्यक्ती ठरलेल्या हरीश राणानं अखेरचा श्र्वास घेतला आहे. दिल्लीतील एम्समध्ये हरीश राणाची प्राणज्योत मालवली. २०१३ पासून तो कोमात होता. गेल्या १३ वर्षांपासून त्याला लाईफ सपोर्टवर ठेवण्यात आलं होतं.

३१ वर्षीय हरीश राणाला १४ मार्चला गाझियाबादमधील त्याच्या घरातून रुग्णालयात हलवण्यात आलं. त्याच्या ३ दिवस आधी, ११ मार्चला सर्वोच्च न्यायालयानं ऐतिहासिक निर्णय देत त्याला निष्क्रिय इच्छामृत्यूसाठी परवानगी दिली. हरीश राणा पंजाबच्या विद्यापीठात बीटेकचं शिक्षण घेत होता. २०१३ मध्ये तो चौथ्या मजल्यावरुन पडला. त्यामुळे त्याच्या

## १३ वर्षांपासूनच्या त्रासातून मुक्तता

डोक्याला गंभीर इजा झाली. तेव्हापासून हरीश राणा कोमात गेला. या कालावधीत त्याला अधूनमधून ऑक्सिजन सपोर्ट दिला जात होता.

रुग्णालयात दाखल केल्यानंतर हरीशला डॉक्टरांच्या देखरेखीखाली ठेवण्यात आलं. गेल्या ८ ते १० दिवसांपासून त्याचं अन्न-पाणी बंद होतं. रुग्णाला हळूहळू मृत्यू येईल अशा पद्धतीनं लाईफ सिस्टिम हटवा, अशा सूचना सर्वोच्च न्यायालयानं एम्सला दिल्या होत्या. ही संपूर्ण प्रक्रिया लागू करण्यासाठी डॉक्टर सीमा मिश्रा यांच्या नेतृत्वात एक विशेष वैद्यकीय पथक तयार करण्यात आलं. या पथकात न्युरोसर्जरी, ऑन्को-ऍनेस्थेशिया, पॅलिएटिव्ह मेडिसिन आणि मानसोपचार विभागाच्या तज्ज्ञांचा समावेश होता. भारतात पहिल्यांदाच एखाद्या व्यक्तीला इच्छामृत्यूची परवानगी देण्यात आली. त्यामुळे ही घटना सर्वार्थानं ऐतिहासिक ठरली.

एम्सला नेण्याआधी हरिश राणाच्या गाझियाबादमधील घरातील एका दृश्यानं सारेच भावुक झाले होते. हरीशला एम्समध्ये दाखल करण्यापूर्वी त्याच्या घरी ब्रह्मकुमारी संस्थेच्या महिला सदस्या आल्या होत्या. त्यांनी हरीश राणाच्या कपाळावर टिळा लावला. ते पाहून साऱ्यांचेच डोळे भरुन आले.



हरिशचा हा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाला होता. तो पाहून अनेकांच्या पापण्यांच्या कडा ओलावल्या.

# 'होर्मुझ सामुद्रधुनीत अडथळा अस्वीकार्य'

## लोकसभेत पंतप्रधान मोदींचा जगाला स्पष्ट संदेश

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पश्र्चिम आशियातील तणाव आणि युद्धस्थितीवर लोकसभेत महत्त्वपूर्ण निवेदन करताना होर्मुझ सामुद्रधुनी मधील अडथळा कोणत्याही परिस्थितीत मान्य नसल्याचे ठामपणे सांगितले.

पश्र्चिम आशियातील परिस्थिती चिंताजनक असल्याचे नमूद करत पंतप्रधान मोदी म्हणाले की, त्या भागात सुमारे १ कोटी भारतीय राहतात आणि कार्यरत आहेत. या मुद्द्यावर देशात सर्वपक्षीय एकमत असणे अत्यंत गरजेचे आहे. त्यांनी विविध देशांच्या नेत्यांशी संवाद साधल्याची माहितीही यावेळी दिली.

युद्ध सुरू झाल्यापासून आतापर्यंत ३.७५ लाखांहून अधिक भारतीयांना सुरक्षितपणे परत आणण्यात आले असून, इराण मधून सुमारे १,००० भारतीयांना परत आणले गेले आहे. यामध्ये अनेक वैद्यकीय विद्यार्थ्यांचा समावेश आहे.

होर्मुझ सामुद्रधुनीचे महत्त्व अधोरेखित करत पंतप्रधान म्हणाले की, भारतात येणाऱ्या कच्च्या तेलाचा, गॅसचा, खतांचा आणि इतर ऊर्जा स्त्रोतांचा मोठा हिस्सा या मार्गावर अवलंबून आहे. युद्धामुळे जहाजांच्या हालचालींमध्ये अडचणी निर्माण झाल्या असल्या तरी देशातील इंधनपुरवठ्यावर परिणाम होऊ नये यासाठी सरकार प्रयत्नशील आहे.

भारत आपल्या एलपीजी गरजांपैकी सुमारे



६० टक्के आयातीवर अवलंबून असल्याचे सांगत त्यांनी घरगुती ग्राहकांना प्राधान्य देण्याचा निर्णय घेतल्याचे स्पष्ट केले. तसेच देशांतर्गत उत्पादन वाढवण्यावरही भर दिला जात असल्याचे मोदींनी सांगितले.

पंतप्रधान मोदी यांनी स्पष्ट इशारा देत म्हटले की, आंतरराष्ट्रीय जलमार्गात अडथळे निर्माण करणे, व्यापारी जहाजांवर हल्ले करणे आणि ऊर्जा पायाभूत सुविधांवर आघात करणे अस्वीकार्य आहे. भारत नेहमीच शांतता आणि संवादाच्या बाजूने उभा राहिला असून, कूटनीतीच्या माध्यमातून तणाव कमी करण्याचे प्रयत्न सुरू असल्याचे त्यांनी सांगितले.

या युद्धाचा परिणाम दीर्घकालीन राहू शकतो, त्यामुळे देशाने एकजूट राखणे आवश्यक असल्याचेही त्यांनी अधोरेखित केले. चुकीची माहिती पसरवणाऱ्यांपासून सावध राहण्याचे आवाहन करत त्यांनी सांगितले की, भारत सर्व संबंधित देशांशी संपर्क ठेवून परिस्थितीवर लक्ष ठेवत आहे.

# इस्रायलचा तेहरानमधील रुग्णालयावर हल्ला

**तेहरान/वृत्तसंस्था :** अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणवरील हल्ले पाच दिवस थांबवण्याची घोषणा केली असतानाही इस्रायल आणि अमेरिकन सैन्याने तेहरानमधील एका रुग्णालयाला लक्ष्य केल्याचा दावा करण्यात आला आहे. इराणच्या एका वृत्तवाहिनीने दिलेल्या माहितीनुसार, तेहरानच्या नैऋत्येकडील एंडीमेश्कक शहरातील इमाम अली रुग्णालयावर अमेरिका आणि इस्रायलने थेट हल्ला केला. या हल्ल्यात रुग्णालयाचे मोठे नुकसान झाले आहे. या थेट हल्ल्यानंतर रुग्णालय पूर्णपणे रिकामे करण्यात आले असून सध्या ते सेवाबाह्य झाले आहे.

वृत्तवाहिनीने रुग्णालयातील नुकसानीचा व्हिडिओही प्रसिद्ध केला आहे. या व्हिडिओमध्ये ओपीडी, आयपीडी आणि आपत्कालीन विभागांच्या इमारतींचे मोठे नुकसान झाल्याचे दिसत आहे. हे शहरातील एकमेव प्रमुख रुग्णालय असल्याने हल्ल्यानंतर रुग्णांना तातडीने इतर शहरांतील रुग्णालयांमध्ये हलवण्यात आले. रुग्णालयाची इमारत, वैद्यकीय उपकरणे, प्रयोगशाळा आणि कॉरिडॉरमध्ये मोठ्या प्रमाणात विध्वंस झाल्याचे दिसून आले. अलीकडील काळात इराणवर झालेल्या अमेरिका-इस्रायल संयुक्त हल्ल्यांच्या मालिकेतील हा एक भाग असल्याचे सांगितले जात आहे, ज्यामध्ये खुजेस्तान प्रांतातील एंडीमेश्कक परिसराला लक्ष्य करण्यात आले.

इराणच्या आरोग्य मंत्रालयाचे प्रवक्ते होसैन करमानपूर यांच्या हवालीने वृत्तवाहिनीने म्हटले आहे की, हवाई हल्ल्यात रुग्णालयाचे गंभीर नुकसान झाले आहे. इराणी सरकारने या घटनेला युद्धगुन्हा घोषित केले आहे. रुग्णालयात दाखल रुग्णांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागला असून उपचार व्यवस्था विस्कळीत झाली आहे. आतापर्यंत मोठ्या जीवितहानीची अधिकृत पुष्टी झालेली नसली तरी एका बालकाच्या मृत्यूची बातमी समोर आली आहे.इराणी माध्यमे आणि सरकारी सूत्रांनी या हल्ल्याचा निषेध करत नागरी आरोग्य सुविधांना लक्ष्य करणे हे आंतरराष्ट्रीय कायद्याचे उल्लंघन असल्याचे म्हटले आहे. स्थानिक नागरिकांमध्ये संतापाची भावना असून परिसरात तणावपूर्ण परिस्थिती कायम आहे.

# अन्य धर्म स्वीकारल्यास एससी-एसटी दर्जा होणार रद्द; सर्वोच्च न्यायालयाचा मोठा निर्णय



**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** सर्वोच्च न्यायालयाने एससी-एसटी अधिनियमासंदर्भात आज, मंगळवार २४ मार्च रोजी मोठा निर्णय दिला आहे. न्यायालयाने स्पष्ट केले की, जो व्यक्ती हिंदू, शीख किंवा बौद्ध धर्मापेक्षा वेगळा धर्म स्वीकारतो, त्याला अनुसूचित जातीचे सदस्य मानले जाणार नाही.

यासंदर्भात सर्वोच्च न्यायालयाने सांगितले की, अन्य धर्म स्वीकारल्यास अनुसूचित जातीचा दर्जा तत्काळ आणि पूर्णपणे संपतो. जस्टिस पी. के. मिश्रा आणि जस्टिस एन. व्ही. अंजारिया यांच्या खंडपीठाने हे ठरवले की धर्मांतर केल्याने एससी दर्जा संपतो. कोर्टाने नमूद केले की, संविधान (अनुसूचित जाती) आदेश, १९५० मध्ये ही बाब स्पष्ट करण्यात आली आहे आणि या आदेशाअंतर्गत लागू केलेली अट पूर्णपणे वैध आहे. १९५० च्या आदेशातील कलम ३ मध्ये नमूद धर्मांशिवाय कोणताही धर्म स्वीकारल्यास जन्मानुसार अनुसूचित जातीचा दर्जा तत्काळ संपतो.

न्यायालयाने असेही सांगितले की, कलम ३ अंतर्गत अनुसूचित जातीचा सदस्य न असलेला व्यक्ती संविधान, संसद किंवा राज्य विधानमंडळाद्वारे तयार केलेल्या कोणत्याही कायद्यांतर्गत कोणताही लाभ, सुरक्षा, आरक्षण किंवा अधिकार मागू शकत नाही, आणि त्याला ते लाभ देणेही शक्य नाही. ही अट पूर्णपणे लागू होते व यामध्ये कोणताही अपवाद नाही.

आंध्र प्रदेश उच्च न्यायालयाचा आधीचा निर्णय योग्य असल्याचे सर्वोच्च न्यायालयाने मान्य केले, ज्यामध्ये म्हटले होते की, जो व्यक्ती ख्रिश्र्चन धर्म स्वीकारतो आणि त्याचे सक्रिय पालन करतो, त्याचा अनुसूचित जातीचा दर्जा कायम राहू शकत नाही.

# सहकार क्षेत्र अधिक गतिमान करण्यासाठी लवकरच सर्वसमावेशक नवे सहकार धोरण: बाबासाहेब पाटील

**तभा वृत्तसेवा**

**मुंबई, दि. २४ मार्च :** सहकार क्षेत्र हे सामाजिक, आर्थिक परिवर्तनाचे मॉडेल आहे. राज्यातील सहकार क्षेत्र अधिक सक्षम, पारदर्शक आणि गतिमान करण्यासाठी लवकरच सर्वसमावेशक नवे सहकार धोरण आणण्यात येणार असल्याचे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी विधान परिषदेत अल्पकालीन चर्चेला उत्तर देताना सांगितले. सदस्य प्रवीण दरेकर यांनी म.वि.प. नियम ९७ अन्वये या विषयी विधान परिषदेत अल्पकालीन चर्चा उपस्थितीत केली होती.

सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी अल्पकालीन चर्चेला उत्तर देताना सहकार क्षेत्राच्या कामगिरीचा आढावा घेत, भविष्यातील सुधारणा आणि नव्या उपक्रमाबाबत माहिती दिली. ते म्हणाले नव्या सहकार धोरणासाठी १५ सदस्यीय समिती स्थापन करण्यात आली आहे, मुंबई, नागपूरसह राज्यातील विविध विभागांत बैठका घेऊन तज्ज्ञ, अनुभवी कार्यकर्ते आणि नव्या पिढीच्या सूचनांचा समावेश केला जाणार आहे. या धोरणातून पारदर्शकता, कार्यक्षमता आणि शाश्र्वत विकासाला प्राधान्य दिले जाईल, असेही सहकार मंत्री पाटील यांनी सांगितले.

सहकार मंत्री बाबासाहेब पाटील म्हणाले, राज्यातील सहकारी चळवळ ही ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा आहे. राज्यात सुमारे २.३३ लाख सहकारी संस्था कार्यरत आहेत. शिखर संस्था, जिल्हा मध्यवर्ती बँका, प्राथमिक कृषी पतसंस्था, नागरी बँका, साखर कारखाने आणि गृहनिर्माण संस्था अशा संस्थांच्या विस्तृत जाळ्यामुळे सहकार क्षेत्राने राज्याच्या आर्थिक विकासात मोलाचा वाटा उचलला आहे.

सहकार मंत्री पाटील म्हणाले, विविध योजनांच्या माध्यमातून राज्य शासन सहकार क्षेत्राला बळ देण्यासाठी काम करत आहे.जिल्हा बँकांना व्याज अनुदान, प्राथमिक संस्थांना अनुदान आणि पीक कर्जाची नियमित परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना व्याज परतावा दिला जात आहे. सहकारी संस्थांचे संगणकीकरण, साखर कारखान्यांसाठी मार्जिन मनी व कर्ज योजना, तसेच एनसीडीसीमार्फत



विविध प्रकल्पांना वित्तपुरवठा अशा उपक्रमांमुळे ग्रामीण भागातील उद्योगांना चालना मिळत असल्याचे त्यांनी सांगितले.

सहकार मंत्री बाबासाहेब पाटील म्हणाले, राज्यात १२८ सहकारी आणि १३४ खाजगी साखर कारखाने कार्यरत असून एफआरपी नियमांमुळे शेतकऱ्यांना संरक्षण मिळाले आहे. साखर उद्योग अधिक सक्षम करण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर वाढविण्यावर भर दिला जात आहे. वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूटच्या माध्यमातून अत्याधुनिक यंत्रे उपलब्ध करून देण्यात येत असून, त्याद्वारे शेतकऱ्यांना थेट शेतातच मार्गदर्शन मिळणार आहे. यामुळे उत्पादनक्षमता वाढण्यास आणि गळीत हंगामाचा कालावधी वाढण्यास मदत होणार आहे.

मंत्री पाटील म्हणाले, अडचणीत आलेल्या काही जिल्हा सहकारी बँकांना आर्थिक मदत देण्यात येत असून, गृहनिर्माण संस्थांच्या पुनर्विकासालाही गती देण्यात आली आहे. स्वयंपूर्ण विकासासाठी तक्रार निवारण यंत्रणा आणि निर्णय प्रक्रियेतील गती वाढविण्यात आली आहे. दुग्ध, मत्स्यव्यवसाय आणि इतर पूरक क्षेत्रांनाही सहकाराच्या माध्यमातून चालना दिली जात आहे. रोजगार निर्मितीसाठी सहकार चळवळ भविष्यात अधिक महत्त्वाची ठरणार आहे. पारदर्शकता, कार्यक्षमता आणि शाश्र्वत विकास यांना प्राधान्य देत सहकार क्षेत्र अधिक बळकट करण्यासाठी शासन कटिबद्ध असल्याचा विश्र्वास त्यांनी व्यक्त केला.

## गडचिरोलीतही इंजिनिअरिंगचे धडे

**तभा वृत्तसेवा**

**मुंबई, दि. २४ मार्च :** गडचिरोली जिल्ह्यातील विद्यार्थ्यांसाठी तांत्रिक शिक्षणाची दारे अधिक रुंदावण्यासाठी राज्य सरकारने कंबर कसली आहे. शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासून गोंडवाना विद्यापीठात 'अभियांत्रिकी पदवी' अभ्यासक्रम सुरू करण्याच्या दृष्टीने पावले उचलली असून, त्यासाठी अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेकडे अधिकृत अर्ज करण्यात आला आहे. उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी आज विधान परिषदेत प्रश्नोत्तराच्या तासात ही महत्त्वाची माहिती दिली.

# भोंदूबाबा अशोक खरातला २९ मार्चपर्यंत पोलीस कोठडी

**तभा वृत्तसेवा**

**नाशिक, दि. २४ मार्च :** नाशिकमध्ये गाजत असलेल्या महिला लैंगिक अत्याचार प्रकरणात आरोपी अशोक खरात याला न्यायालयाने २९ मार्चपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. कोठडीची मुदत संपल्यानंतर आज त्याला न्यायालयात हजर करण्यात आले होते. तपासासाठी अधिक वेळ आवश्यक असल्याचे सांगत सरकारी पक्षाने कोठडी वाढवण्याची मागणी केली होती, जी न्यायालयाने मान्य केली.

खरातला न्यायालयात आणण्यापूर्वी त्याची जिल्हा रुग्णालयात वैद्यकीय तपासणी करण्यात आली. त्यानंतर कडेकोट पोलीस बंदोबस्तात त्याला कोर्टात



हजर करण्यात आले. प्रकरणाच्या संवेदनशीलतेमुळे न्यायालय परिसरात मोठ्या प्रमाणात पोलीस तैनात करण्यात आले होते. सुनावणीदरम्यान वकिलांचीही मोठी उपस्थिती पाहायला मिळाली. सुनावणीदरम्यान एसआयटी अधिकारी किरणकुमार सूर्यवंशी यांनी तपासातील महत्त्वाची माहिती न्यायालयासमोर मांडली. आरोपी महिलांना खडे, पेढे देत असे तसेच पाण्यात काही पदार्थ मिसळून देत असे, ज्यामुळे त्या अस्वस्थ होत आणि त्यानंतर त्यांचे शोषण केले जात असल्याचा गंभीर आरोप करण्यात आला.

तपासात आरोपीकडून मोठी रोकड, लॅपटॉप, तसेच एक रिव्हॉल्व्हर आणि काडतुसे जप्त करण्यात आल्याची माहितीही देण्यात आली. काही काडतुसे वापरले गेल्याचा संशय असून त्याचा तपास सुरू आहे. तसेच नरबळी दिल्याचाही संशय व्यक्त करण्यात आला.

अशोक खरात स्वतःला 'सिद्ध पुरुष' सांगत लोकांची फसवणूक करत असल्याचा आरोप आहे. भीती निर्माण करण्यासाठी साप, वाघ यांचा वापर केला जात होता. तसेच कस्तुरीसारख्या वस्तूंचा वापर करून वन्यजीव कायद्याचे उल्लंघन झाल्याचाही संशय व्यक्त करण्यात आला.बचाव पक्षाने सात दिवसांत पुरेसा तपास झाल्याचा दावा करत पुढील पोलीस कोठडीची गरज नसल्याचे सांगितले. आवश्यक पुरावे आधीच जप्त झाले असून पुढील तपास न्यायालयीन कोठडीतही होऊ शकतो, असा युक्तिवाद करण्यात आला.

सरकारी वकिलांनी मात्र प्रकरणाची व्याप्ती मोठी असल्याचे सांगत पुढील तपासासाठी पोलीस कोठडी आवश्यक असल्याचे स्पष्ट केले. आर्थिक व्यवहार, कथित धार्मिक विधी आणि इतर बाबींचा तपास अद्याप बाकी असल्याचे त्यांनी नमूद केले.सुनावणीदरम्यान न्यायाधीशांनी विचारल्यानंतर अशोक खरातने साप आणि वाघ याबाबत आपल्याला कोणतीही माहिती नसल्याचे सांगितले. तसेच मंदिरात तो अधूनमधून जात असल्याचेही त्याने नमूद केले. एकूणच, गंभीर आरोप आणि तपासातील नव्या बाबी लक्षात घेता न्यायालयाने आरोपीला २९ मार्चपर्यंत पोलीस कोठडी सुनावली असून या प्रकरणात आणखी धक्कादायक खुलासे होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

## थोडक्यात...

### एअर इंडिया ३० उड्डाणे करणार

नवी दिल्ली : अमेरिका आणि इस्रायलने इराणवर केलेल्या हल्ल्यांनंतर, अनेक विमान कंपन्यांना पश्र्चिम आशियाई देशांमधील आपली उड्डाणे रद्द करावी लागली होती. पण, आजपासून एअर इंडिया आणि एअर इंडिया एक्सप्रेसने पश्र्चिम आशिया (मुख्यतः सौदी अरेबिया आणि संयुक्त अरब अमिराती) येथून ये-जा करण्यासाठी एकूण ३० अनुसूचित आणि अनियोजित उड्डाणे सुरु करण्याची घोषणा केली आहे. ही माहिती विमान कंपन्यांनी एका अधिकृत निवेदनात दिली असून, प्रवाशांना पुनर्बुकिंग आणि परताव्याचे पर्यायही उपलब्ध करून दिले आहेत.संघर्षाच्या पार्श्र्वभूमीवर, एअर इंडियाने गेल्या तीन आठवड्यांत पश्र्चिम आशियातील सुमारे २,५०० उड्डाणे रद्द केली आहेत. या सुरक्षा उपायांमुळे एअरलाईनची परिचालन क्षमता ३० टक्क्यांपर्यंत खाली आली आहे. इंधनाच्या किमती दुपटीने वाढल्याने हा निर्णय घेण्यात आला आहे.

### एनआयएची छापेमारी

श्रीनगर : दिल्लीतील लाल किला स्फोट प्रकरणाच्या तपासात राष्ट्रीय जांच एजेंसी (एनआयए) ने पहाटे काश्मीर खोऱ्यात मोठी कारवाई करत एकूण १२ ठिकाणी छापेमारी केली. या कारवाईत हंदवाडा, कुपवाडा, कुलगाम, रफियाबाद आणि सोपोर या भागांचा समावेश होता. हंदवाडा जिल्ह्यातील गुलोरा परिसरात एका मोठ्या व्यावसायिकाच्या घरावर एनआयएच्या पथकाने छापा टाकला. अधिकाऱ्यांनी संबंधित ठिकाणी सखोल झडती घेत कागदपत्रे, इलेक्ट्रॉनिक उपकरणे आणि इतर संशयास्पद साहित्याची तपासणी केली. सूत्रांच्या माहितीनुसार, पथकाने पहाटेच कारवाई सुरू केली होती.

### लेबर कोड होणार लागू

मुंबई: १ एप्रिल २०२६ पासून नवीन आर्थिक वर्षाच्या सुरुवातीसोबतच नोकरदारवर्गाच्या आयुष्यात मोठे बदल होणार आहेत. सरकार नवीन इनकम टॅक्स ॲक्ट २०२५ आणि लेबर कोड लागू करणार आहे. हे नियम लागू झाल्यानंतर पगार रचना, हातामध्ये येणारा पगार आणि निवृत्ती निधी यावर थेट परिणाम होईल. नवीन लेबर कोडमधील सर्वात मोठा बदल बेसिक सॅलरीबाबत आहे. नवीन नियमांनुसार, कोणत्याही कर्मचाऱ्याचा मूळ पगार त्याच्या एकूण सीटीसीच्या (उढउ) किमान ५० टक्के असणे आवश्यक आहे. सध्या अनेक कंपन्या कर वाचवण्यासाठी मूळ पगार कमी ठेवतात आणि एचआरए (कठ-), ट्रॅव्हल अलाउन्स आणि स्पेशल अलाउन्स यासारखे भत्ते ७० ते ८० टक्क्यांपर्यंत वाढवतात. आता नवीन नियमानंतर, सर्व भत्ते एकूण पगाराच्या ५० टक्क्यांपेक्षा जास्त असू शकत नाहीत.

### युरोपियन स्पेस भेटीची संधी

पुणे : इस्रो आणि नासा भेटीचा उपक्रम यशस्वी ठरल्यानंतर जिल्हा परिषदेचे विद्यार्थी आता आणखी मोठी झेप घेणार आहेत. पुढील वर्षात विद्यार्थ्यांना युरोपियन स्पेस सेंटरची भेट देण्याची संधी मिळणार आहे. बेल्जियममधील युरोपियन स्पेस सेंटरला २५ विद्यार्थी पाठविण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला आहे. त्यामुळे यावर्षी परदेशातील अंतराळ संशोधन संस्थांना भेट देणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या ५० वर जाणार आहे. जिल्हा परिषदेकडून सध्याच्या शैक्षणिक वर्षात नासा आणि इस्रोला विद्यार्थी पाठविण्याचा पहिल्यांदाच उपक्रम राबविण्यात आला.

### पदोन्नतीचा मार्ग मोकळा

मुंबई : ठाणे महानगरपालिकेतील 'गट ड' श्रेणीतील कर्मचाऱ्यांच्या पदोन्नतीबाबत प्रदीर्घ काळापासून प्रलंबित असलेला प्रश्र्न आता मार्गी लागणार आहे. या कर्मचाऱ्यांच्या पदोन्नतीसाठी असलेली पाच वर्षांची अट शिथिल करून ती तीन वर्षे करण्याबाबत राज्य शासन सकारात्मक असल्याची माहिती मंत्री उदय सामंत यांनी आज विधान परिषदेत दिली. आमदार ड. निरंजन डावखरे यांनी नियम ९७ अन्वये उपस्थित केलेल्या अल्पकालीन चर्चेला उत्तर देताना ते बोलत होते. उदय सामंत यांनी सभागृहात माहिती दिली की, पदोन्नतीसाठीचा हा विषय मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याशी सविस्तर चर्चिला गेला आहे. सध्या कल्याण-डोंबिवली, नवी मुंबई आणि अकोला महानगरपालिकांमध्ये पदोन्नतीसाठी तीन वर्षांचा निकष लागू आहे. याच धर्तीवर ठाणे महानगरपालिकेतही तीन वर्षांची नियमित सेवा पूर्ण केलेल्या आणि आवश्यक पात्रता असलेल्या कर्मचाऱ्यांना 'वर्ग ३' मध्ये पदोन्नती देण्यासाठी शासन सकारात्मक आहे.

# गर्भपिशवीच्या शस्त्रक्रियेनंतर गेली महिलेची दृष्टी डॉ. किल्लारीकर यांच्यावर कारवाईची मागणी





**तभा वृत्तसेवा**

**पैठण, दि. २४ मार्च :** वर्षं ही न उलटता पैठण लगत पाचोड रोडवर महेश चौक परिसरात उघडलेल्या डॉ पंडित किल्लारीकर यांच्या संत एकनाथ सहकारी मल्टीस्पेशालिटी रुग्णालयात एका गरीब महिलेच्या गर्भपिशवीवर शस्त्रक्रिया केल्यानंतर त्या महिलेची दृष्टीच गेल्याचे समोर आले असून या घटनेनंतर महिलेच्या पतीने डॉ पंडित किल्लारीकर यांच्यावर कारवाई करावी अशी तक्रार पैठण पोलिसांत केली आहे.

पैठण येथील संत एकनाथ सहकारी (मल्टीस्पेशालिटी) रुग्णालयातील उपचारादरम्यान वैद्यकीय निष्काळजीपणा झाल्याचा आरोप करत विनोदकुमार भारद्वाज यांनी उपविभागीय पोलीस अधिकारी, पैठण यांच्याकडे लेखी तक्रार दाखल केली आहे. संबंधित डॉक्टरांवर कठोर कारवाई करण्याची मागणी त्यांनी केली आहे. तक्रारीनुसार, भारद्वाज हे गेल्या २२ वर्षांपासून पैठण येथे वास्तव्यास असून पेंटिंगचे काम करून उदरनिर्वाह करतात. त्यांच्या पत्नी ममता यांना ओटीपोटात त्रास होत असल्याने प्रथम स्थानिक डायग्नोस्टिक सेंटरमध्ये तपासणी करण्यात आली. त्यानंतर त्यांना संत एकनाथ सहकारी रुग्णालयात दाखल करण्यात आले. रुग्णालयात उपचारादरम्यान दोन दिवस रक्त देण्यात आल्यानंतर २२ फेब्रुवारी २०२६ रोजी गर्भाशय काढण्याची शस्त्रक्रिया करण्यात आल्याचे तक्रारीत नमूद आहे. मात्र, शस्त्रक्रियेनंतर रुग्ण शुद्धीवर आल्यानंतर तिची दोन्ही डोळ्यांची दृष्टी गेल्याचे निदर्शनास आल्याचा आरोप तक्रारदाराने केला आहे.

या घटनेनंतर संबंधित डॉक्टरांनी प्रथम इतर रुग्णालयात पाठवून नंतर तातडीने छत्रपती संभाजीनगर येथील खासगी रुग्णालयात हलविण्यात आल्याचे तक्रारीत म्हटले आहे.

डॉ किल्लारीकर यांच्या या दवाखाण्यात महिलेला दोन दिवस अँडमिट करून त्यांच्या गर्भाशयाची पिशवी काढण्यात आली. शुद्धीवर आल्यानंतर या महिलेला दोन्ही डोळ्यांनी दिसत नसल्याचे लक्षात येताच येथील डॉक्टर मंडळींची धांदल उडाली त्यांनी स्वखर्चाने महिलेला आगोदर जवळच्या दुसऱ्या दवाखान्यात दाखवले नंतर थेट छत्रपती संभाजीनगर येथील एका खासगी रुग्णालय महिलेला पाठवण्यात आले. तेथील रुग्णालयाचा पूर्ण खर्च आम्ही करू असे महिलेच्या पतीला डॉक्टरांनी सांगितले सोबत आपल्या दवाखाण्याचे दोन कर्मचारी दिले. आणि काही पैसे ही महिलेच्या पतीला देण्यात आले.पुढे महिलेच्या पतीला पत्नीचा उपचारासाठी संभाजीनगर येथील दवाखाण्याचे मोठे बिल आले.ज्या डॉक्टरांनी सांगितले आम्ही बिल भरू त्यांनी हात वर केले. पत्नीची दृष्टी ही गेली.आता या गरीब व्यक्तीने डॉ पंडित किल्लारीकर यांच्यावर कारवाईची केली आहे.



**कोण आहेत डॉ पंडित किल्लारीकर.**

गर्भाशयाच्या शस्त्रक्रियेनंतर महिलेच्या पतीने कारवाईची मागणी केलेले डॉ पंडित किल्लारीकर हे पैठणचे प्रसिद्ध डॉक्टर असून गेल्या पंचविस ते तीस वर्षांपासून ते पैठणच्या शासकीय ग्रामीण आरोग्य पथक याठिकाणी कार्यरत आहेत. तसेच ग्रामीण आरोग्य पथक शासकीय रुग्णालयाच्या शेजारी यांचे पंकज हॉस्पिटल नावाचे मोठे हॉस्पिटल आहे.आता मागील एप्रिल महिन्यात त्यांनी आरोग्यसेवेसाठी पैठण लगत पाचोड रोडवर संत एकनाथ सहकारी मल्टीस्पेशालिटी रुग्णालय उघडले.

## सोयगाव; श्री पंचमुखी हनुमान मूर्ती प्राणप्रतिष्ठा व पंचकुंडात्मक रुद्रयाग सोहळा उत्साहात

**तभा वृत्तसेवा**

**सोयगाव, दि. २४ मार्च :** शहरातील संत ज्ञानेश्र्वर महाविद्यालय सोयगाव येथे श्री पंचमुखी हनुमान मूर्ती प्राणप्रतिष्ठा व पंचकुंडात्मक रुद्रयाग सोहळ्याचे आयोजन दि. २४ मार्च २०२६ ते २७ मार्च २०२६ या कालावधीत करण्यात आले आहे.

या भव्य धार्मिक सोहळ्याचे आयोजन रंगनाथ नाना काळे व ज्योतीताई काळे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले असून परिसरात भक्तीमय वातावरण निर्माण झाले आहे.

चार दिवसीय या सोहळ्यात विविध धार्मिक विधी, पूजापाठ,हवन,अभिषेक,वेदघोष तसेच प्रवचन व किर्तन कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.दि. २४ मार्च रोजी मंगल कलश स्थापना,गणेश पूजन व



प्रारंभिक विधींनी कार्यक्रमाची सुरुवात होणार आहे.

दि. २५ व २६ मार्च रोजी विविध देवतांची पूजा, रुद्रयाग, मंत्रोच्चार व धार्मिक विधी पार पडणार असून भाविकांना आध्यात्मिक अनुभव घेण्याची संधी मिळणार आहे.

सोहळ्याचा मुख्य दिवस दि.२७ मार्च असून या दिवशी प्राणप्रतिष्ठा,कलशारोहण,महाअभिषेक व महाआरती असे प्रमुख कार्यक्रम होणार आहेत.तसेच भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.

कार्यक्रमाची वेळ दररोज रात्री ८ ते ११ अशी ठेवण्यात आली असून विविध मान्यवर, कीर्तनकार व प्रवचनकार यांची उपस्थिती लाभणार आहे.

या धार्मिक सोहळ्याच्या यशस्वी आयोजनासाठी आयोजक, समिती सदस्य व स्वयंसेवक परिश्रम घेत असून सर्व भाविकांनी उपस्थित राहून या पुण्यसोहळ्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

## स्कोडाची अद्ययावत ‘कुशाक’ लाँच



**तभा वृत्तसेवा**

**छत्रपती संभाजीनगर, दि. २४ मार्च :** स्कोडा ऑटो इंडियाने अद्ययावत ‘कुशाक’चे लाँच करत ईजी टू लव्ह या संकल्पनेअंतर्गत मूल्य, कामगिरी आणि सुरक्षिततेची नव्याने व्याख्या केली आहे. नव्या कुशाकच्या किमती जाहीर करत ग्राहकांना डिलिव्हरीलाही सुरुवात करण्यात आली आहे. १.० टीएसआय आणि १.५ टीएसआय इंजिन पर्यायांसह ही एसयूव्ही क्लासिक प्लस, सिग्नेचर, स्पोर्टलाइन, प्रेस्टीज आणि मोंटे कार्लो अशा पाच ट्रिम्समध्ये उपलब्ध आहे. आठ-स्पीड ऑटोमॅटिक ट्रान्समिशन, रिअर सीट मसाजर यांसारखी सेगमेंट-फर्स्ट वैशिष्ट्ये आणि ५-स्टार सुरक्षितता यामुळे ही गाडी विशेष ठरते.

स्कोडा ऑटो इंडियाचे ब्रँड संचालक आशिष गुप्ता म्हणाले, युरोपियन तंत्रज्ञान सर्वांसाठी सुलभ करणे हा आमचा मुख्य फोकस आहे. नवीन कुशाकमधून आम्ही मूल्याची पुनर्व्याख्या करत स्पर्धात्मक किंमत, उन्नत सुरक्षा आणि उत्कृष्ट कामगिरी एकत्रित दिली आहे. सेगमेंटमधील नावीन्यपूर्ण फीचर्समुळे प्रत्येक व्हेरिएंटमध्ये ग्राहकांना अधिक मूल्य मिळेल.

## जागतिक ग्राहक दिन उत्साहात साजरा



**तभा वृत्तसेवा**

**खुलताबाद, दि. २४ मार्च :** ग्राहकांनी केवळ आपल्या हक्कांची जाणीव न ठेवता ग्राहक म्हणून आपली जबाबदारीने पार पाडणे तितकेच महत्त्वाचे आहे. जागरूक, सजग आणि जबाबदार ग्राहक हा सशक्त व सुदृढ समाजाचा पाया असतो, असे प्रतिपादन जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेचे अशासकीय सदस्य विजय चौधरी यांनी केले. ग्राहक संरक्षणाबाबत जनजागृती वाढविण्याच्या उद्देशाने अखिल भारतीय ग्राहक पंचायत व खुलताबाद तहसील कार्यालयाच्या वतीने 'जागतिक ग्राहक दिन' उत्साहात साजरा करण्यात आला. पंचायत समिती सभागृहात झालेल्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी तहसीलदार संतोष गुट्टे हे होते. परिविक्षाधीन उपजिल्हाधिकारी अंकिता ताकभाते, पुरवठा निरीक्षक राहुल खेडकर उपस्थित होते. यावेळी जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेचे अशासकीय सदस्य पत्रकार विजय चौधरी

यांच्या हस्ते स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून दीप्रज्वलन करून उद्घाटन करण्यात आले. प्रास्ताविक पुरवठा निरीक्षक राहुल खेडकर यांनी केले.

परिविक्षाधीन उपजिल्हाधिकारी अंकिता ताकभाते यांनी स्वस्त धान्य दुकानदारांनी पारदर्शकपणे काम करावे, असे आवाहन केले.

तहसीलदार संतोष गुट्टे म्हणाले की, ग्राहकांनी नेहमी जागरूक राहावे. विशेषत: पुरवठा विभाग अंतर्गत स्वस्त धान्य दुकानदारांनी ग्राहकांची तक्रार येणार नाही, याची अधिक दक्षता घ्यावी. ग्राहकांनी जागरूक सजग राहणे हि प्रत्येकाची जबाबदारी आहे. त्याचप्रमाणे, फसवणूक टाळण्यासाठी जागरूक राहणे आणि इतरांनाही जागरूक करणे हेही प्रत्येक ग्राहकाचे कर्तव्य आहे. कार्यक्रमाच्या शेवटी स्वस्त धान्य दुकानदार संघटनेचे अध्यक्ष छबु कांबळे यांनी आभार मानले.

## पंचायत समिती कार्यालय येथे शहीद दिना निमित्त वीर शहिदांना आदरांजली



**तभा वृत्तसेवा**

**सिल्लोड, दि. २४ मार्च :** २३ मार्च २०२६ सोमवार रोजी पंचायत समिती कार्यालय सिल्लोड येथे वीर शहीद भगतसिंग, सुखदेव, राजगुरू यांच्या प्रतिमेस मा. गटविकास अधिकारी वर्ग एक, पंचायत समिती, सिल्लोड रत्नाकर पगार यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून त्यांना कार्यालयाच्या वतीने मानवंदना देण्यात आली.

यावेळी सहाय्यक प्रशासन अधिकारी दिपक गावंदे, विस्तार अधिकारी (पंचायत) राधाकिसन चौधरी,साहेबराव शेळके,अण्णासाहेब गाडेकर, विस्तार अधिकारी (कृषी) जोगेंद्र अहिरराव, राजेंद्र लांडगे, विस्तार अधिकारी (सांख्यिकी) केवलसिंग पाटील, वरिष्ठ सहाय्यक राजेंद्र शेळके, गट समन्वयक स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) केशवकांत बुलबुले ,ग्रामपंचायत अधिकारी बन्सीधर पडूळकर, रमेश पवार, अनिल गव्हाणे, परिचर शोभा गाडेकर, वंदना थोरात तसेच यावेळी कार्यालयातील सर्व अधिकारी कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# वाढदिवसाचा खर्च समाजकार्यासाठी; प्रशांत वाघ यांच्या उपक्रमाचा आदर्श - खासदार संदीपान भुमरे

**तभा वृत्तसेवा**

**कन्नड, दि. २४ मार्च :** तालुक्यातील अंधानेर येथे सामाजिक बांधिलकी जपत आयोजित करण्यात आलेल्या मोफत आरोग्य तपासणी शिबिरास नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. तरुण व्यावसायिक तथा सामाजिक कार्यकर्ते प्रशांत वाघ यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांच्या मित्रपरिवाराने हा उपक्रम राबवला. शिबिरात तब्बल ६०० हून अधिक रुग्णांची तज्ज्ञ डॉक्टरांकडून मोफत तपासणी करण्यात आली.

या शिबिराला खासदार संदीपान भुमरे व आमदार संजनाताई जाधव यांनी भेट देऊन उपक्रमाचे कौतुक



केले. यावेळी खासदार भुमरे म्हणाले, वाढदिवसाचा अनावश्यक खर्च टाळून समाजकार्यासाठी तो वापरणे हा प्रशांत वाघ यांचा उपक्रम आजच्या तरुणांसाठी प्रेरणादायी आहे.

आमदार संजनाताई जाधव यांनीही प्रशांत वाघ व त्यांच्या मित्रपरिवाराच्या कार्याचे कौतुक करत, त्यांनी यापूर्वी शालेय साहित्य वाटप व विद्यार्थी दत्तक योजनेसारखे उपक्रम राबवले असल्याचे सांगितले. आरोग्य शिबिराच्या माध्यमातून गरजू नागरिकांना मदतीचा हात देण्याचे कार्य त्यांनी केले आहे, असे त्या म्हणाल्या.

शिबिरात ६०० गरजू रुग्णांना चष्म्यांचे वाटप करण्यात आले, तर १०० ज्येष्ठ नागरिकांना आधार काठी देण्यात आली. तसेच नेत्र तपासणीत मोतीबिंदू आढळलेल्या १५० रुग्णांवर लवकरच मोफत शस्त्रक्रिया करण्यात येणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली.

यावेळी जिल्हा परिषद सदस्या तृप्ती राजपूत, अरविंद राठोड, डॉ. मनोज राठोड, ज्ञानेश्र्वर निकम यांच्यासह पंचक्रोशीतील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. मैत्रिज फोटोचे कर्मचारी तसेच प्रशांत वाघ मित्र मंडळाच्या सदस्यांनी शिबिर यशस्वी करण्यासाठी विशेष परिश्रम घेतले.

## थोडक्यात...

### विवो वाय ५१ प्रो५ जी: दमदार परफॉर्मन्स

**मुंबई –** विवोने अलीकडेच आपल्या लोकप्रिय वाय – सिरीजचा विस्तार करत विवो वाय ५१ प्रो लाँच केला आहे. हा स्मार्टफोन अशा वापरकर्त्यांसाठी डिझाइन केला आहे ज्यांना स्टायलिश पॅकेजमध्ये विश्वसनीय परफॉर्मन्स, उत्तम बॅटरी लाईफ आणि स्मार्ट फीचर्स हवे आहेत. दैनंदिन वापर आणि दीर्घकाळ टिकणाऱ्या पॉवरवर लक्ष केंद्रित करून, हे डिव्हाइस सक्षम हार्डवेअर आणि स्मार्ट सॉफ्टवेअरचा परिपूर्ण समतोल साधते. या डिव्हाइसच्या केंद्रस्थानी मीडियाटेक डायमेन्सिटी ७३६० टर्बो चिप-सेट आहे, जो दैनंदिन काम, मनोरंजन आणि गेमिंगसाठी विश्र्वसनीय परफॉर्मन्स देतो.

### सोनी मॅक्सवर ‘तेरे इश्क में’चा वर्ल्ड टेलिव्हिजन प्रीमियर

**मुंबई –** सोनी मॅक्सवर ‘तेरे इश्क में’चा वर्ल्ड टेलिव्हिजन प्रीमियर २७ मार्च रोजी रात्री ८ वाजता होणार आहे. हा चित्रपट २०२५ मधील सर्वाधिक अपेक्षित भावनिक चित्रपटांपैकी एक मानला जात आहे. ‘रांझना’नंतर धनुष आणि दिग्दर्शक आनंद एल. राय ही जोडी पुन्हा एकत्र आली आहे. चित्रपट प्रेक्षकांना वाराणसीच्या घाटांवर आणि गल्लयांमध्ये नेणारा अनुभव देतो. ‘तेरे इश्क में’ला ‘रांझना’चा आध्यात्मिक वारसदार मानले जात आहे. धनुष शंकरच्या भूमिकेत गडद आणि तीव्र प्रेमाची कथा साकारताना दिसतो.

### ‘देहात’ ने एनएचबी समार्थित द्राक्ष क्लस्टर प्रोग्राम सुरु केला

**नाशिक–** भारतातील अग्रगण्य कृषी-तंत्रज्ञानाचे व्यासपीठ, नाशिकमध्ये आपले प्रस्थापित निर्यात कार्य फ्रेशट्रॉप ब्रँड अंतर्गत सांभाळत, भारत सरकारच्या कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्रालयाच्या राष्ट्रीय फलोत्पादन मंडळा च्या भागीदारी करत फलोत्पादन क्षेत्रात भारताची जागतिक स्पर्धात्मकता मजबूत करण्यासाठी नाशिकमध्ये द्राक्षे समूह विकास कार्यक्रम सुरू केला आहे.जागतिक द्राक्ष बाजारपेठा अधिकाधिक प्रीमियम, परवानाधारक वाणांकडे वळत आसतना भारतात थॉम्पसन सीडलेससारख्या पारंपरिक खुल्या जातींचे वर्चस्व कायम आहे.

### मोहिनी – प्रेमाची फिल्मी कहाणी कलर्स मराठीवर!

**मुंबई –** चंदेरी दुनियेचं आकर्षण, सोन्याच्या पडद्याची जादू याला भुरळ पडत नाही असा कोणीच नाही. आजवर अनेक प्रेमकथा पाहिल्या आपण, पण ही प्रेमकथा आहे थोडी वेगळी कारण ही आहे अशा दोन व्यक्तींची कथा, ज्यांच्या आयुष्यात प्रेमापेक्षा स्वाभिमान आणि अहंकार आधी येतात. मनोरंजन सृष्टीचा झगमगाट, चाहत्यांची वेडी गर्दी आणि स्टारडमचा दिमाख या सगळ्यांच्या मागे दडलेला संघर्ष, स्वप्नं आणि भावनांचा गुंता आणि त्यातून उलगडणारी आरके आणि मोहिनीची प्रेमकथा, नवी मालिका ‘मोहिनी – प्रेमाची फिल्मी कहाणी’ आता प्रेक्षकांच्या भेटीला २३ मार्चपासून दररोज संध्या. ७:३० वा., कलर्स मराठीवर येत आहे.

### कल्चर सर्कल ब्रॉडवे पुण्यात दाखल

**पुणे–** आशियातील आघाडीचा हायप आणि लक्झरी फॅशन प्लॅटफॉर्म ‘कल्चर सर्कल’ने पुण्यात आपल्या नव्या फ्लॅगशिप स्टोअरचे उद्घाटन केले आहे. कोपा मॉलमधील ब्रॉडवे येथे २१ मार्च २०२६ रोजी या स्टोअरचे अधिकृत उद्घाटन करण्यात आले. शहरातील प्रीमियम लाइफस्टाइल आणि रिटेल हबमध्ये उघडलेले हे स्टोअर कंपनीच्या ऑफलाइन विस्तार धोरणातील महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे.हे स्टोअर संपूर्ण लक्झरी अनुभव देण्यासाठी डिझाइन करण्यात आले असून, येथे प्रमाणित प्रीमियम स्नीकर्स, लक्झरी हँडबॅग्स, उच्च दर्जाच्या घड्याळांचा तसेच लोकप्रिय स्ट्रीटवेअरचा समावेश आहे. एर्मेस, लुई वितों, शॅनेल आणि डिओर यांसारख्या आंतरराष्ट्रीय ब्रँड्ससोबत एअर जॉर्डन, यीजी, नायकी डंक आणि न्यू बॅलन्स यांसारखे स्नीकर्स पर्याय ग्राहकांना उपलब्ध आहेत.

### सोनी सब सादर करीत आहे वीरांची भव्य गाथा

भारतातील अग्रगण्य जीईसी चॅनेल्सपैकी एक, सोनी सब, आपला मेगा शो हस्तिनापुर के वीर घेऊन येत आहे. ही एक दमदार कथा आहे धैर्य, शिस्त आणि कालातीत मूल्यांची. या महाकथेतील प्रवास दाखवतो की कसा चिकाटी, बंधुभाव आणि एका मजबूत आईचे मार्गदर्शन अशा योद्ध्यांना घडवते, ज्यांनी इतिहासावर अमिट छाप सोडली. प्रेक्षकांमध्ये उत्सुकता वाढवण्यासाठी सोनी सबने एक आकर्षक प्रोमो लॉन्च केला आहे, ज्यात या प्रवासाची झलक दाखवली आहे. या प्रोमोला आधीच प्रेक्षकांकडून जबरदस्त प्रतिसाद मिळत आहे.

### १० वर्षांच्या मुलीच्या स्वादुपिंडातील दुर्मिळ गाठ यशस्वीरित्या काढली

**पुणे –** पुण्यातील बाणेर येथील मणिपाल हॉस्पिटलमधील कॅन्सर सर्जनांनी १० वर्षांच्या मुलीच्या स्वादुपिंडातील दुर्मिळ गाठ यशस्वीरित्या काढून टाकली. या केससह भारतात स्वादुपिंडाच्या सॉलिड स्यूडोपापिलरी निओप्लाझम (एसपीएन) या आजाराने पीडत सर्वात कमी वयाच्या रूग्णाची नोंद झाली आहे. विशेष म्हणजे, या गाठीची शरीरात कोणतीही लक्षणे दिसत नव्हती. पण, शाळेत कराटेच्या तासादरम्यान पोटाला झालेल्या दुखापतीमुळे या आजाराचे अनपेक्षितपणे निदान झाले. इमेजिंग आणि बायोप्सीसह तपासण्या केल्यानंतर सॉलिड स्यूडोपापिलरी निओप्लाझम (एसपीएन)चे निदान झाले. हा स्वादुपिंडाचा दुर्मिळ आणि कमी तीव्रतेचा कर्करोगजन्य ट्यूमर आहे, जो पूर्णपणे काढून टाकल्यास रुग्ण पूर्णपणे बरा होण्याची शक्यता अत्यंत जास्त असते. एकूण स्वादुपिंडाच्या गाठींपैकी एसपीएनचे१ प्रमाण फक्त १ ते ३ टक्के असते आणि दरवर्षी १० लाख व्यक्तींपैकी एका व्यक्तीला हा आजार होतो. हा आजार प्रामुख्याने तरुण महिलांमध्ये, साधारणपणे किशोरवयीन ते ३० वर्षांच्या वयोगटात अधिक आढळतो, आणि लहान मुलांमध्ये या आजाराचे निदान होणे अत्यंत दुर्मिळ आहे.

# जिंतूर ते संभाजीनगर रोडवर अपघात

# चारठाणा जवळ भीषण अपघात; एकाच कुटुंबातील ०४ जणाचा मृत्यू

## भरधाव ट्रॅव्हल्स आणि डिझायर कारची समोरासमोर धडक; अनेक जखमींवर विविध रुग्णालयांत उपचार सुरू

**जिंतूर,/प्रतिनिधी:-** जिंतूर तालुक्यातील चारठाणा जवळील गणेशपुर शिवारात आज दुपारी भीषण अपघात घडून एकाच कुटुंबातील चौघाचा जागीच मृत्यू झाल्याने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. भरधाव वेगात येणाऱ्या ट्रॅव्हल्स आणि डिझायर कार यांच्यात झालेल्या जोरदार धडकेत हा रक्तरंजित अपघात घडला. मिळालेल्या माहितीनुसार, डिझायर कार (क्र. एमएच १२ जीएफ ६२५९) हिंगोली जिल्ह्यातील वसमत येथून मंठा दिशेने जात होती. त्याचवेळी समोरून येणाऱ्या ट्रॅव्हल्स (क्र. एमएच २० डीडी ७६६६) ने कारला जोरदार धडक दिली. धडक इतकी भीषण होती की कार रस्त्यापासून सुमारे ५० ते ६० फूट दूर फेकली जाऊन तिचा अक्षरशः चकनाचूर झाला. या अपघातात सय्यद अझर सय्यद महेमूद, सुमैया सय्यद अजहर आणि त्यांच्या कुटुंबातील एका लहान बालकाचा जागीच मृत्यू झाला. या चौघे मृत्यूमुळे वसमत परिसरात शोककळा पसरली आहे. दरम्यान, कारमधील मरियम उफाद, फरवा आणि सय्यद इस्माईल हे गंभीर जखमी झाले परंतू त्यांचा सुद्धा छत्रपती संभाजी नगर येथे निधीन झालाअसून काही जख्मी त्यांच्यावर जालना येथील रुग्णालयात उपचार सुरू आहेत. ट्रॅव्हल्समध्ये एकूण १३ प्रवासी होते. त्यापैकी ४ ते ५ जण जखमी झाले असून त्यांच्यावर मंठा ग्रामीण रुग्णालयात उपचार सुरू आहेत. ट्रॅव्हल्स चालक संतोष केशवराव शिंदे (वय ४९, रा. संभाजीनगर) हेही गंभीर जखमी झाले असून त्यांना पुढील उपचारासाठी छत्रपती संभाजीनगर येथे हलविण्यात आले आहे अपघातानंतर स्थानिक नागरिकांनी तत्काळ मदतीसाठी धाव घेतली. वाहनांचे पत्रे कापून जखमींना बाहेर काढण्यात आले. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत वाहतूक सुरळीत केली. या भीषण अपघातामुळे संपूर्ण परिसरात हळहळ व्यक्त होत असून वेगमर्यादा आणि सुरक्षित वाहनचालना याबाबत पुन्हा एकदा प्रश्न उपस्थित झाले आहेत. पोलिसांकडून पुढील तपास सुरू



## एस के सोलर एजन्सीचा थाटात शुभारंभ

**जिंतूर,/प्रतिनिधी-** शिवाजीनगर येथील किरण जायभाये यांचे एस के सोलर व पावर सोल्युशन्स एजन्सीचा आदरणीय मिनाताई रामप्रसाद बोर्डीकर यांच्या हस्ते शुभारंभ करण्यात आले

या एजन्सी मार्फत योग्य दरात सोलर यूनीट बसविणे व सोलार पॅनल, सोलार इनविटर,सोलार बॅटरी, सोलार वॉटर हीटर,सोलार लाईट, सोलार पंप झटका मशीन,आणि सर्व प्रकारचे सोलार चे साहित्य सोलार एजन्सी मार्फत मिळतील

या शुभारंभ कार्यक्रमास आदरणीय मीनाताई बोर्डीकर, नगराध्यक्ष प्रतापराव देशमुख,गटनेते सचिन उर्फ मुन्ना गोरे, ॲड सुनील बुधवंत, सचिन जायभाये,गोविंद थिटे पाटील,राजू सरपंच अंबरवाडीकर, रामराव घुगे पाटील,श्यामसुंदर मस्के,विलास जायभाये,पुरुषोत्तम घुगे,मुरलीधर जायभाये,डॉक्टर पंडित दराडे,खुशालराव घुगे,एस के सोलार कंपनीचे मालक किरण जायभाये यांच्यासह शहरवासी मोठ्या संख्येने उपस्थित होते




## जिंतूर पंचायत समिती सभापती आयोध्या खिस्ते उपसभापती सोनाली दराडे यांनी घेतली-आढावा बैठकीत या बैठकीत विकासकामांचा ;

**जिंतूर,/प्रतिनिधी-** पंचायत समितीच्या सभागृहात सभापती आयोध्या ताई किशोर खिस्ते व उपसभापती सोनाली ताई माधवराव दराडे यांच्या अध्यक्षतेखाली २३ मार्च २०२६ रोजी विशेष आढावा बैठक पार पडली. या बैठकीत तालुक्यातील रखडलेली विकासकामे, पाणीटंचाईचे नियोजन आणि रिक्त पदांचा प्रश्न यावर प्रशासकीय अधिकाऱ्यांची चांगलीच झाडाझडती घेण्यात आली.

✼ बांधकाम व पाणीपुरवठा विभाग: उन्हाळ्याची चाहूल लागताच पाणी टंचाई निवारणासाठी काय नियोजन केले आहे, याचा सविस्तर आढावा घेण्यात आला. जलजीवन मिशन अंतर्गत सुरू असलेल्या कामांची गती समाधानकारक नसल्याने नाराजी व्यक्त करण्यात आली. तसेच, जिओ टॅगिंग अभावी प्रलंबित राहिलेल्या देयकांचा प्रश्न तत्काळ मार्गी लावण्याचे आदेश देण्यात आले.

✼ आरोग्य व शिक्षण विभाग: तालुक्यातील अनेक शाळांच्या इमारती मोडकळीस आल्या असून, विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. तसेच प्राथमिक आरोग्य केंद्रांमधील रिक्त पदे आणि नादुरुस्त इमारतींमुळे ग्रामीण आरोग्य व्यवस्था खिळखिळी झाली आहे. या दोन्ही विभागांच्या कामात सुधारणा करण्याचे निर्देश बैठकीत देण्यात आले.

✼ लघुसिंचन व जलसंधारण: शेतीसाठी अत्यंत महत्त्वाच्या असलेल्या सिमेंट बंधाऱ्यांची कामे, नाला सरलीकरण आणि पाझर तलावातील गाळ उपसण्याच्या कामांचा आढावा घेऊन, नवीन प्रस्तावित कामांना मंजुरी देण्याबाबत चर्चा झाली.

✼ महिला व बालविकास: अंगणवाडी सेविकांची रिक्त पदे आणि गरोदर मातांना मिळणाऱ्या सकस आहाराच्या वाटपावर देखरेख ठेवण्याच्या सूचना करण्यात आल्या.

विशेष लक्ष: बैठकीत प्रामुख्याने अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांच्या वस्ती सुधार योजनेतील प्रलंबित निधी आणि कामांच्या दर्जावर सविस्तर चर्चा होऊन प्रशासनाला कामाचा डेडलाईन देण्यात आला.

या बैठकीमुळे तालुक्यातील रखडलेल्या अनेक कामांना आता नव्याने गती मिळण्याची चिन्हे दिसत आहेत. प्रशासनाने या सूचनांचे गांभीर्याने पालन न केल्यास आक्रमक पवित्रा घेण्याचे संकेतही लोकप्रतिनिधींनी दिले ओ गेल्या चार वर्षापासून ग्रामीण भागातील घरकुलांचा पहिला हप्ता पडल्यानंतर अनेक लाभार्थींना घर पूर्ण झाले तरी बी लाभार्थींचे पैसे मिळाले नाहीत याकरता सभापती व उपसभापती हे चांगलेच आक्रमक झाले आणि त्यांनी पदभार स्वीकारल्यानंतर दोनच दिवसात घरकुलांचा प्रश्न दुसरा तिसरा हप्ता टाकण्याचा मार्गी लावण्यात आला आहे रोजगार हमी योजने चे अनेक दिवसांपासून रखडलेले कामे सिंचन विहिरी शेत रस्ता वृक्ष लागवड यासारख्या अनेक शासनाच्या विविध योजनेचे प्रश्न मार्गी लावण्याचे काम सभापती व उपसभापती यांनी केले या बैठकीस गटविकास अधिकारी सुभाष मानकर विस्तार अधिकारी श्री आडते साहेब श्री जाधव साहेब श्री ढोणे साहेब व बांधकाम विभागाचे उपअभियंता दीपक आंबेकर यासह कर्मचारी व सर्व विभाग प्रमुख मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते परभणी जि.प. अध्यक्षा वाकळे यांचा सत्कार

**परभणी,/प्रतिनिधी:** जिल्हा परिषदेच्या निवडणुकीत भारतीय जनता पक्षाने ऐतिहासिक यश संपादन करत सत्ता स्थापन केली आहे राज्यमंत्री तथा पालकमंत्री मेघना साकोरे बोर्डीकर यांच्या नेतृत्वाखाली मिळालेल्या या यशाची दखल घेत मा मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांनी जिल्हा परिषद अध्यक्षा लताताई विजय वाकळे यांचा विधान भवन मुंबई येथे सत्कार करून गौरव केला.

परभणी जिल्ह्याच्या राजकीय इतिहासात प्रथमच भाजपने जिल्हा परिषद भारतीय जनता पक्षाच्या ताब्यात दिली आहे तसेच परभणी जिल्ह्यातील सर्वच नगरपालिका तसेच पंचायत समित्यांमध्ये घवघवीत यशाबद्दल भाजपा चा झेंडा फडकावला आहे जिल्हा परिषद निवडणुकीत भाजपचे तब्बल २४ सदस्य विजयी झाले आणि महा युवतीची सत्ता आली आहे आणि यामध्ये लताताई विजय वाकळे यांची जि.प. अध्यक्षपदी आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) गटाचे श्रीकांत भोसले विटेकर यांची उपाध्यक्ष पदावर बिनविरोध निवड झाली.

या पार्श्वभूमीवर महाराष्ट्राचे मा मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांनी अध्यक्षा यांचे अभिनंदन करत पुढील कार्यकाळासाठी शुभेच्छा दिल्या.यावेळी त्यांनी जिल्हा परिषदेमार्फत ग्रामीण भागातील विकासकामांना गती देण्याचे आवाहन केले. विशेषतः पायाभूत सुविधा, शिक्षण, आरोग्य आणि नागरिकांच्या मूलभूत गरजांच्या पूर्ततेसाठी प्रभावी नियोजन करण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. राज्य सरकारकडून आवश्यक ते सर्वतोपरी सहकार्य मिळेल, असेही त्यांनी स्पष्ट केले.



**मुंबई येथे जिल्हा परिषदेच्या नवनिर्वाचित अध्यक्षा लताताई विजय वाकळे यांचा मा.मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस साहेब यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला यावेळी सोबत उपस्थित मा आ रामप्रसादजी बोर्डीकर,जिल्हाध्यक्ष सुरेश भुमरे,दिलीपराव देशमुख सुनिल भोंबे,सुमेध सूर्यवंशी संजय वाकळे आदी दिसत आहेत.**

## प्रशासनाच्या ढिसाळ कारभारामुळे उपसरपंचाचा आत्मदहनाचा इशारा; १५ दिवसांत कारवाईचे लेखी आश्वासन मिळाल्याने आंदोलन तूर्त स्थगित

**पाथरी,/प्रतिनिधी:** पाथरी-टाकळी रोडवरील अवैध वीटभट्ट्यांवर गेल्या तीन वर्षांपासून कारवाई होत नसल्याच्या निषेधार्थ, पोहे टाकळी येथील उपसरपंच गणेश बागल यांनी आज, २३ मार्च रोजी जागतिक हवामान दिनी आत्मदहनाचा इशारा दिला होता. मात्र, महसूल प्रशासन आणि पोलीस प्रशासनाच्या मध्यस्थीनंतर, येत्या १५ दिवसांत ठोस कारवाई करण्याचे लेखी आश्वासन मिळाल्याने हे आंदोलन ६ एप्रिल २०२६ पर्यंत स्थगित करण्यात आले आहे. दरम्यान, प्रशासनाने दिलेल्या उशिराच्या पत्रामुळे महसूल विभागाचा ढिसाळ कारभार पुन्हा एकदा चव्हाट्यावर आला असून नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत आहे.

काय आहे नेमके प्रकरण? पाथरी तालुक्यातील टाकळी रोडवर गेल्या तीन वर्षांपासून अनेक वीटभट्ट्या अनधिकृतपणे सुरू आहेत. या वीटभट्ट्यांच्या प्रदूषणामुळे आणि अवैध उत्खननामुळे पर्यावरणाचे मोठे नुकसान होत असून, ग्रामस्थांना त्रासाला सामोरे जावे लागत आहे. यासंदर्भात उपसरपंच गणेश बागल यांनी मागील तीन वर्षांपासून महसूल प्रशासनाकडे वारंवार पत्रव्यवहार केला होता. परंतु, प्रशासनाकडून कोणतीही दखल घेतली जात नसल्याने अखेर बागल यांनी १० मार्च २०२६ रोजी उपविभागीय अधिकारी, तहसीलदार आणि पोलीस प्रशासनाला निवेदन देऊन २३ मार्च रोजी आत्मदहन करण्याचा इशारा दिला होता. ऐनवेळी प्रशासनाची धावपळ दी.२३ मार्च रोजी १२ वाजता आत्मदहनाचा इशारा दिलेला असताना, दुपारी ११:४५ वाजता महसूल प्रशासनाकडून बागल यांना आत्मदहनापासून परावृत्त होण्याचे पत्र देण्यात आले. या उशिरा मिळालेल्या पत्रामुळे प्रशासनाला आंदोलकाची आणि जनसामान्यांच्या प्रश्नांची किती चिंता आहे, हे दिसून आले. यावरून गणेश बागल यांनी प्रशासनाच्या कार्यपद्धतीचा तीव्र निषेध व्यक्त केला आहे. मध्यस्थी आणि तोडगा परिस्थितीचे गांभीर्य ओळखून उपविभागीय अधिकारी संगीता चव्हाण व तहसीलदार शंकर हंदेश्वर यांच्या आदेशानुसार, पाथरी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक लक्ष्मण केंद्रे, गोपनीय शाखेचे विजय जाधव, मंडळ अधिकारी विटेकर आणि तलाठी विजय भदर्गे यांनी आंदोलकांशी चर्चा केली. पोलीस ठाण्यात झालेल्या या बैठकीला सरपंच शामराव गोंगे, तंटामुक्ती अध्यक्ष आबाराव गोंगे, माणिक गोंगे,मारुती गोंगे,अंगद बागल, गोविंद गोंगे,परमेश्वर गोंगे,अंगद गोंगे,ज्ञानेश्वर चव्हाण,संदीप बागल,पांडुरंग गोंगे,मदन बागल,मुरलीधर गोंगे ,लक्ष्मण उजगरे,प्रकाश उजगरे ,राहुल घुगे यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते. येत्या १५ दिवसांत उपविभागीय अधिकारी व तहसीलदार यांच्या उपस्थितीत संयुक्त बैठक घेऊन संबंधित वीटभट्ट्यांवर कायदेशीर कारवाई करण्याचे लेखी आश्वासन प्रशासनाने दिले.

या आश्वासनानंतर गणेश बागल यांनी आपले आत्मदहन आंदोलन ६ एप्रिल २०२६ पर्यंत स्थगित करण्याचा निर्णय घेतला आहे. जर दिलेल्या मुदतीत कारवाई झाली नाही, तर पुढील पाऊल उचलण्याचा इशाराही यावेळी ग्रामस्थांनी दिला आहे.

## संक्षिप्त वृत्त...

### खानापुर फाट्यावरील राडा : वाहनचालकाविरुध्द गुन्हा दाखल

**परभणी,/:-** वसमत रस्त्यावरील खानापूर फाट्यावर शनिवारी रात्री किरकोळ वादातून तुंबळ हाणामारीसह एका युवकावर वाहन घातल्याच्या प्रकरणात नवा मोंढा पोलिसांनी आज सोमवारी त्या वाहन चालकाविरुध्द गुन्हा दाखल केला आहे.

खानापूर नाक्यावर शनिवारी सायंकाळी काही युवकांनी किरकोळ वादातून एकमेकांवर धाव घेतली आणि लाठ्या काठ्यांनी मारहाण सुरु केली. यावेळी एका तरुणाच्या अंगावर एका वाहन चालकाने गाडी घालण्याचा प्रयत्न केला. या एकूण राड्याबद्दल प्रत्यक्षदर्शनींनी व्हिडीओ क्लिप व्हायरल केल्या तेव्हा सोशल मिडीयातून या खूलेआम गुंडगिरीबद्दल टिकेचा भडिमार सुरु झाला. नवा मोंढा पोलिसांनी या प्रकरणात एम.एच. २२, ९०५० या क्रमाकांच्या स्कार्पिओ चालकाविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

### रस्ते मार्गावरील मालवाहतूक रेल्वेकडे वळवण्यात नांदेड विभागाला यश

**परभणी,/:-** नांदेड विभागाच्या बिझनेस डेव्हलपमेंट युनिट तसेच वाशीम येथील मुख्य मालधक्का पर्यवेक्षक यांच्या सक्रिय प्रयत्नांतून रस्तेमार्गावरील मालवाहतूक रेल्वेमार्गाकडे वळवण्यात यश आले आहे. करंजा (वाशीम) येथील एम/एस रामदेव बाबा ट्रेडर्स आणि एम/एस मोहिनी कॉर्पोरेशन या नव्या ग्राहकांना जोडण्यात आले असून त्यांनी गहू वाहतुकीसाठी रेल्वेमार्गाचा अवलंब करण्याचा निर्णय घेतला आहे. या मालाची लोडिंग वाशीम येथील गुड्स शेडवरून करण्यात येत आहे.

सदर ग्राहकांनी मार्च-एप्रिल २०२६ दरम्यान वाशीम येथून सालेम, धर्मपुरी आणि व्हाइटफिल्ड या ठिकाणी सुमारे ७ ते ८ मिनी रेक लोड करण्याचे नियोजन केले आहे. प्रत्येक मिनी रेकमधून अंदाजे २६.५० लाख रुपयांची कमाई अपेक्षित असून या उपक्रमातून विभागाला सुमारे २.१२ कोटी रुपयांचा महसूल मिळण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. या नव्या वाहतुकीची सुरुवात म्हणून २३ मार्च २०२६ रोजी वाशीम येथून सालेमकडे पहिली मिनी रेक यशस्वीरित्या रवाना करण्यात आली.

ग्राहकांशी सातत्यपूर्ण संवाद, कार्यक्षम लॉजिस्टिक नियोजन आणि धोरणात्मक मार्केटिंगच्या माध्यमातून रेल्वेच्या मालवाहतूक वाट्यात वाढ करण्यासाठी विभागाची ही कामगिरी महत्त्वपूर्ण मानली जात आहे.

### अडगळीतले सूर्य' नाटिकेतून स्त्रीशक्तीचा प्रभावी १संदेश

महिला दिनानिमित्त पेन्शनर्स असोसिएशनचा स्तुत्य उपक्रम : रसिक प्रेक्षकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**सेलू,/प्रतिनिधी :** येथील पेन्शनर्स असोसिएशनच्या वतीने जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून सोमवार २३ मार्च रोजी साई नाट्यगृहात 'अडगळीतले सूर्य' या स्त्रीशक्तीवर आधारित नाटिकेचे सादरीकरण करण्यात आले. या नाटिकेतून खरे आदर्श हे सामाजिक माध्यमांवर नव्हे, तर आपल्या आसपासच दडलेले असतात, असा प्रभावी संदेश देण्यात आला.

नाट्यलेखक सुरेश झिंजुर्के लिखित तसेच ज्येष्ठ रंगकर्मी प्रा. अनिल कुलकर्णी व रोहिणी कुलकर्णी यांच्या संकल्पना व दिग्दर्शनाखाली सादर झालेल्या या नाटिकेला रसिक प्रेक्षकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पेन्शनर्स असोसिएशनचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. शरद कुलकर्णी हे होते. उद्घाटक म्हणून वैशाली मिलिंद सावंत, प्रमुख पाहुणे नयन साईराज बोराडे तसेच नाट्य संयोजिका रोहिणी कुलकर्णी व्यासपीठावर उपस्थित होत्या. यावेळी सुनिता काकडे, आशा पहाडे, अनुपमा देवधर व शिला काजळे यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

'अडगळीतले सूर्य' या नाटिकेतून विविध क्षेत्रात कर्तृत्व सिद्ध केलेल्या भारतीय स्त्रियांच्या भूमिकांमधून हृदयस्पर्शी प्रसंग सादर करण्यात आले. या 'अडगळीतल्या' नव्हे, तर समाजाला उजळून टाकणाऱ्या 'सूर्यांना' ओळखण्याची गरज नाटिकेतून अधोरेखित करण्यात आली. तसेच वीर मातांच्या इतिहासालाही उजाळा देण्यात आला. नाटिकेच्या सादरीकरणात नेपथ्य भालचंद्र गांजापुरकर, शशिकांत देशपांडे, सुनील वाकडीकर यांनी साकारले, तर संगीत, प्रकाशयोजना सार्थक कुलकर्णी, सुरेश पौळ, प्रज्वल पारवे यांनी केली. रंगभूषा व वेशभूषा हेमलता देशमुख, अनिता कुलकर्णी व गीता मुळावेकर यांनी सांभाळली.

नाटिकेत पद्मजा खारकर (आर्या), पूजा जोशी (झाशीची राणी), संज्ञा खारकर (इंदिरा गांधी), मीरा देशमुख (सावित्रीबाई फुले), सोनाली कुबरे (रमाबाई आंबेडकर), सरिता उमरीकर (बहिणाबाई चौधरी), सीमा अष्टीकर (राजमाता जिजाबाई), मंजुषा बोराडे (कल्पना चावला), रेणुका बोटे (लता मंगेशकर), सीमा काळबांडे (शाहीर) तसेच रवी कुलकर्णी व रवी मुळावेकर (चोरांच्या भूमिका) यांनी भूमिका साकारल्या. बालकलाकार म्हणून हर्षदा मोगल, स्वरा देशपांडे, ऋतुजा राठोड, ईश्वरी कुलकर्णी आदींनी सहभाग नोंदवला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक रोहिणी कुलकर्णी यांनी केले. सूत्रसंचालन नारायण इक्कर व हेमलता देशमुख यांनी केले, तर आभारप्रदर्शन हेमलता जोशी यांनी केले. कार्यक्रमास विविध क्षेत्रातील महिला व रसिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी पेन्शनर्स असोसिएशनच्या सदस्यांनी विशेष परिश्रम घेतले.

### जिल्हा परिषदेमार्फत ग्रामीण भागातील विकास कामांना गती द्या : मुख्यमंत्र्यांद्वारे आवाहन : भाजपाच्या नवनिर्वाचित अध्यक्षांसह सदस्यांनी घेतली मुख्यमंत्र्यांची भेट

**परभणी,/प्रतिनिधी :** ग्रामीण भागातील विकास कामांना गती दिली पाहिजे, पायाभूत सुविधा, नागरीकांच्या मूलभूत सोयी-सुविधा यांवर लक्ष केंद्रीत केले पाहिजे, असे मत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केले.

भारतीय जनता पार्टीच्या जिल्हा परिषदेच्या नवनिर्वाचित अध्यक्षा लता विजय वाकळे, गटनेते दिलीपराव देशमुख यांच्यासह भाजपाचे ज्येष्ठ नेते माजी आमदार रामप्रसाद बोर्डीकर, ग्रामीण जिल्हाध्यक्ष सुरेश भुमरे, संजय वाकळे व अन्य मंडळींनी सोमवार २३ मार्च रोजी विधानभवनात मुख्यमंत्री फडणवीस यांची भेट घेतली. त्यावेळी मुख्यमंत्री फडणवीस यांनी नूतन अध्यक्ष वाकळे यांच्यसह अन्य पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन केले. पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या व ग्रामीण विकासाच्या कामांना सर्वतोपरि मदत केली जाईल, अशी ग्वाही दिली.

### इयत्ता नववीच्या द्वितीय सत्रातील मराठी विषयाच्याच प्रश्नपत्रिकेत शुध्दलेखनाच्या गंभीर चूका

**परभणी,/प्रतिनिधी :** इयत्ता नववीच्या द्वितीय सत्रातील परिक्षेदरम्यान जिल्हा शिक्षण संवर्धन मंडळाने संबंधित शाळांमार्फत विद्यार्थ्यांना पुरविलेल्या मराठी विषयाच्या प्रश्नपत्रिकेत शुध्दलेखनाच्या असंख्य चूका आढळून आल्या. त्यामुळे विद्यार्थी कमालीचे गोंधळून गेले. परंतु, जिल्हा शिक्षण संवर्धन मंडळाने केलेल्या या प्रतापाबाबत ओळीनेही खूलासा केला नाही.

सोलापूर तरुण भारत

www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## अग्रलेख...

# प्रतिमा आणि प्रतिभासंगम!

प्रतिमा आणि प्रतिभा हे व्यक्तिमत्त्वाचा आलेख उंचावणारे दोन महत्त्वाचे स्तंभ असतात. यापैकी प्रतिमेचा स्तंभ हा चारित्र्याच्या पायावर उभा असतो, तर प्रतिभेचा स्तंभ बुद्धिमत्तेच्या पायावर भक्कम होत असतो. या आलेखाच्या उंचावत्या दिशेसोबत आपल्या व्यक्तिमत्त्वाचा आलेख स्पर्धा करू शकणार नाही अशी जाणीव झाली की स्पर्धकाच्या मनात द्वेषभावना जागी होते. आपल्या प्रतिमेच्या आणि प्रतिभेच्या रेषेची लांबी प्रतिस्पर्ध्याच्या रेषेहून अधिक होणे शक्य नाही असे दिसू लागले की द्वेषापोटी प्रतिस्पर्ध्याच्या प्रतिमा आणि प्रतिभेच्या रेषांची लांबी कमी करण्याकरिता प्रयत्न सुरू होतात आणि सातत्याने त्यात अपयश येत गेले की द्वेषभावना उफाळू लागते. मग प्रतिमाहननाचे आणि प्रतिभेचे पंख छाटण्याचे प्रयत्न सुरू होतात. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सुमारे १२ वर्षांपूर्वी पंतप्रधानपदाची सूत्रे हाती घेतल्यापासून त्यांची जनमानसात उंचावणारी प्रतिमा आणि जनमान्यतेस पात्र ठरलेली प्रतिभा हे प्रतिस्पर्ध्यांसमोरील आव्हान ठरू लागल्याचे जेव्हा स्पष्ट होऊ लागले, तेव्हापासूनच मोदी यांच्या प्रतिमाहननाच्या मोहिमा सुरू झाल्या. पण प्रतिमा ही नेहमीच चारित्र्याच्या भक्कम पायावर उभी राहत असल्याने व मोदी यांच्या चारित्र्यावर चिखलफेक करता येईल असे काही हाती लागत नसल्याने हे प्रयत्न सातत्याने फसत गेले आणि विरोधाच्या राजकारणास नैराश्याने ग्रासले. मोदी यांच्या प्रतिमेमुळे त्यांना भक्कम जनाधार लाभत असल्याने, त्यांचे प्रतिमाहनन केल्याखेरीज त्यांच्या जनाधारास ओहोटी लागणार नाही अशा भावनेतून प्रतिमाहननाच्या मोहिमा सातत्याने राबविल्या गेल्या, पण त्या मोहिमादेखील राबविणाऱ्यांवरच उलटल्याने मोदी यांची प्रतिमा अधिक उजळून जनाधारही वाढत गेला. त्यामुळेच, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नुकताच मुख्यमंत्री आणि पंतप्रधान या दोन्ही पदांचा मिळून ८,९३१ दिवसांचा (सुमारे २५ वर्षे) कार्यकाळ पूर्ण करून भारतात सर्वाधिक काळ 'सरकार प्रमुख' राहण्याचा ऐतिहासिक विक्रम प्रस्थापित केला आहे. त्यांच्या या प्रदीर्घ कारकीर्दीचा सकारात्मक आढावा घेताना केवळ एका नेतृत्वाच्या व्यक्तिमत्त्वाचे पैलू शोधणे पुरेसे ठरणार नाही. असे कोणतेही नेतृत्व आपल्या प्रतिमा आणि प्रतिभेच्या जोरावर समाज, देश आणि जागतिक स्तरावर आपल्या क्षमता कशा सिद्ध करतात त्याचा धांडोळा घ्यावा लागतो. त्यांचा नेतृत्वकाळ देशाच्या राजकारण, अर्थकारण आणि समाजकारणाच्या वाटचालीस दिशादर्शक ठरल्याची नोंद भविष्यकाळातील त्या इतिहासास घ्यावी लागेल आणि त्यामध्ये मुख्यत्वे भारताच्या आर्थिक सुधारणांचे पर्व म्हणून मोदी सरकारच्या अमृतकालीन वाटचालीचा आढावा घेणेदेखील अपरिहार्य ठरेल. कारण याच काळात भारताच्या अर्थव्यवस्थेचा आलेख जागतिक स्तरावरील दहाव्या क्रमांकावरून पाचव्या क्रमांकापर्यंत उंचावला आणि जगातील प्रमुख अर्थव्यवस्थांना मागे टाकण्याच्या जिद्दीने भविष्यकाळाची वाटचालही करू लागला आहे. याच कार्यकाळात 'मेक इन इंडिया' आणि 'आत्मनिर्भर भारत' या मोहिमांमुळे उत्पादनाला चालना मिळाली, 'एक राष्ट्र, एक कर' या अभिनव संकल्पनेतून वस्तू व सेवाकराच्या नव्या सुटसुटीत रचनेची अंमलबजावणी सुरू झाली आणि डिजिटल अर्थव्यवस्थेचे क्रांतिकारी पर्वदेखील भारतात सुरू झाले. आज यूपीआय प्रणालीमुळे भारत डिजिटल व्यवहारांत जगात अग्रस्थानी पोहोचला आहे. अर्थव्यवस्थेला स्थैर्य आल्यानंतर अनेक योजनांचा लाभ जनतेला थेट स्वरूपात मिळावा यासाठी जनधन, आधार आणि मोबाईल या त्रिसूत्रीचा कल्पक वापर ही मोदी सरकारची देशाला मिळालेली देणगी ठरणार आहे. कारण या त्रिसूत्रीमुळे सरकारी योजनांचा लाभ थेट लाभार्थींच्या बँक खात्यात जमा होऊ लागला. उज्ज्वला योजनेतून कोट्यवधी महिलांना मिळालेल्या गॅस जोडण्यांमुळे महिलांच्या आरोग्याच्या समस्या कमी झाल्याची नोंद घेतली गेली आहे आणि देशातील गरीब कुटुंबांना मिळालेल्या हक्काच्या घरांनी मोदी यांच्या प्रतिमेला बळ दिले आहे. याच कार्यकाळात भारतात जगातील सर्वांत मोठी आरोग्य विमा योजना सुरू झाली. देशभरात विणले गेलेले राष्ट्रीय महामार्गांचे जाळे, वंदे भारतसारख्या आधुनिक रेल्वे गाड्या, नवीन विमानतळ आणि जलद गतीने होणारे मेट्रोचे काम हा गेल्या दहा वर्षांच्या देशाच्या प्रगती-काळाचा कणा मानला जातो. पारतंत्र्याच्या काळात आणि स्वातंत्र्यानंतरही अनेक दशके देशाच्या अस्मितेस दुखावणाऱ्या काही वेदना सतत समाजास छळत होत्या. जम्मू-काश्मीर हा भारताचा अविभाज्य भाग आहे असे सतत ठणकावून सांगताना, अशीच एक वेदना जागी होत असे. या वेदनेवर केवळ भावनिक फुंकर मारणे पुरेसे नाही, तर दीर्घकाळाच्या या वेदनेची मुळे असलेल्या कलम ३७० चे अस्तित्व पुसून टाकण्याच्या धाडसी शस्त्रक्रियेस पर्याय नाही, हे मोदी सरकारने ओळखले आणि जम्मू-काश्मीरला विशेष दर्जा देणारे कलम ३७० रद्द करून हे राज्य देशाच्या मुख्य प्रवाहात अभिमानाने सामील झाले. दहशतवादाविरुद्धच्या शून्य सहनशीलतेच्या धोरणाने या राज्यातील अशांततेचा कायमचा बीमोड करण्याची हिंमत दाखविणारे सरकार म्हणून मोदी सरकारची दखल इतिहासाला घ्यावीच लागेल. अनेक शतकांपासून प्रलंबित असलेला अयोध्येतील राम मंदिराचा प्रश्न ही देशातील धार्मिक सलोख्यापुढील समस्या ठरेल, या भीतीने ही जखम दीर्घकाळ भळभळत राहिली. हा प्रश्न शांततापूर्ण मार्गाने मार्गी लागेल, याची कोणालाच खात्री नव्हती. अशा कोणत्याही समस्येचे निराकरण करण्याकरिता पुढाकार घेणाऱ्या नेत्यांची प्रतिमा अशा काळात कामी येत असते. मोदी सरकारने सामंजस्याने आणि शांततापूर्ण रीतीने शतकांपासूनची ही समस्या सोडवली आणि राम मंदिर उभे राहत असताना, सामाजिक सलोख्याचे नवे दर्शन जगाला घडले. प्रतिभासंपन्न नेतृत्वामुळे जागतिक प्रतिष्ठा प्राप्त होते, हे गेल्या दशकभरात देशाने अनुभवलेले वास्तव आहे. जी-२० परिषदेचे यशस्वी यजमानपद भूषवून भारताने जागतिक राजकारणात आपली बाजू भक्कम केली. रशिया-युक्रेन युद्धासारख्या कठीण काळातही भारताने आपले स्वतंत्र परराष्ट्र धोरण टिकवून ठेवले. आजही, अमेरिका-इस्रायल आणि इराण यांच्यातील महायुद्धाच्या सावटाखालील जगावर राजकीय, आर्थिक अस्थैर्याचे ढग जमा झालेले असतानाही, भारताच्या समाजजीवनास लाभलेली सुरक्षिततेच्या भावनेची आश्वस्ततादेखील इतिहासास दुर्लक्षित करता येणार नाही. मोदींची कारकीर्द ही राजकीय स्थिरता आणि निर्णयक्षमता यासाठी ओळखली जाते. यामुळेच आत्मनिर्भरतेच्या आत्मविश्वासाने देशाने 'विकसित भारता'चे ध्येय समोर ठेवून वाटचाल सुरू केली आहे.

नरेंद्र मोदी नावाच्या, सामान्य कुटुंबातून उदयास आलेल्या एका नेतृत्वाने देशाच्या प्रस्थापित राजकारणास जोरदार धक्का दिला आहे. पक्षाचा एक सामान्य कार्यकर्ता म्हणून राजकीय जीवनात प्रवेश केलेला एक नेता कोणा पूर्वजाच्या राजकीय पुण्याईवर नव्हे, तर असामान्य नेतृत्वक्षमता, प्रखर राष्ट्रनिष्ठा आणि परंपरांची जपणूक करतानाही नवतेचा ध्यास धरणारी स्वार्थनिरपेक्ष दूरदृष्टी या गुणांच्या जोरावर पंतप्रधानपदापर्यंत पोहोचला. घराणेशाहीच्या विळख्यात जखडलेल्या सत्तेच्या राजकारणास हा पहिला धक्का तर होताच, पण पुढे नरेंद्र मोदी यांनी घराणेशाहीच्या विरोधात पहिला आवाजही उठविला आणि घराण्यांच्या पुण्याईवर सत्तेचे लोणी चाखणाऱ्या पक्षांना आव्हान दिले. घराणेशाहीच्या राजकारणात देश, समाज, जनता याहूनही कुटुंब, घराणे, नातेवाईक यांचेच हित जपले जाते. कुटुंब हाच या राजकारणाचा केंद्रबिंदू असतो आणि कुटुंबप्रमुखाच्या एकखांबी आधारावर या पक्षांच्या राजकारणाचा तंबू उभा असतो. आपल्याखेरीज कोणीच समाजाचा किंवा देशाचा तारणहार असू शकत नाही अशी भावना समाजात रुजविण्याचा पद्धतशीर प्रयत्न ही घराणी करत असतात. लोकशाहीची ही कुचेष्टा थांबविण्याचा मोदी सरकारने घेतलेला ध्यास म्हणजे एकप्रकारे हे राजकारणाचे आणि लोकशाहीचे शुद्धीकरण आहे. प्रादेशिक पक्षांचे मुखवटे धारण केलेल्या राजकीय घराणेशाहीला विसर्जित करण्याची मोदी यांच्या नेतृत्वाखाली सुरू झालेली मोहीम म्हणजे सत्तेचे सामान्यांपर्यंत विकेंद्रीकरण करण्याचा नवा प्रयोग ठरतो आहे. राजकारणास बगल देणाऱ्या या मोहिमा कोणाच्या तरी नैराश्यास निमंत्रण देत असतील, तर प्रतिमाभंजनच्या मोहिमांना आणि प्रतिभेच्या कुचेष्टेला कारण मिळणारच!

## आंतरराष्ट्रीय

# इराणमधील सत्ता उलथविण्यात अपयश का?

**प्रा. जयसिंग यादव**

मध्यपूर्वेतील राजकारणात गेल्या काही दशकांपासून सर्वांत संवेदनशील आणि संघर्षपूर्ण समीकरण म्हणजे अमेरिका, इस्रायल आणि इराण यांच्यातील तणाव. विशेषतः इराणी इस्लामिक क्रांती झाल्यानंतर इराणमध्ये इस्लामिक रिपब्लिकची स्थापना झाली आणि त्यानंतर अमेरिका-इराण संबंध कायमच संघर्षमय राहिले. अलिकडच्या काळात अमेरिका आणि इस्रायलने इराणमधील सत्तांतर घडवून आणण्यासाठी थेट किंवा अप्रत्यक्ष प्रयत्न केल्याचे संकेत दिसून येतात. लष्करी कारवाया, आर्थिक निर्बंध, सायबर हल्ले आणि राजकीय दबाव अशा अनेक माध्यमांमधून इराणला कमकुवत करण्याचा प्रयत्न झाला, तथापि या सर्व प्रयत्नांनंतरही इराणची सत्ताव्यवस्था कोसळली नाही. उलटपक्षी, ती अधिक कणखरपणे टिकून राहिल्याचे दिसते. यामागे केवळ लष्करी ताकद नाही, तर इराणच्या राजकीय रचनेची वैशिष्ट्ये, वैचारिक आधार आणि संस्थात्मक संरचना यांचा मोठा वाटा आहे. इराणविरुद्ध अमेरिकेची भूमिका गेल्या चार दशकांमध्ये सतत कठोर राहिली आहे. विशेषतः अणुकार्यक्रमाच्या प्रश्नावरून आणि मध्यपूर्वेत इराणच्या वाढत्या प्रभावामुळे अमेरिका आणि इस्रायल दोघेही चिंतेत राहिले. त्यामुळे आर्थिक निर्बंध, गुप्त कारवाया, विरोधी गटांना समर्थन यांचा वापर करून इराणची सत्ता कमकुवत करण्याचा प्रयत्न करण्यात आला. काही वेळा लष्करी कारवायांचाही अवलंब करण्यात आला. इराणच्या संरक्षणव्यवस्थेला धक्का देण्यासाठी हवाई हल्ले, लष्करी तळांवर लक्ष्यित कारवाया किंवा अणुसंशोधनाशी संबंधित केंद्रांवर दबाव टाकण्याचे प्रयत्न झाले. या सर्व कारवायांचा मुख्य उद्देश एकच- इराणमधील विद्यमान राजवट अस्थिर करणे आणि अखेरीस सत्तांतर घडवून आणणे. प्रत्यक्षात मात्र या प्रयत्नांना अपेक्षित यश मिळालेले दिसत नाही. असे का घडत आहे?

इराणची सत्ताव्यवस्था एखाद्या व्यक्तीभोवती केंद्रित नसून अनेक संस्थांवर आधारित आहे. त्यामुळे एखादा नेता किंवा पदाधिकारी गमावला, तरी संपूर्ण व्यवस्था ढासळत नाही. सर्वोच्च नेत्याबरोबरच अनेक धार्मिक, राजकीय आणि लष्करी संस्था सत्तेचा भाग आहेत. इराणमधील सर्वांत प्रभावशाली संस्था म्हणजे 'इस्लामिक रिव्होल्युशनरी गार्ड कॉर्प्स' (आयआरजीसी). हे दल केवळ लष्करी शक्ती नसून राजकीय आणि आर्थिक क्षेत्रातही मोठा प्रभाव राखते. क्षेपणास्त्र कार्यक्रम, ड्रोन तंत्रज्ञान आणि अनेक रणनीतिक क्षेत्रांवर या दलाचे नियंत्रण आहे. महत्त्वाचे म्हणजे, ही संस्था वैचारिकदृष्ट्या इस्लामिक क्रांतीशी बांधील आहे. त्यामुळे बाह्य दबावामुळे तिची निष्ठा सहज डळमळीत होत नाही. इराणमध्ये राजकीय व्यवस्था केवळ प्रशासनिक रचनेवर नाही, तर वैचारिक आधारावर उभी आहे. शिया धार्मिक परंपरा, क्रांतीचा वारसा आणि परकीय हस्तक्षेपाविरोधातील राष्ट्रवादी भावना यामुळे सत्तेला व्यापक वैचारिक आधार मिळतो. परकीय हस्तक्षेप वाढला की अनेकदा ही राष्ट्रवादी भावना तीव्र होते आणि सत्तेला अधिक पाठिंबा मिळतो. इराणच्या अर्थव्यवस्थेचा मोठा भाग राज्याशी संबंधित संस्थांच्या ताब्यात आहे. धर्मादाय ट्रस्ट, सरकारी उद्योग आणि लष्करी संस्थांचे व्यावसायिक नेटवर्क यामुळे सत्तेशी निष्ठावान वर्ग तयार झाला आहे. या आर्थिक संरचनेमुळे सत्ताधारी अभिजात वर्गाचे हितसंबंध विद्यमान व्यवस्थेशी घट्ट जोडले गेले आहेत. इराणमध्ये सरकारविरोधी असंतोष आहे; परंतु संघटित नसून सुधारणावादी, राजेशाही समर्थक, डावे गट अशा गटांमध्ये विभागलेला आहे. त्यामुळे सत्तेला प्रभावी आव्हान निर्माण होत नाही.

इराणची राजकीय व्यवस्था पारंपरिक हुकूमशाहीसारखी नाही. ती अनेक सत्ताकेंद्रांवर आधारित आहे. धार्मिक नेतृत्व, लष्कर, निवडून आलेले प्रतिनिधी आणि न्यायसंस्था या सर्वांचा सत्ताव्यवस्थेत सहभाग आहे. देशात निवडणुका होतात. राष्ट्रपती आणि संसद निवडली जाते; मात्र उमेदवारांची तपासणी आणि राजकीय प्रक्रियेवर नियंत्रण ठेवणाऱ्या संस्थांमुळे ही लोकशाही मर्यादित स्वरूपाची राहते. याशिवाय, देशातील सुरक्षा यंत्रणा अत्यंत मजबूत मानली जाते. व्यापक पाळत ठेवण्याची व्यवस्था, इंटरनेट नियंत्रण आणि कठोर कायदे यामुळे मोठ्या प्रमाणावर बंडखोरी करणे कठीण होते. इतिहास सांगतो की परकीय लष्करी हस्तक्षेप अनेकदा अपेक्षित परिणाम देत नाही. अफगाणिस्तान, इराक किंवा लिबिया यासारख्या उदाहरणांमध्ये हस्तक्षेपानंतर राजकीय अस्थिरता वाढल्याचे दिसून आले. यामुळे इराणमधील अनेक नागरिकही बाह्य हस्तक्षेपाबाबत सावध भूमिका घेतात. सरकारविरोधी असंतोष असला, तरी परकीय शक्तींच्या मदतीने सत्तांतर व्हावे अशी सर्वांची इच्छा नसते. इराणमध्ये सामाजिक आणि आर्थिक असंतोष वाढत असल्याचे अनेक निरीक्षक मानतात. तरुण पिढी अधिक जागतिक विचारांची आहे आणि ती राजकीय बदलांची मागणी करते. त्यामुळे भविष्यात बदलाची शक्यता पूर्णपणे नाकारता येत नाही. तथापि, सध्या तरी इराणची राजकीय व्यवस्था संस्थात्मकदृष्ट्या मजबूत आहे. त्यामुळे बाह्य दबाव किंवा मर्यादित लष्करी कारवायांमुळे तकाळ सत्तांतर घडेल असे दिसत नाही.

इराणी इस्लामिक क्रांती घडून चार दशकांहून अधिक काळ उलटला असला, तरी इराण आज पुन्हा एका मोठ्या राजकीय आणि लष्करी संकटाच्या उंबरठ्यावर उभा आहे. अलिकडे अमेरिका आणि इस्रायल यांनी केलेल्या संयुक्त हवाई हल्ल्यांमध्ये इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खामेनी आणि काही वरिष्ठ लष्करी कमांडर मारले गेल्याच्या बातम्यांनी मध्यपूर्वेतील राजकारण ढवळून निघाले आहे. या हल्ल्यांमध्ये इराणच्या महत्त्वाच्या पायाभूत सुविधांचेही मोठे नुकसान झाले. यानंतर अमेरिका आणि इस्रायलने इराणमध्ये सत्तापालट घडवून आणण्याचे संकेत दिले, इतकेच नव्हे, तर इराणी जनतेलाही विद्यमान सरकार उलथवून टाकण्याचे आवाहन करण्यात आले. केवळ बाह्य लष्करी हल्ल्यांमुळे इराणची सत्ताकठोर व्यवस्था सहज कोसळेल असे मानणे भाबडेपणाचे ठरेल. कारण इस्लामिक क्रांतीनंतर या देशात अशी एक राजकीय रचना निर्माण झाली आहे, जी मोठ्या धक्क्यांनाही तोंड देण्यास सक्षम आहे. कडक नियंत्रित संस्था, वैचारिक प्रशिक्षण, सत्ताधारी वर्गातील ऐक्य आणि विखुरलेला विरोध या सर्व घटकांनी मिळून ही व्यवस्था टिकवून ठेवली आहे. खामेनी यांच्या मृत्यूनंतर त्यांचे पुत्र मोज्तबा खामेनी यांची सर्वोच्च नेते म्हणून निवड झाली. अनेक विश्लेषकांच्या मते ते आपल्या वडिलांची कठोर आणि पाश्चात्त्यविरोधी धोरणे पुढे चालू ठेवतील. त्यामुळे सत्तेमध्ये मूलभूत स्वरूपात बदल होण्याची शक्यता सध्या तरी कमी मानली जात आहे.

इस्लामिक क्रांतीनंतर इराणमध्ये धार्मिक, राजकीय आणि शैक्षणिक संस्थांचे विस्तृत जाळे उभे राहिले. या संस्थांद्वारे राज्याची विचारसरणी पिढ्यान्पिढ्या पुढे पोहोचवली जाते. शिया धर्मातील 'शहादत' किंवा बलिदानाची परंपरादेखील राजकीय निष्ठेला बळकटी देणारी ठरली आहे. यामुळे सत्तेप्रति निष्ठा केवळ राजकीय नसून वैचारिक आणि धार्मिक स्वरूपाचीही बनते. अनेक विश्लेषकांच्या मते हीच व्यवस्था इराणला इतर अनेक मध्यपूर्व देशांपेक्षा वेगळे आणि टिकाऊ बनवते. इराणमध्ये अनेक सरकारविरोधी चळवळी उभ्या राहिल्या. २००९ मधील 'ग्रीन मूव्हमेंट' असो किंवा महसा अमिनी यांच्या मृत्यूनंतर २०२२ मध्ये उसळलेल्या आंदोलनांच्या लाटेने राजवटीविरोधातील असंतोष स्पष्ट केला, तरीही या चळवळींमध्ये एकत्रित नेतृत्वाचा अभाव राहिला आणि कठोर दडपशाहीमुळे त्यांना यश मिळाले नाही.

(लेखक राज्यशास्त्राचे अभ्यासक आहेत.)

## वेध

# गॅस टंचाईचा भडका; अवकाळीचा तडाखा

**नितीन शिरसाट**

आखाती देशात सुरू असलेल्या युद्धाचा फटका पेट्रोल, डिझेल यासह दररोज स्वयंपाक घरातील घरगुती गॅस सिलेंडरच्या पुरवठ्याला बसत आहे. इंधन तुटवड्यामुळे ग्रामीण व शहरी भागात पुन्हा एकदा गॅसचा भडका उडाला आहे. त्यातही गॅस सिलेंडर चोरीच्या घटना व छुप्या अवैध मार्गाने गॅस विक्रीत वाढ झाली आहे. घरगुती गॅस सिलेंडरचा सर्रास वापर हॉटेल व्यावसायिक तसेच चौपाटीवर व्यवसाय करणारे लहान व्यावसायिक करीत असल्याने जिल्हा प्रशासनाने महसूल व पुरवठा विभागाचे पथक तयार करून धाडसत्र सुरू केले आहे. गॅस सिलेंडरच्या टंचाईने ग्रामीण भागात मातीच्या चुलींचा वापर वाढला आहे. सिलेंडरच्या किमतीत वाढ झाल्याने सामान्य नागरिकांना परवडत नसल्याने लाकूड व गोवऱ्या वापरून चुलीवर स्वयंपाक करण्याकडे महिलांचा कल वाढला आहे. गॅस टंचाई वाढल्याने आजही कोणतीही यंत्रसामुग्री न वापरता पूर्णपणे हाताने तयार केलेल्या मातीच्या चुलींना मागणी वाढली असून जुन्या काळातील चुलीवरच्या जेवणाची आठवण केली जात आहे. सध्या हॉटेल व्यावसायिक व घरगुती ग्राहकांकडून चुलीला मागणी वाढली आहे.

पारंपरिक पद्धतीने माती व शेणापासून बनविल्या जाणाऱ्या चुलींना मोठी मागणी आहे. घरगुती चूल २५० रुपयांपासून ते ३०० रुपयांपर्यंत तर हॉटेल व्यावसायिकांसाठी मोठी चूल ७०० ते एक हजार रुपयांपर्यंत मिळत आहेत. आजही चुलीवरच्या भाकरीची चव आवडत असल्याने घरात गॅस असला तरी काही लोक मातीच्या चुली घेऊन जात आहे. आखाती देशांमधील वाढत्या तणावाचा आणि इराण-इस्रायल युद्धाचा थेट परिणाम आता सर्वसामान्यांच्या खिशावर होऊ लागला आहे. आंतरराष्ट्रीय पातळीवरील आयात विस्कळीत झाल्याने गेल्या काही दिवसांत खाद्यतेलाच्या किमतीत वाढ झाली आहे.

हिंदुस्थान पेट्रोलियम एच. पी. गॅस, इंडियन गॅस, भारत गॅस यासह इतर कंपन्यांच्या सिलेंडर विक्री केंद्रावर ग्राहकांच्या रोज सकाळी ७ वाजेपासून सिलेंडरचा ट्रक संपेपर्यंत लांबलचक रांगा आहेत. बुलढाणा शासकीय रुग्णालयाच्या स्वयंपाकघरातून चोरट्यांनी काही दिवसांपूर्वी सिलेंडर चोरून नेल्याची घटना घडली आहे. अशा घटना दिवसेंदिवस वाढत आहे. त्यातही ज्यांना सिलेंडरची बुकिंग मोबाईलवर करावी लागते त्यांना केवायसी बंधनकारक करण्यात आली आहे. संगणक यंत्रणा ठप्प झाल्याने ग्राहकांची केवायसी अडकून पडली आहे. तर दुसरीकडे निसर्गाच्या अवकाळी लहरीपणाचा फटका शेतकऱ्यांना बसला आहे. राज्यात अनेक ठिकाणी गारांसह वादळी वाऱ्यासह पाऊस पडल्याने शेतीपिके फळबाग भाजीपाल्याचे मोठे नुकसान झाले आहे. लवकरच पंचनामे करून नुकसानभरपाई देण्याची मागणी शेतकरी करत आहेत. पश्चिम विदर्भातील अकोला, बुलढाणा, वाशीम, मराठवाड्यातील जालना, छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, धाराशिव यासह इतर जल्ह्यातील गहू, कांदा, मका, ज्वारी यासह द्राक्षे, मोसंबी, केळी, डाळिंब, टरबूज, भाजीपाला शिवाय यावर्षी लवकरच आलेला आंब्याचा मोहर व कैऱ्या गारपिटीने व वादळी पावसाने उन्मळून पडले आहेत. अवकाळी पावसामुळे शेतात पाणी साचले आहे. कापणी करून ठेवलेले पीकही पावसात भिजल्याने शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान वाढले आहे. हवामानातील या अचानक बदलामुळे शेतकऱ्यांवर दुहेरी संकट ओढवले आहे. प्रशासनाकडून नुकसानीचे पंचनामे करून मदत देण्याची मागणी शेतकऱ्यांकडून होत आहे. अकोला, बुलढाणा आणि वाशीम या तीन जिल्ह्यांत १८ व १९ मार्च रोजी अवकाळी पावसासह गारपीट झाली. यात रबीतील पिकांसह उन्हाळी पिकांना मोठा फटका बसला आहे. एकट्या बुलढाणा जिल्ह्यात गारपीट व अवकाळी पावसामुळे १३ पैकी ११ तालुक्यांत ३ हजार ८०२ हेक्टरवरील पिकांचे नुकसान झाले आहे वीज पडल्याने एकाचा मृत्यू झाला. दुसरीकडे शेगाव तालुक्यातील आळसणालगत असलेल्या खेर्डा शिवारात अवकाळी पावसादरम्यान वीज पडून छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील सोयगाव तालुक्यात येत असलेल्या किन्ही येथील आबा हिरामण माळी यांचा मृत्यू झाला. देऊळगाव राजा, लोणार आणि चिखली तालुक्यात गारपीट झाली. यासोबतच मोताळा आणि मलकापूर तालुक्यातील जळगाव खान्देश जिल्ह्याच्या सीमेलगत असलेल्या पट्ट्यात वादळी वाऱ्यासह पाऊस व तुरळक गारपीट होऊन नुकसान झाले आहे. शेतकऱ्यांच्या आशांवर पाणी फेरले. उभे पीक भिजल्याने व नुकसान झाल्याने अपेक्षित नफा हातातून निसटला असून, आधीच वाढत्या खर्चाच्या ओझ्याखाली दबलेल्या शेतकऱ्यांसमोर नव्या आर्थिक संकटाची स्थिती निर्माण झाली आहे. मका, ज्वारी, गहू, हरभरा, कांदा, केळी, पपई, बाजरी, चिया, संत्रा, मोसंबी व आंबा या पिकांचे नुकसान झाले आहे. नुकसाग्रस्तांचे पंचनाने तातडीने करण्याच्या सूचना केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी प्रशासनाला दिल्या आहेत. अस्मानी व सुलतानी संकटात सध्या सर्वसामान्य तसेच शेतकरी आर्थिक टंचाईचा सामना करीत आहे.

९८८१७१७८२८

## प्रासंगिक

# पाण्यासाठी लोकचळवळ उभारूया

**सी. आर. पाटील**

जागतिक जल दिन नुकताच साजरा करण्यात आला. या दिवसाच्या निमित्ताने पाण्याचे आपल्या जीवनात असलेले मध्यवर्ती स्थान तसेच भविष्यासाठी त्याचे संवर्धन आणि संरक्षण करण्याच्या आपल्या सामूहिक जबाबदारीची आठवण करून दिली जाते.

पाण्यामुळे सजीव, परिसंस्था आणि आर्थिक घडामोडी शाबूत राहतात. तरीही या अत्यावश्यक साधनसंपत्तीवर पडणारा ताण वाढत आहे. जगातील जवळपास १८ टक्के लोकसंख्या आणि पशुधन भारतात आहे, परंतु जगातील एकंदर गोड्या पाण्याच्या साठ्यापैकी केवळ ४ टक्केच पाणी भारतात उपलब्ध आहे. वेगाने होत असलेले शहरीकरण, वाढती मागणी आणि हवामान बदल यांमुळे कार्यक्षम आणि जबाबदार जल व्यवस्थापन हे राष्ट्रीय प्राधान्य बनले आहे.

हे आव्हान ओळखून, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारताने जल व्यवस्थापनासाठी एकात्मिक दृष्टिकोन स्वीकारला आहे. जलशक्ती मंत्रालय स्थापन केल्यामुळे जल व्यवस्थापनाशी संबंधित निरनिराळे पैलू एकाच चौकटीत आले असून, सर्वांगीण नियोजनाच्या दिशेने हे निर्णायक स्थित्यंतर आहे.

संवर्धन आणि भूजल पुनर्भरण यावर लक्ष केंद्रित करून धरणे आणि जलाशयांद्वारे साठवण क्षमता वाढवणे; नदीजोडणीद्वारे संतुलित पद्धतीने पाणीवाटप शक्य करणे; जल जीवन मिशन आणि आधुनिकीकृत सिंचन क्षेत्र विकास यांसारख्या कार्यक्रमांतर्गत पाण्याची उपलब्धता वाढवणे; नमामि गंगेसारख्या उपक्रमांतर्गत पाण्याची गुणवत्ता सुधारणे; तसेच संशोधन, नवोन्मेष आणि जनजागृतीद्वारे लवचीकता निर्माण करणे यासारख्या उपायांद्वारे हा दृष्टिकोन संपूर्ण जलचक्रात येणाऱ्या समस्या दूर करण्याचा प्रयत्न करतो. एकत्रितपणे, या सर्व प्रयत्नांतून दीर्घकालीन जलसुरक्षेबाबतची व्यापक दूरदृष्टी दिसून येते.

जल व्यवस्थापन ही त्याच्या सर्व आयामांसह लोकचळवळ बनली पाहिजे ही बाब मान्य करणे ही गोष्ट या व्हिजनच्या केंद्रस्थानी आहे. शासकीय उपक्रमांमुळे आवाका वाढतो आणि दिशा मिळते, परंतु जेव्हा नागरिक सक्रियपणे सहभागी होऊन जबाबदारी हाती घेतात, तेव्हाच चिरस्थायी परिणाम साधला जाऊ शकतो.

प्रत्येक ग्रामीण कुटुंबाला सुरक्षित आणि पुरेसा पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्यासाठी जल जीवन मिशन हा जगातील सर्वांत मोठा कार्यक्रम राबवला जात आहे. त्यामुळे आतापर्यंत १५.८ कोटींहून अधिक ग्रामीण कुटुंबांपर्यंत नळाद्वारे पाणी पुरवठ्याची सोय पोहोचली असून, त्यामुळे त्यांच्या राहणीमानाचा दर्जा सुधारला आहे. या मिशनमुळे लाखो महिलांना पाणी भरण्यासाठी करावे लागणारे कष्ट कमी झाले आहेत, त्यांचे आरोग्य सुधारले आहे शिवाय, शिक्षण आणि



चरितार्थासाठी अर्थार्जनामध्ये त्यांचा सहभाग वाढला आहे. या मिशनमध्ये पायाभूत सुविधा उभारणीच्या पलीकडे, ग्रामपंचायती आणि ग्राम जल आणि स्वच्छता समित्या यांना केंद्रस्थानी ठेवून सामुदायिक सहभागावरही प्रकर्षाने भर दिला जात आहे. महिलांना पाण्याच्या गुणवत्तेवर देखरेख ठेवण्याचे प्रशिक्षण दिले जात असल्यामुळे स्थानिक पातळीवर हे आपले काम असल्याच्या भावनेला बळकटी मिळत आहे. नमामि गंगे कार्यक्रमामुळे गंगा आणि तिच्या उपनद्यांमधील पाण्याची गुणवत्ता सुधारली आहे तसेच त्यातील सजीवांच्या परिसंस्थेचे पुनरुज्जीवन होण्यासही मदत झाल्यामुळे गंगेतील डॉल्फिनसह इतर महत्त्वाच्या जलचर प्रजातींच्या अधिवासात आणि संख्येतही वाढ झाली आहे. निर्मल आणि अविरल गंगा या उद्दिष्टावर लक्ष केंद्रित करण्यासोबतच, हा कार्यक्रम उपजीविका, सजगता आणि स्थानिक सहभागाला संवर्धन प्रयत्नांची जोड देऊन नदी पुनरुज्जीवनात समुदायांच्या सहभागाला प्राधान्य देणाऱ्या अर्थ गंगा आणि जन गंगा यासारख्या उपक्रमांमध्येही प्रगती करत आहे. जलशक्ती अभियानाच्या माध्यमातून जलसंधारण ही एक जनचळवळ बनली आहे. पाऊस - जिथे पडेल, जेव्हा पडेल, तिथे तो साठवा या पंतप्रधानांच्या आवाहनाने देशभरातील लोकांना कृती करण्यास प्रेरित केले आहे. जल संचय जन भागीदारी उपक्रमांतर्गत, पर्जन्यजल संचयन, पारंपरिक जलस्रोतांचे पुनरुज्जीवन, पाणलोट क्षेत्रांचा विकास आणि वृक्षारोपण यासारखी कामे सामुदायिक पातळीवर हाती घेतली जात आहेत.

या प्रयत्नांमुळे, सप्टेंबर २०२४ पासून ४५ लाखांहून अधिक जलसंवर्धन संरचनांची निर्मिती झाली आहे, शासकीय उपक्रमांचे पाठबळ मिळाल्यास सामुदायिक सहभागातून किती मोठ्या प्रमाणात परिणाम साध्य करता येतात हेच यावरून दिसून येते. संपूर्ण भारतात अशा सहभागाची उदाहरणे सहजपणे दिसून येतात. गुजरातच्या बनासकांठामध्ये, सहकारी दुग्ध संस्थांनी शेतकऱ्यांसोबत भागीदारी करून कमी खर्चात पुनर्भरण संरचनांची उभाणी केली आहे. छत्तीसगडमधील कोरा येथे, शेतकऱ्यांनी केवळ भूजल पुनर्भरणासाठी आपल्या जमिनीचा काही हिस्सा दिला आहे. शहरी भागांमध्ये, निवासी वस्त्या पावसाचे पाणी साठवण्याच्या आणि त्याचा पुनर्वापर करण्याच्या पद्धतींचा अवलंब करत आहेत. 'कर्मभूमी से मातृभूमी'सारखे उपक्रम जबाबदारीची वाढती भावना दर्शवतात, त्यामध्ये व्यक्ती आपापल्या मूळ गावी संवर्धनाच्या प्रयत्नांमध्ये योगदान देत आहेत. जलसुरक्षा सुनिश्चित करण्यात उद्योग आणि कृषी या क्षेत्रांची महत्त्वाची भूमिका आहे. अनेक उद्योग स्वेच्छेने जल लेखापरीक्षण, पुनर्वापर, शून्य द्रव विसर्जन आणि पर्जन्यजल संचयन यासारख्या सर्वोत्तम पद्धतींचा अवलंब करत असून त्याला जल तंत्रज्ञानात सातत्याने लागत असलेल्या नवनवीन शोधांची मदत होत आहे. कृषी क्षेत्रात, कमांड एरिया डेव्हलपमेंटचे आधुनिकीकरण यासारख्या कार्यक्रमांच्या साहाय्याने, सूक्ष्म-सिंचन, शेतामध्ये सुधारित जल व्यवस्थापन आणि उपलब्ध संसाधनांचा उत्तम वापर यासारख्या उपाययोजना सर्व प्रदेशांमध्ये अवलंबल्या जात आहेत, त्यामुळे शेतकऱ्यांना उदरनिर्वाहासाठी आधार मिळण्यासोबतच पर्यावरण रक्षणासाठीही त्यांची मदत होत आहे. भारताच्या शहरी भागातही पर्जन्यजल संचयन, सांडपाण्याचा पुनर्वापर आणि शाश्वत नियोजनाच्या माध्यमातून संवर्धनाची संस्कृती अंगीकारली गेली पाहिजे. पाण्याचा जबाबदारीने वापर होईल हे सुनिश्चित करण्यात प्रत्येक कुटुंब, संस्था आणि समुदायाचीही भूमिका आहे. भारताचा जलसुरक्षेच्या दिशेने होणारा प्रवास हा एक सामूहिक राष्ट्रीय प्रयत्न असून, तो विकसित भारत घडवण्यासाठी अत्यावश्यक आहे.

जागतिक जल दिनाचे औचित्य साधून, आपण जागरूकतेच्या पलीकडे जाऊन कृती करण्याच्या दिशेने पावले उचलूया. प्रत्येक नागरिकाने जरी एक लिटर पाणी वाचवले, त्याचा पुनर्वापर केला किंवा त्याचे पुनर्भरण केले, तर एक राष्ट्र म्हणून आपल्याला १४० कोटी लिटरहून अधिक पाण्याची बचत करता येईल. पाणी वाचवणे ही एक दैनंदिन सवय बनू द्या. जल-सुरक्षित भारत - जिथे प्रत्येक थेंब मौल्यवान समजला जाईल, प्रत्येक स्रोताची देखभाल केली जाईल आणि प्रत्येक नागरिक या अनमोल संसाधनाचा संरक्षक बनेल, असा भारत केवळ धोरणांच्या माध्यमातूनच नव्हे, तर येथील लोकांनी त्यांच्या दैनंदिन जीवनात निवडलेल्या पर्यायांमुळेही घडविता येईल.

(लेखक केंद्रीय जलशक्ती मंत्री आहेत)

## वाचक पत्रे

### रामराज्याचा आदर्श आणि वास्तवता

प्रभू श्रीराम यांनी अयोध्येचे 'अ योध्येपण'म्हणजेच शांतता, सुव्यवस्था आणि धर्मनिष्ठा कधीही भंग होऊ दिले नाही. ''जननी जन्मभूमिश्च स्वर्गादपि गरीयसी'' ही भावना त्यांनी आपल्या आचरणातून साकारली. मातृभूमीचे रक्षण, प्रजेचे कल्याण आणि न्यायनिष्ठ राज्यकारभार हेच त्यांच्या जीवनाचे केंद्रबिंदू होते. रामराज्याची संकल्पना म्हणजे प्रजेच्या सुखाला सर्वोच्च स्थान देणारी व्यवस्था. त्या काळात राजा स्वतःच्या वैयक्तिक सुख-दुःखांपेक्षा समाजहिताला प्राधान्य देत होता. निर्णयप्रक्रियेत पारदर्शकता होती आणि प्रजेला न्याय मिळत असल्याचा ठाम विश्वास होता. आजच्या काळात आपण पाहतो की, विज्ञान-तंत्रज्ञानाच्या प्रगतीसोबत अनेक क्षेत्रांत विकास होत असला, तरी सामाजिक आणि नैतिक आव्हानेही वाढताना दिसतात. सीमांवरील तणाव, अंतर्गत सुरक्षेची चिंता, तसेच काही ठिकाणी वाढणारा स्वार्थ आणि भ्रष्टाचार यामुळे समाजात अस्वस्थतेचे वातावरण निर्माण होते. व्यक्तीच्या प्रगतीबरोबरच समाजहिताची जाणीव टिकवून ठेवणे ही काळाची गरज आहे.

रामांच्या दूरदृष्टीचे उदाहरण म्हणजे हनुमानावर सोपवलेली जबाबदारी. दक्षिण दिशेकडे लक्ष ठेवून राष्ट्राच्या सुरक्षेची जाणीव त्यांनी कायम ठेवली. तसेच बिभीषणाला लंकेचे राज्य देताना धर्माधिष्ठित नेतृत्वाची स्थापना केली. आजच्या समाजानेही या तत्त्वांचा विचार करण्याची गरज आहे. न्याय, कर्तव्यनिष्ठा, पारदर्शकता आणि राष्ट्रभक्ती. शासन आणि नागरिक यांच्यात विश्वासाचे नाते निर्माण होणे, तसेच प्रत्येकाने आपली सामाजिक जबाबदारी ओळखणे, हे अत्यंत आवश्यक आहे. रामराज्य हे त्रेतायुगातील अध्यात्मातील आदर्श नसून, वर्तमानाला दिशा देणारे मूल्य आहे. प्रत्येकाने आपल्या आचरणात सत्य, धर्म आणि कर्तव्य यांचा स्वीकार केला, तरच खऱ्या अर्थाने रामराज्य साकार होऊ शकते. या राम नवरात्राच्या काळात, प्रभू श्रीरामांच्या आदर्शांचे स्मरण करून आपणही एक संकल्प करूया. आपल्या जीवनात सत्य, कर्तव्य आणि राष्ट्रनिष्ठा यांचा दृढपणे स्वीकार करण्याचा. आपल्या कृतीतून समाजहित जपण्याचा आणि नैतिक मूल्यांचे पालन करण्याचा प्रयत्न करूया.

**रमा देशमुख**/नागपूर

### वणवे रोखा, निसर्गसंपदा वाचवा!

उन्हाळ्यात ठिकठिकाणी वणवे लागून व काही समाजकंटकामार्फत वणवे लावून वर्षानुवर्षे वाढवलेली बहुमोल निसर्गसंपदा आगीच्या भक्ष्यस्थानी पडत असते. उन्हाळ्यात लागणारे हे वणवे नैसर्गिक असल्याचे भासवले जाते पण हे यातील बरेचसे वणवे मानवनिर्मितच असतात हे उघड सत्य आहे. काही समाजकंटक जाणीवपूर्वक शहराजवळच्या डोंगरावरील हिरवाईला वणवे लावून ती नष्ट करतात. चराईकरिता चांगले गवत यावे या हेतूने हे वणवे लावले जातात. (आग लागल्यावर चांगले व भरपूर गवत उगवते हा त्या मागचा उद्देश असतो.) लाकूडफाटा, कोळसा मिळवण्यासाठी तसेच शेती व शिकारीसाठी जमीन तयार करण्यासाठी या बहुमोल निसर्गसंपदेला आगी लावल्या जातात. या आगीत वृक्ष, वनस्पती, वन्यजीवांची हानी, स्थलांतर यामुळे जे नुकसान होत असते त्याची भरपाई होण्यास खूप वर्षांचा कालावधी जातो. निसर्गाची अपरिमित हानी होते. या आगीमुळे पर्यावरणाची हानी तर होतेच पण कार्बनडायऑक्साईडही वातावरणात वाढतो. त्यामुळे पृथ्वीचे तापमान वाढते. एकूणच झाडांना लावल्या जाणाऱ्या या आगी म्हणजे राष्ट्रीय हानी आहे. असे असतानाही या मानवनिर्मित वणव्यांकडे केंद्र व राज्याचे वने आणि पर्यावरण खाते, पोलिस खाते दुर्लक्ष करीत असतात. आगी लावणाऱ्या या समाजकंटकांवर पोलिस तसेच प्रशासन कोणतीही कारवाई करीत नाही. त्यामुळेच वणव्यांच्या घटनांत वाढ होताना दिसत आहे. काही भ्रष्ट कर्मचारी आणि अधिकारी यांच्यामुळे निसर्गाची कधीही भरून न निघणारी हानी होत आहे, म्हणूनच सरकारने या वणव्यांची गांभीर्याने दखल घ्यायला हवी. वणवे लावून पर्यावरणाची हानी करणाऱ्या समाजकंटकांवर कठोर कारवाई व्हायला हवी. वणव्यांमुळे पर्यावरणाची होणारी हानी टाळायची असेल तर मानवनिर्मित वणवे रोखायलाच हवे.

**श्याम ठाणेदार**/९९२२५४६२९५

### छ. संभाजी महाराजांचा आदर्श

लव्ह जिहादच्या माध्यमातून हिंदू मुलींना भावनिक जाळ्यात ओढून त्यांचे धर्मांतर केले जात आहे. स्वातंत्र्योत्तर काळात हिंदूंच्या असंघटितपणामुळे हिंदू स्वदेशातच अल्पसंख्यक होत आहेत. १९४७ मध्ये भारतात ८.१ टक्के असलेली मुस्लिमांची संख्या २०२६ पर्यंत २० टक्क्यांच्या आसपास पोहोचण्याची शक्यता आहे. पीएफआयसारखी संघटना भारताला २०४७ पर्यंत इस्लामिक राष्ट्र बनवण्याचे स्वप्न पाहत आहे. वक्फ कायदा, लॅण्ड जिहाद आणि लव्ह जिहाद याद्वारे जिहादी कारवायांचे षडयंत्र रचले जात आहे. ही संकटे रोखण्यासाठी हिंदूंनी आता छत्रपती संभाजी महाराजांचा आदर्श डोळ्यांसमोर ठेवून संघटित होणे अनिवार्य आहे.

**अपर्णा जगताप**/पुणे

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# माजलगावात अज्ञात वाहनाच्या धडकेने उंट जखमी
## गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु

तभा. वृत्तसेवा

**माजलगाव** | माजलगाव गेवराई या राष्ट्रीय महामार्गावर अज्ञात चार चाकी वाहनाने रोडवर चालणाऱ्या उंटाला जोराची धडक दिल्याने उंटाचा पाय मोडला आहे शहर पोलीस ठाण्यामध्ये गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

उंटावर लहान मुलांना बसून आपला उदरनिर्वाह करणारे टाकरवन येथील कुटुंब आहे ते दररोजच्यासारखे आपला उंट घेऊन व्यवसाय करण्यासाठी व्यवसाय करण्यासाठी दिनांक २४ मार्च रोजी सकाळी पावणे नऊ वाजण्याच्या सुमारास माजलगाव गेवराई रोड वरून माजलगावात येत असताना कन्यादान मंगल कार्यालयाच्या समोर माजलगाव कडून गेवराई कडे जाणाऱ्या चार चाकी वाहनाने रोडवर चालणाऱ्या उंटाला पायाला धडक देऊन सदर चार चाकी वाहन धारक फरार झाला आहे या अपघातामध्ये उंटाच्या मागील उजव्या पायाला जबर मार लागल्याने त्या उंटाचा



पाय मोडला आहे सदर उंट गंभीर जखमी झाला असून शेअर पोलीस ठाण्यामध्ये अज्ञात वाहनाच्या विरोधात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे सदर उंटावर परभणी येथील रुग्णालयात उपचार करण्यासाठी दाखल केले आहे

# वाहेगाव आम्ला येथे भागवत कथेचे आयोजन

**बीड** | तालुक्यातील मौजे वाहेगाव आम्ला येथे संगीतमय भागवत कथेचे आयोजन करण्यात आले असून बीड येथील भागवताचार्य सचिन महाराज सपकाळ यांच्या अमृततुल्य वाणीतून ही भागवत कथा श्रवण करण्यास मिळणार आहे. कथेची सांगता दि.३० मार्च सोमवार रोजी होणार आहे. कथेची वेळ सकाळी ११ ते दुपारी ३ अशी आहे. या भागवत कथेस माऊली महाराज घुमरे - सिंथ-गायन, मातोश्री कुसुमताई सपकाळ - गायन, जगन्नाथ महाराज कराळे-तबला यांची सुंदर संगीत साथ लाभणार आहे.

# माजलगाव वाळू तस्करी प्रकरणाची सखोल चौकशी करण्यात येईल - मुख्यमंत्री

तभा. वृत्तसेवा

**मुंबई** | बीड जिल्ह्यातील माजलगाव येथे कथित पोलिसांच्या संगनमतातून सुरू असलेल्या वाळू तस्करी प्रकरणात संशयित तीन व्यक्तींचे मोबाईल जप्त करण्यात आले होते. या मोबाईलमधील डिलीट केलेला डेटा देखील अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या मदतीने पुनर्प्राप्त करण्यात आला आहे. मात्र या सर्व डेटाच्या विश्लेषणानंतरही संबंधितांमधील थेट संगनमत किंवा परस्पर संबंध सिद्ध करणारे ठोस पुरावे मिळाले नाहीत. तरीही या प्रकरणाची गंभीरता लक्षात घेऊन सर्व संभाव्य बाबींची सखोल चौकशी करण्यात येईल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत सांगितले.

बीड जिल्ह्यातील माजलगाव येथे पोलिसांच्या संगनमताने वाळू तस्करी सुरू असल्याबाबत सदस्य प्रकाश (दादा) सोळंके यांनी प्रश्न उपस्थित केला. या चर्चेत सदस्य नाना पटोले, अर्जुन खोतकर यांनी सहभाग घेतला.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, राज्यात लोकल क्राइम ब्रँच (एलसीबी) तसेच गुन्हे अन्वेषणासाठी विशेष पथके कार्यरत असून, विविध प्रकारच्या गुन्ह्यांवर प्रभावी नियंत्रण ठेवण्यासाठी ही यंत्रणा सातत्याने काम करत आहे. काही ठिकाणी गैरव्यवहारांच्या तक्रारींचा विचार करून संबंधित अधिकाऱ्यांच्या नियुक्तीसाठी निकष निश्चित करण्यात आले असून त्याची काटेकोर अंमलबजावणी केली जात आहे.

यावेळी राज्यमंत्री योगेश कदम यांनी माहिती दिली की, या प्रकरणात भ्रष्टाचार प्रतिबंधक विभागामार्फत (एसीबी) कारवाई करण्यात आली असून संबंधित हवालदाराला निलंबित करण्यात आले आहे. जप्त मोबाईलचा फॉरेन्सिक अहवाल नुकताच प्राप्त झाला असून त्यात आरोपी व पोलीस निरीक्षक यांच्यात आक्षेपार्ह संभाषण आढळलेले नाही. तपासाच्या पार्श्वभूमीवर संबंधित पोलिस निरीक्षकाला नियंत्रण कक्षात संलग्न करण्यात आले होते, जेणेकरून चौकशीवर कोणताही प्रभाव पडू नये. अहवालानंतर त्याचा सहभाग नसल्याचे स्पष्ट झाल्याने त्याची पुन्हा बदली करण्यात आल्याचेही राज्यमंत्री कदम यांनी यावेळी सांगितले.

# गिळंकृत करणार्या बीडच्या शिवसेना जिल्हा प्रमुखांना मोठा झटका
## कुटेवाडीत अतिरेक वरचढपणा करणे पडले महागात
## कागदी घोडे नाचवून लाखो रुपयांवर डल्ला मारण्याचा केला प्रयत्न

तभा. वृत्तसेवा

**बीड , प्रतिनिधी** | नको तिथं वरचढपणा करण्याची सवय लागलेल्या बीडच्या शिवसेना जिल्हा प्रमुखांनी कशात काही मिळेल का? या स्वार्थीपणा मुळे त्यांना चांगलाच झटका लागण्याची शक्यता सध्या दिसते. ग्रामपंचायतीपासून ते जिल्हा परिषदेच्या कामांमध्ये कागदी घोडे नाचवून लाखो रुपयांवर डल्ला मारण्याचा प्रयत्न आजवर त्यांनी केला. मात्र रोहयोमधुन बीडच्या कुटेवाडीतील मंजूर रस्ता न करता तो गिळंकृत केल्याचे प्रकरण आत्ता त्यांना चांगलेच महागात पडणार असल्याचे दिसत आहे. दरम्यान या भ्रष्टचार प्रकरणाचा सरपंच सौ. जयश्री गणेश वरेकर यांच्यावर झेडपीचे सीईओ जतिन रहेमान यांनी ठपका ठेवत विभागीय आयुक्तांकडे अपात्रतेच्या कारवाईसाठी प्रस्ताव पाठविला आहे. यामुळे सरपंच जयश्री वरेकर यांच्यावर अपात्रतेची टांगती तलवार निर्माण झाली आहे.


शिवसेना उबाठा गटाचे जिल्हा प्रमुख गणेश वरेकर यांच्या सुविद्य पत्नी सौ. जयश्री गणेश वरेकर ह्या बीड तालुक्यातील कुटेवाडी गावाच्या विद्यमान सरपंच आहेत. गावात विविध विकास योजनांची कामे ही बहुतांश निकृष्ट दर्जाची करण्यात आली असून अनेक बोगस कामे करण्याचा सपाटा त्यांनी लावला. त्यातच महात्मा गांधी रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून गावातील चरकटी ते अंबाबाई मंदिरापर्यंत रस्ता तयार करणे तसेच अंबाबाई मंदिर ते बापुराव कुटे पर्यंत सिमेंट रस्ता करणे या सिमेंट रस्त्याच्या कामाला ३१ मार्च २०२३ रोजी मंजूरी मिळाली. ही दोन्ही कामांसाठी २० लक्ष रुपयांचा मंजूर करण्यात आले. प्रत्यक्ष कामाला सुरवात दि.१ एप्रिल २०२४ रोजी प्रशासकीय मान्यता देण्यात आली.

# चकलांब्यात राजकारण गेलं चुलीत
## श्री रोकडेश्वर जन्मोत्सवाची जय्यत तयारी

तभा. वृत्तसेवा

**बीड** | प्रतिनिधी

प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी चैत्र पौर्णिमेला चकलांबा येथे श्री रोकडेश्वर जन्मोत्सव साजरा करण्यात येणार आहे,तीन दिवस चालणाऱ्या या जन्मोत्सवानिमित्त दि २ एप्रिल रोजी पौर्णिमेच्या दिवशी प्रसिद्ध लेखक आत्माराम सावंत लिखित ३ अंकी राजकारण्यांच्या चौखूर लाथाळ्याचा धमाल कौटुंबिक धिंगाणा असलेले नाटक राजकारण गेलं चुलीत सादर करण्यात येणार आहे,जन्मोत्सवाची जय्यत तयारी सुरू असून यावर्षी प्रेक्षकांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन



... नाट्य ... ादिक ... लांबा ... या ... आहे ... खित राजकारण गेलं चुलीत." या नाट्य प्रयोगाचे दिग्दर्शन इंजि. संतोष पारगावकर,संगीत प्रा.सतीश सुलाखे,प्रशांत सुलाखे,अर्णव सुलाखे यांनी दिले आहे.नाटकातील कलाकार संदीप पारगावकर ,डॉ.विजय सुलाखे,मयूर कुलकर्णी,शुभम चोपडे,दर्शन नाईक,ऋषिकेश सुलाखे,किशोर खेडकर,उन्मेष सुलाखे,संदेश पारगावकर,कृष्णा

# गेवराई तालुक्यात शेतकऱ्यांसाठी हरभरा खरेदी योजना सुरु

तभा. वृत्तसेवा

**बीड** | गेवराई तालुक्यातील शेतकऱ्यांसाठी गेवराई तालुका खरेदी-विक्री संघ (NAFED अंतर्गत) ने हरभरा खरेदी योजना २०२५-२०२६ सुरु केली आहे. या योजनेअंतर्गत हरभरा या पिकाची शासकीय हमीभावाने खरेदी करण्यात येणार आहे.

शेतकऱ्यांसाठी ऑनलाइन नोंदणी प्रक्रिया खरेदी-विक्री संघाचे कार्यालय, गेवराई येथे सुरू झाली असून नोंदणीची अंतिम तारीख ३० मार्च २०२५ आहे. सर्व शेतकऱ्यांनी आवश्यक कागदपत्रांसह आपली नोंदणी वेळेत पूर्ण करावी, असे आवाहन संघाचे सभापती जयदिप औटी यांनी हरभरा खरेदी शुभारंभ प्रकरणी केले.

उपस्थित कार्यक्रमात मार्केट कमेटी सचीव शिवाजी हक्कदार, सचीव एम. आर. गरड, ऑपरेटर काटकर, दत्ता औटी तसेच शेतकरी उपस्थित होते. दरवर्षीप्रमाणे याही वर्षी महाराष्ट्र शासनाने ही योजना मंजूर केली असून, गेवराई तालुक्यातील शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे.

या खरेदी केंद्रावर हरभरा प्रतिकिं टन ५८७५ रुपये या हमीभावाने खरेदी केली जाणार आहे. नोंदणीसाठी शेतकऱ्यांनी खालील कागदपत्रांसह प्रत्यक्ष उपस्थित राहणे आवश्यक आहे:

७/१२ व ८ अ उतारा (ई-पिक पाहणीसह), आधारकार्ड, बँक पासबुक (चालू खाते), जनधन खाते मान्य नाही, शेतकऱ्याचे नाव सातबारावर असणे आवश्यक, शेतकऱ्याने स्वतः कागदपत्रासह उपस्थित राहणे अनिवार्य आहे.

# शिक्षण संस्थेच्या 14 विद्यार्थ्यांची निवड-झायडेक्स इंडस्ट्रीजमध्ये नोकरीची संधी; आकर्षक पॅकेजसह करिअरला नवी दिशा

तभा. वृत्तसेवा

**बीड** | विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी सातत्याने प्रयत्न करणाऱ्या आदित्य शिक्षण संस्थेने कॅम्पस इंटरव्ह्यूत पुन्हा एकदा यशाचा मानाचा तुरा रोवला आहे. ६० विद्यार्थ्यांमधून १४ विद्यार्थ्यांची नामांकित कंपनीत निवड होऊन संस्थेच्या गुणवत्ता व मार्गदर्शनाची पुन्हा एकदा प्रचिती आली आहे. आदित्य कृषी व कृषी जैवतंत्रज्ञान शाखेत १८ मार्च रोजी आयोजित कॅम्पस इंटरव्ह्यूमध्ये वडोदरा येथील झायडेक्स इंडस्ट्रीज प्रा. लि. या नामांकित कंपनीने १४ विद्यार्थ्यांची निवड केली.



दयानंद सिरसाट, बावणे वैभव, अनंता वासू, लांडे आकाश, अमेय गावंडे, हर्षवर्धन शेळके, सचिन राठोड, सुशांत मुंडे, सुनील मदने, तनपुरे संग्राम, लाटे तेजस, रेहान सगीर सय्यद, सचिन धुमाळ, सौरभ जानकर

संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्र सारडा, संचालक डॉ. आदित्य सारडा, संचालिका डॉ. आदिती सारडा यांच्या मार्गदर्शनाखाली संस्थेमध्ये सातत्याने विविध उपक्रम राबवले जात आहेत. या उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांना शिक्षण घेत असताना आणि शिक्षण पूर्ण झाल्यानंतर मोठा लाभ मिळत आहे.

शिक्षणाबरोबर त्यांच्या करिअरसाठी आदित्य शिक्षण संस्था सतत उपक्रमशील असते. या कॅम्पस ड्राईव्हमध्ये आदित्य कृषी शाखेतील १२ विद्यार्थी हर्षवर्धन शेळके,सुशांत मुंडे,अमेय गावंडे, सुनील मदने,सचिन धुमाळ, तेजस लाटे,संग्राम तनपुरे,दयानंद शिरसाट, आकाश लांडे,वैभव भावने, अनंता वासू,रेहान सय्यद व आदित्य कृषी जैवतंत्रज्ञान शाखेतील दोन विद्यार्थी सचिन राठोड आणि सौरभ जानकर , असे एकूण १४ विद्यार्थ्यांनी यश संपादन केले. या यशामुळे संपूर्ण संस्थेत आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्र सारडा, संचालक डॉ. आदित्य सारडा, संचालिका डॉ. आदिती सारडा, आदित्य कृषी शाखेचे प्राचार्य शामजी भुतडा आदींनी केले आहे.

# शेतकऱ्यांची थकीत ऊस बिले एप्रिल अखेर पर्यंत मिळणार

तभा. वृत्तसेवा

**बीड** | बीड जिल्ह्यातील साखर कारखान्यांनी थकवलेली ऊस बिले आणि एफआरपीची रक्कम एप्रिल महिन्याच्या अखेरपर्यंत शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर जमा करण्याचे कडक निर्देश जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी दिले आहेत. थकीत देयकांसाठी शेतकऱ्यांनी आक्रमक पवित्रा घेत जिल्हाधिकाऱ्यांची गाडी अडवून आंदोलन केले होते, ज्याची दखल घेत शुक्रवारी कारखाना प्रशासनासोबत तातडीची बैठक घेण्यात आली. नियमानुसार गाळप झाल्यापासून १४ दिवसांच्या आत ही रक्कम देणे बंधनकारक असतानाही अनेक कारखान्यांनी ती थकवली आहे. आता एप्रिलच्या शेवटच्या आठवड्यात पुन्हा आढावा बैठक घेऊन प्रत्यक्ष पेमेंटची स्थिती तपासली जाईल, असे प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले असून यामुळे हवालदिल झालेल्या ऊस उत्पादक शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे.

# धनगर नेते दीपक बोऱ्हाडे यांचे मुंबईत बेमुदत उपोषण

तभा. वृत्तसेवा

**बीड** | धनगर समाजाला एस.टी. प्रवर्गातील आरक्षणाची अंमलबजावणी करावी या प्रमुख मागणीसाठी धनगर समाजाचे नेते दिपकभाऊ बो-हाडे यांनी मुंबई येथील आझाद मैदानावर गेल्या आठ दिवसांपासून आमरण उपोषण सुरू केले आहे. त्यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत लिंबागणेश येथील धनगर समाज बांधवांनी मोठ्या उत्साहात मुंबईकडे प्रस्थान केले.

यावेळी छत्रपती शिवाजी महाराज चौक ते पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर चौकापर्यंत ताशांच्या गजरात प्रदक्षिणा काढण्यात आली. "येळकोट येळकोट जय मल्हार", "पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकरांचा विजय असो", "दिपकभाऊ तुम्ही आगे बढो, हम तुम्हारे साथ है", "आरक्षण आमच्या हक्काचे, नाही कोणाच्या बापाचे" अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला.

समाज बांधवांनी सरकारकडे मागणी करताना सांगितले की, कोर्ट-कचेरी व समित्यांच्या प्रक्रियेत न अडकता धनगर आणि धनगड हे एकच असल्याचा शासन निर्णय तातडीने घ्यावा. तसेच राज्यपालांच्या स्वाक्षरीसह शिफारस पत्र राष्ट्रपतींकडे पाठवून आरक्षणाचा मार्ग मोकळा करावा. दिपकभाऊ बो-हाडे यांचे उपोषण तात्काळ सोडवून त्यांचा जीव वाचवावा, अशी आग्रही मागणी यावेळी करण्यात आली.

या आंदोलनात राजेभाऊ आप्पा गिरे, बाळासाहेब मुळे, गणपत तागड, रामकिसन गिरे, शहादेव धलपे, संदीप मुळे, रामदास मुळे, बंकट विश्वंभर मुळे, प्रविण मुळे, प्रकाश मुळे आदी सहभागी झाले होते. यावेळी अठरापगड जातीतील समाजबांधवही मोठ्या संख्येने उपस्थित राहून पाठिंबा दर्शवित होते. मराठा सेवक डॉ. गणेश ढवळे, सरपंच बालासाहेब जाधव, बाळकृष्ण थोरात, हरिओम क्षीरसागर, शिवाजी रणखांब, तुकाराम गायकवाड, अरुण निर्मळ आदी मान्यवर उपस्थित होते.

# बीडच्या अध्यक्षपदी राजेश्वर तापडिया तर सचिवपदी विजय डागा यांची निवड

**बीड** | येथील श्री युवा माहेश्वरी संघटनेच्या अध्यक्षपदी राजेश्वर तापडिया यांची तर सचिवपदी विजय डागा यांची निवड करण्यात आली. एमआयडीसी भागात झालेल्या बैठकीत मान्यवरांच्या उपस्थितीत सर्वानुमते ही निवड करण्यात आली.





या बैठकीस महाराष्ट्र प्रदेश माहेश्वरी युवा संघटनेचे माजी सहसचिव अमर सारडा, मावळते अध्यक्ष ऋषीकेश सोहनी, सचिव अनूप चरखा यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी निवडण्यात आलेल्या कार्यकारिणीत उपाध्यक्ष गोपाल लद्दड, कोषाध्यक्ष आशिष कासट, सहसचिव अजय डागा, संघटनमंत्री युवराज चरखा यांचा समावेश आहे. यावेळी संघटनेच्या वतीने आयोजीत करण्यात येणार्या रक्तदान शिबीर, सुंदरकांड, कुलदेवी प्रोजेक्ट, दांडिया यासह इतर उपक्रमांबाबत चर्चा करण्यात आली. बैठकीस युवा माहेश्वरीचे सदस्य मयुर कासट, संतोष तोष्णीवाल, नीरज सारडा, रोशन टवाणी, राहुल लोहीया, पंकज धूत, हेमंत बियाणी, संकेत टवाणी, पंकज भुतडा, कमलेश रांदड, सचिन लड्डा, महेश लड्डा, अमित मंत्री, शुभम सिकची, अमित बाहेती, अभिजित दोड़े, श्रीकांत बियाणी, आशिष चरखा, मयुर काबरा, प्रसाद रांदड, अजय लड्डा, अनिल लड्डा, ऋषीकेश मानधने, पवन भक्कड, संतोष सोमाणी, संकेत टवानी,आकाश चरखा, आनंद चांडक डॉ रमण बियानी, सीए न्यानेश चरखा, रुपेश मानधने, अनुज चरखा, महेश बियानी, संकेत तापडिया, सीए ऋषीकेश मूंदड़ा यांची उपस्थिती होती.

# आष्टीत बुधवारी विराट हिंदू संमेलन शोभायात्रेने होणार सुरुवात

तभा. वृत्तसेवा

**बीड** | भारतमातेला विश्वगुरू पदावर विराजमान करण्यासाठी आणि हिंदू समाजाला संघटित करण्याच्या उदात्त हेतूने आष्टी येथे विराट हिंदू संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. विराट हिंदू संमेलन समिती आष्टी मंडळ यांच्या वतीने बुधवार दि. २५ मार्च रोजी हे संमेलन पार पडणार असून, शहरात कार्यक्रमाची जय्यत तयारी सुरू आहे.

या भव्य संमेलनाची सुरुवात एका विशाल शोभायात्रेने होणार आहे. बुधवारी दुपारी ५ वाजता छत्रपती शिवाजी महाराज चौक येथून या शोभायात्रेला सुरुवात होईल आणि ती मुख्य कार्यक्रमस्थळी म्हणजेच बाजारतळ, आष्टी येथे पोहोचेल. या शोभायात्रेचे विशेष आकर्षण म्हणजे, यात जामखेड (जि. अहिल्यानगर) येथील बबलू वस्ताद टेकाळे यांचे मल्लखांब पथकही सहभागी होणार असून त्यांच्या चित्तथरारक कसरती पाहण्याची संधी नागरिकांना मिळणार आहे. आत्मविस्मृती झालेल्या समाजाला स्वतःच्या शक्तीची आठवण करून देणे आणि देशासमोरील समस्यांचे निराकरण करण्यासाठी सर्वांना एकत्र आणणे हा या आयोजनामागील मुख्य उद्देश असल्याचे सांगण्यात आले आहे. या महत्त्वपूर्ण सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी रामदास महाराज डोरले हे उपस्थित राहणार आहेत. देवगिरी प्रांत हिंदू जागरण मंचचे अध्यक्ष अंबादास अंभोरे हे प्रमुख वक्ते म्हणून उपस्थितांना मार्गदर्शन करतील. यासोबतच भारत भूषण पुरस्कार विजेते समाधान (माय) महाराज श्रीगोंदाकर यांची प्रमुख उपस्थिती या कार्यक्रमाला लाभणार आहे.

कार्यक्रम संपन्न झाल्यानंतर उपस्थित सर्व भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. आष्टी आणि परिसरातील सर्व हिंदू बांधवांनी या संमेलनास आणि शोभायात्रेस सहकुटुंब बहुसंख्येने उपस्थित राहावे आणि महाप्रसादाचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजक 'विराट हिंदू संमेलन समिती, आष्टी मंडळ' यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# उत्कृष्ट शिक्षक घडविण्यासाठी ट्रान्सफॉर्मेटिव्ह एज्युकेशन ही काळाची गरज - सर डॉ.नागेश जोंधळे

तभा. वृत्तसेवा

**अंबाजोगाई** | चांगली, सजग व कार्यक्षम पिढी घडवण्यासाठी अत्याधुनिक प्रशिक्षणातून उत्कृष्ट शिक्षक घडविण्यासाठी ट्रान्सफॉर्मेटिव्ह एज्युकेशन ही काळाची गरज असून त्याचा सकारात्मक परिणाम हा विद्यार्थी व संस्थेच्या गुणवत्ता वाढीसाठी महत्त्वपूर्ण ठरणार असल्याचे प्रतिपादन ॲमेझॉन बेस्ट सेलिंग लेखक तथा शैक्षणिक क्षेत्रातील आंतरराष्ट्रीय पुरस्कार प्राप्त सर डॉ.नागेश जोंधळे यांनी नुकतेच फलटण एज्युकेशन सोसायटीच्या कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग मध्ये ट्रान्सफॉर्मेटिव्ह एज्युकेशन या विषयावर आधारित फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्राम अंतर्गत एफटीपी कार्यशाळेत केले.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.मनोजकुमार दळवी, तर विशेष अतिथी म्हणून फलटण एज्युकेशन सोसायटीचे केंद्रीय संचालक श्रीमंत श्री.भोजराजजी नाईक निंबाळकर, आणि प्रमुख वक्ते म्हणून आई सेंटर प्रो चे संस्थापक सर डॉ.नागेश जोंधळे, मुख्य व्यवस्थापक संदीप अंबेसंगे तसेच, प्रा.धनश्री भोईटे (अधिष्ठाता, शैक्षणिक पदवी), प्रा.अमरसिंग रणवरे (अधिष्ठाता, शैक्षणिक पदविका), प्रा.विदुर गुंडगे (एफडीपी समन्वयक व विद्यार्थी प्रशिक्षण प्रमुख), प्रा. प्रणव धायगुडे, प्रा.जयदीप खालते या मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी एफटीपी कार्यशाळेत पुढे बोलताना सर डॉ.जोंधळे म्हणाले की, शिक्षक असो वा प्राध्यापक त्यांनी सातत्याने ज्ञानार्जन करत राहणे व आजच्या या आर्टिफिशियल इंटेलिजन्स च्या युगात स्वतःला अप-टू-डेट ठेवणे अत्यावश्यक असून सद्यःस्थितीत विद्यार्थ्यांची हायटेक स्पीड व आपली शिकवण्याची स्पीड या मधील गॅप भरून काढण्यासाठी अशा एफटीपी कार्यशाळेतून सकारात्मक ऊर्जा अंगीकारून विद्यार्थी, संस्था तसेच देश





उभारणीसाठी योगदान देण्याचे आवाहन करीत त्यांच्या पुढील वाटचालीसाठी मंगल कामना व्यक्त केल्या. फलटण एज्युकेशन सोसायटीचे केंद्रीय संचालक श्रीमंत श्री.भोजराजजी नाईक निंबाळकर यांनी ट्रान्सफॉर्मेटिव्ह एज्युकेशन या संकल्पनेचे स्वागत करीत प्राचार्य डॉ.मनोजकुमार दळवी यांचे अभिनंदन केले. तसेच प्रमुख मार्गदर्शक सर डॉ.नागेश जोंधळे यांच्या अनुभवाचा व त्यांच्या विशेष शैलीतून अगदी महाविद्यालयीन विद्यार्थी, फॅकल्टी ते व्यवस्थापन तसेच प्रशासनातील विविध पैलूंना झळाळी देत सहभागी प्राध्यापकांमध्ये नवचैतन्य निर्माण केल्याचे अधोरेखित केले. तसेच, राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार संस्थेच्या कार्यप्रणालीत तज्ज्ञांचे मार्गदर्शन घेत सर्वांना प्रशिक्षण देण्याचा फलटणच्या शैक्षणिक वैभवात भर घालणारा हा उपक्रम नक्कीच यशस्वी होईल असा विश्वास व्यक्त करीत सर्व सहभागी शिक्षक आणि आयोजकांचे मनःपूर्वक अभिनंदन केले. यावेळी अध्यक्षीय समारोप करताना प्राचार्य डॉ.मनोजकुमार दळवी यांनी शिक्षण हे केवळ माहितीचे संकलन नसून, मानवी मनाचे परिवर्तन करण्याची प्रक्रिया आहे. हाच विचार या एफटीपीच्या माध्यमातून अधोरेखित झाला असल्याचे व आपणास मिळालेल्या या पाच दिवसीय देशपातळीवरील कार्यशाळेत १०० शिक्षक हे ऑफलाईन तर १५० पेक्षा अधिक शिक्षकांनी सक्रिय सहभाग नोंदविला. तसेच, या ज्ञानदायी मेजवानीचा पुरेपूर लाभ घेत सर्वांगीण विकासावर भर देण्याचा विश्वास व्यक्त केला. या कार्यशाळेचे सुत्रसंचालन प्रा. प्रतिमा भोसले यांनी अतिशय प्रभावीपणे केले. तर उपस्थितांचे आभार प्रा.अमरीश रणवरे यांनी मानले.

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## नियमबाह्य पद्धतीने मंजूर केलेली गुंठेवारी रद्द करण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २४ मार्च :** लातूर शहरातील महानगरपालिकेतील नगर रचना विभागाने सर्व्हिस रोड न सोडता नियबाह्य पद्धतीने केलेली गुंठेवारी रद्द करुन सहायक नगर रचनाकार सौरभ उटगे यांच्यावर तसेच संबंधीतांवर निलंबनाची कार्यवाही करावी, अशी मागणी उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेच्या वतीने आयुक्तांना दिलेल्या पत्राद्वारे करण्यात आली आहे. लातूर शहर महानगरपालिकेच्या हद्दितील मौ. कन्हेरी सर्वे नं. ३१/अ येथील राष्ट्रीय महामार्गावरील प्लॉटची गुंठेवारी दि. २८ ऑगस्ट २०२५ रोजी अतिशय तातडीने व नियमांची पायमल्ली करुन मनपातील सहायक नगर रचनाकार सौरभ उटगे यांनी आर्थिक देवाण-घेवाण करुन 'युडीसीपीआर' मधील नियमांची जाणिवपूर्वक डोळेझाक करुन व उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेची आयुक्तांना पत्राद्वारे मागणी वरिष्ठांना चुकीचा अहवाल सादर करुन गुंठेवारी नियमितीकरणाची संचिका मंजूर केली आहे. आज शहरात जवळपास सर्वच राष्ट्रीय महामार्गाला ले-आऊट मंजूर करताना सर्व्हिस रोड सोडून मंजूर करण्यात आले आहेत. सर्व्हिस रोड सामान्य नागरिकांसाठी खुले करण्यासाठी विविध राजकीय पक्षांनी, सामाजिक संघटनांनी वारंवार निवेदने दिलेली आहेत. जेणे करुन शहरातील वाहतूकीचा त्रास व अपघाताचे प्रमाण कमी होतील. परंतु, असे असतानासुद्धा महापालिका कार्यालयातील तांत्रिक कर्मचाऱ्यांनी जाणिवपुर्वक तत्कालीन सहायक संचालक सेवानिवृत्त होण्याच्या दोन दिवसाआधी दिशाभूल करुन व चुकीचा अहवाल सादर करुन तब्बल ५ हजार स्वेअर फुट राष्ट्रीय महामार्गालगत असणाऱ्या प्लॉटची गुंठेवारी चुकीच्या पद्धतीने मंजूर करुन घेतली आहे.



## विविध वृत्त...

### बार असोशियशन चे मतदान शांततेत



**लातूर :** बार असोशियन्स महाराष्ट्र आणि गोवा यासाठी आज सकाळी नऊ पासून मतदानाला सुरुवात झाली. मतदान शांततेत चालू असून दुपारी पावणे दोन पर्यंत पंचवीस टक्के मतदान झाले आहे.लातूर मधून पाच उमेदवार या निवडणुकीत उभे आहेत एका मतदाराला पंचेवीस मतदान करण्याचा अधिकार आहेमहाराष्ट्र आणि गोवा या राज्यातील वकील मंडळी मतदान करणार असून या वर्षी पहिल्यांदा महिला उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात आपले नशीब अजमावत आहेतसकाळ पासूनच मतदान करण्यासाठी वकील मतदारांनी रांग लावून मतदान करत असल्याचे चित्र पाहावयास मिळत आहे. या निवडणुकीत२१०० वकील मतदार असून त्यात४०० ते५०० महिला वकील असल्याचे समजते . तसेच मतदान करताना पसंतीक्रम देणे आवश्यक आहे . त्यामुळे मतदान सावकाश पणे चालू आहे. मतदान शांततेत पार पाडण्यासाठी प्रशासन योग्य ती खबरदारी घेत आहे.

### तोतया नोटरी कार्यरत: लक्ष कोणाचे च नाही

**लातूर :** लातूर मधील नोटरी भवन येथे एक तोतया नोटरी कार्यरत असल्याची माहिती असून हा तोतया आपल्या बायकोच्या नावाखाली नोटरीचे काम बिन बोभाट पणे करत आहे . दुसऱ्याच्या नावावर नोटरी सारखे कायदेशीर काम करत असल्यामुळे एक प्रकारे वकील मंडळींचाच अपमान केल्यासारखे आहे .वकील झाल्यानंतर किमान सात वर्षे वकिली करावी लागते त्यानंतर च नोटरी होता येते . घरामध्ये एखादा वकील असला मध्ये दुसऱ्याला वकिलीचे ज्ञान थोडेच येते किंवा माहिती असते . त्यामुळे अशा वेळी चुकीचेच काम होणार यात शंका नाही त्यामुळे जिल्हा वकील संघाच्या अध्यक्षानी या प्रकरणात लक्ष देऊन योग्य ती कारवाई करून तोतया नोटरीचा बंदोबस करावा . अशी मागणी तमाम जनतेनी सोलापूर तरुण भारत च्या प्रतिनिधीशी बोलताना केली

### आ. रमेशअप्पा कराड यांनी सुचना देताच तडे गेलेल्या रेणापूरच्या महामार्ग सिमेंट रस्त्यावर दुरुस्तीचे काम सुरु

**लातूर :** लातूर ते रेणापूर या राष्ट्रीय महामार्गावर नेहरूनगर परिसरात सिमेंट काँक्रीट रस्त्यावर जागोजागी भेगा पडल्या, तडे गेले यामुळे अपघात होण्याची शक्यता गृहीत धरून वाहन चालकांना कसरत करत प्रवास करावा लागत असे. रस्त्याची दुरावस्था लक्षात घेऊन भाजपाचे नेते लातूर ग्रामीणचे आमदार श्री. रमेशअप्पा कराड यांनी संबंधित अधिकाऱ्यांना सूचना देताच सदरील रस्त्यावर महामार्ग विभागाच्या वतीने तातडीने दुरुस्तीचे काम सुरू झाले आहे. दुरुस्तीचे काम सुरू झाल्याने वाहनधारकातून समाधान व्यक्त केले जात आहे.लातूर औरंगाबाद या रस्त्याचे केंद्रीय रस्ते महामार्ग विभागामार्फत मागील काळात सिमेंट काँक्रीट रस्ता तयार करण्यात आला. या रस्त्यामुळे प्रवासाची मोठी सोय झाली. मात्र गेल्या काही दिवसापासून सदरील महामार्ग रस्त्यावरील लातूर ते रेणापूर दरम्यानच्या सिमेंट काँक्रीट रस्त्यावर नेहरूनगर परिसरात जागोजागी अनेक ठिकाणी मोठ्या भेगा पडल्या रस्त्याला तडे गेल्याने विविध वाहनधारकासह दुचाकी वाहनधारकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. रात्री अपरात्री तर तारेवरची कसरत करत जीव मुठीत धरून वाहन चालवावे लागत असे. महामार्गावरील सदर भेगा पडलेल्या ठिकाणी वाहन धारकाचे अपघात झाले आहेत. महामार्गावर नेहरूनगर परिसरात सिमेंट काँक्रीट रस्त्यावर पडलेल्या भेगा आणि तडे यामुळे नागरिकांचे होणारे हाल लक्षात घेऊन भाजपाचे नेते आ. रमेशअप्पा कराड यांनी राष्ट्रीय महामार्ग विभागाच्या संबंधित अधिकाऱ्यांना सदरील रस्त्याची परिस्थिती निदर्शनास आणून दिली व तात्काळ उपाययोजना करण्याच्या सूचना केल्या. आ. कराड यांच्या सूचनाची तात्काळ दखल घेऊन राष्ट्रीय महामार्ग लातूर विभागाच्या वतीने सोमवारी नेहरूनगर परिसरातील महामार्ग रस्त्यावर दुरुस्तीचे काम युद्ध पातळीवर सुरू झाले आहे.

# तोतया पोलीस अधिकाऱ्यावर कारवाईचा बडगा

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २४ मार्च :** पोलीस अधिकारी असल्याची बतावणी करून अनेकांची फसवणूक करणाऱ्या तोतया पोलीस अधिकाऱ्यावर अखेर खऱ्या पोलिसांनी कारवाईचा बडगा उगारला आहे. या तोतयाकडून ४ लाख ३० हजार रुपयांची रक्कमही जप्त करण्यात आली आहे.लातूरच्या स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलीस अधिकारी - कर्मचाऱ्यांनी शिताफीने ही कारवाई पार पाडण्याचे काम केले आहे. या तोतयाकडून आणखीही काही प्रकाराने उघडकीस येण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

लातूर जिल्ह्यात अलीकडील काळात काही फसवणुकीच्या घटना घडल्या होत्या. पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांनी सदरचे गुन्हे उघडकीस आणण्यासाठी विशेष मोहीम राबविण्याचे निर्देश दिले होते. त्यानुसार अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखा सक्रियपणे काम करीत होती.



सोमवारी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक लातूर शहर परिसरात संशयितरित्या आरोपींचा शोध घेत असताना, त्यांना नवीन रेणापूर नाका, लातूर येथे एक इसम स्वतःला पोलीस अधिकारी असल्याचे भासवून नागरिकांची फसवणूक करीत असल्याची माहिती मिळाली. ही माहिती खात्रीशीर असल्याने पोलिस पथकाने तात्काळ नियोजनबद्ध पद्धतीने सापळा रचून सायंकाळच्या सुमारास संशयित इसम विजय अनिरुद्ध कदम (वय २५ वर्षे), रा. पोस्ट कॉलनी, साई मंदिर जवळ, पेडगाव रोड, परभणी याला ताब्यात घेण्यात आले. पोलिसांनी घेतली असता त्याच्याकडे ४ लाख ३० हजार रुपये रोख रक्कम मिळून आली.

सखोल चौकशीदरम्यान आरोपीने अत्यंत धक्कादायक माहिती उघड केली की, आरोपी वर्तमानपत्रातील चोरीच्या घटनांची माहिती गोळा करत असे. त्यानंतर संबंधित फिर्यादींचे मोबाईल क्रमांक मिळवून त्यांच्याशी संपर्क साधून स्वतःला पोलीस अधिकारी असल्याचे सांगून स्वतःचा यूपीएससी परीक्षेच्या मुलाखतीला जाते वेळीचा व्हिडिओ दाखवून पोलीस अधिकारी असल्याची खात्री पटवत असे. तसेच बनावट पंचनामा तयार करून त्यावर स्वतःचे नाव सपोनि. संदीप कदम असे टाकून स्वतःची व फिर्यादीची सही घेत असे व चोरी गेलेला मुद्देमाल परत मिळवून देण्याचे आमिष दाखवत या बहाण्याने नागरिकांकडून मोठ्या प्रमाणात रोख रक्कम उकळत असे.

अहमदपूर येथील एका फिर्यादीस आरोपीने अशाच प्रकारे संपर्क करून मी पोलीस अधिकारी आहे, तुमचे चोरी गेलेले सोने परत मिळवून देतो असे सांगून दि. १९ मार्च २०२६ रोजी पाच लाख रुपयांची रक्कम घेतली. त्यापैकी ७०,०००/- ७० हजार रुपये आरोपीने खर्च केले असून उर्वरित ४ लाख ३० हजार रुपये पोलिसांनी जप्त केले आहेत. पोलिसांनी पकडल्यानंतर

आरोपीने कबुली दिली आहे की, तो मागील दोन वर्षांपासून नांदेड व परभणी जिल्ह्यात अशाच प्रकारे फसवणूक करीत आहे.या पार्श्र्वभूमीवर पोलीस प्रशासनाकडून आरोपीकडून इतर गुन्ह्यांची माहिती घेऊन संबंधित पोलीस ठाण्यांशी समन्वय साधून तपास सुरू करण्यात आला आहे.

ही उल्लेखनीय कारवाई पोलीस अधीक्षक अमोल तांबे व अपर पोलीस अधीक्षक . मंगेश चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सुधाकर बावकर यांच्या नेतृत्वातील पथकामधील पोलीस उपनिरीक्षक प्रमोद नानासाहेब देशमुख,पोलीस अंमलदार संजय कांबळे, सुरेश कलमे, मोहन सुरवसे, राजेश कंचे, शैलेश सुडे, पाराजी पुटटेवाड, तुळशीराम बरुरे, महिला पोलिस अंमलदार अंजली गायकवाड यांनी केली आहे. आरोपीस जप्त मुद्देमालासह पुढील तपासासाठी पोलीस स्टेशन अहमदपूर येथे हजर करण्यात आले आहे. प्रकरणाचा सखोल तपास सुरू आहे.

लातूर जिल्हा पोलीस दलाकडून सर्व नागरिकांना आवाहन करण्यात आले आहे की, कोणतीही व्यक्ती स्वतःला पोलीस अधिकारी आहे अशी खोटी ओळख देऊन पैसे मागत असल्यास त्वरित सतर्क व्हावे आणि अशी संशयास्पद व्यक्ती किंवा घटना आढळून आल्यास त्वरित पोलीस नियंत्रण कक्ष अथवा जवळच्या पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा.

## सक्षम व सुजाण समाज निर्मितीसाठी वाचनाची सवय आवश्यक : धिरज देशमुख

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २४ मार्च :** बदलत्या काळानुसार सक्षम व सर्वार्थाने समृद्ध समाज निर्माण करणे ही काळाची गरज बनली असून, यासाठी प्रत्येकाने विविध प्रकारचे साहित्य वाचनाची आवड जोपासावी, असे प्रतिपादन 'रीड लातूर' उपक्रमाचे संस्थापक धिरज विलासराव देशमुख यांनी केले.

बाभळगाव येथील दयानंद शिक्षण संस्थेच्या प्रांगणात विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र व मेडल वाटपाच्या कार्यक्रमात धिरज देशमुख बोलत होते. वाचन संस्कृती जोपासण्याच्या उद्देशाने कार्यरत असलेल्या 'रोड लातूर' या उपक्रमाच्या माध्यमातून मराठी भाषा गौरव दिनानिमित्त प्रकट वाचन, निबंध लेखन व काव्य वाचन स्पर्धांचे उत्साहात आयोजन करण्यात आले. या स्पर्धांना लातूर, औसा व रेणापूर तालुक्यातील सुमारे ९० जिल्हा परिषद शाळांमधील

विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. या स्पर्धांमुळे विद्यार्थ्यांच्या अभिव्यक्ती कौशल्याला वाव मिळत असून, वाचनाची आवड वृद्धिंगत होण्यासही मोठी मदत होत आहे. स्पर्धेतील विजेत्या विद्यार्थ्यांना शालेय स्तरावर प्रमाणपत्र व मेडल प्रदान करून गौरविण्यात येत आहे. त्याचाच एक भाग म्हणून बाभळगाव येथील केंद्रीय जिल्हा परिषद शाळा तसेच दयानंद प्राथमिक व माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांचा सन्मान 'रीड लातूर' उपक्रमाचे संस्थापक धिरज देशमुख व सौ. दीपशिखाताई धिरज देशमुख यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी वंश देशमुख व दिवीयाना देशमुख यांचीही उपस्थिती होती. गेल्या चार वर्षांपासून सातत्याने कार्यरत असलेल्या 'रीड लातूर' उपक्रमातून विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासाचे महत्त्वपूर्ण कार्य केले जात आहे. वाचनामुळे विचारांना दिशा मिळते, ज्ञान समृद्ध होते आणि जीवनाला

योग्य आकार प्राप्त होतो. विविध प्रकारच्या पुस्तकांमधून मिळणारे ज्ञान आयुष्याच्या प्रत्येक टण्यावर उपयुक्त ठरते. त्यामुळे सक्षम व सुजाण समाज निर्माण करण्यासाठी प्रत्येकाने वाचनाची सवय जोपासणे आवश्यक आहे, असे त्यांनी सांगितले.

## कृषीचे तंत्रज्ञान शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी रासेयो स्वयंसेवकांनी सज्ज रहावे : डॉ.भिकाने

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २४ मार्च :** पदवी मिळवणे हा केवळ एक टप्पा आहे, परंतु महाविद्यालयात शिकलेले तांत्रिक ज्ञान सोप्या भाषेत शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवणे आणि ते त्यांच्या बांधावर राबवणे हेच खरे यश आहे. ग्रामीण भागातील पशुधनाचे आरोग्य सुधारल्यास शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती सुधारेल. पशुपालन हा केवळ जोडधंदा नसून तो एक शाखशुद्ध व्यवसाय आसल्याचे प्रतिपादन महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूरचे माजी संचालक डॉ. अनिलकुमार भिकाने यांनी केले.

कृषि महाविद्यालय, लातूर मार्फत राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष निवासी शिबिर नुकतेच रेणापूर तालुक्यातील दर्जी बोरगाव येथे आयोजित करण्यात आले. या कालावधीत ६० विद्यार्थी, विद्यार्थीनींनी सहभाग घेतला. निरोप समारंभ कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून कृषि महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. जीवन ठोंबरे होते. उद्घाटक म्हणून माणुस प्रतिष्ठानचे शरद झरे, प्रमुख अतिथी डॉ. व्यंकट जगताप, अनिल माने, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी डॉ. अनिलकुमार कांबळे, मुख्याध्यापक परमेश्र्वर बालकुंदे, माजी मुख्याध्यापक बालासाहेब यादव, सुंदरराव माने, कुलकर्णी हे उपस्थित होते.

यावेळी बोलताना शरद झरे म्हणाले, विद्यार्थ्यांच्या श्रमातून आणि ग्रामस्थांच्या सहकार्यातून हे शिबिर खऱ्या अर्थाने यशस्वी झाले. हे शिबिर हे केवळ श्रमदानाचे माध्यम नसून ते विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासाचे केंद्र आहे. इथे विद्यार्थी एकमेकांशी जुळवून घेणे, नेतृत्व करणे आणि सामाजिक जबाबदारी निभावणे शिकतात.

अध्यक्षीय समारोप डॉ. ठोंबरे यांनी केला. खऱ्या शिक्षणाचे ध्येय केवळ पदवी मिळवणे नसून, त्या ज्ञानाचा वापर समाजाच्या

७ दिवसांतील विचारांची शिदोरी राष्ट्रीय सेवा योजना म्हणजे काय, तेथे कसे काम चालते, युवककेंद्रित ध्येय-धोरणे कशी असतात आणि ती कशी ठरवली पाहिजे हे सर्व त्यांनी जाणून घेण्याचा प्रयत्न केला. या सात दिवसात त्यांनी नियमितपणे योगासन वर्गास हजेरी लावून आरोग्याचे, नियमित परिसर स्वच्छता करून संत गाडगेबाबा यांच्या ग्रामस्वच्छतेचे तर महत्व समजून घेतले. या कालावधीत विद्यार्थ्यांनी महिला मेळावा, शेतीपूरक व्यवसाय, जलसंस्कार वृक्षसंवर्धन व मतदार जागृती अभियान, ग्रामीण कृषि कवी संमेलन, शेतकरी मेळावा, माध्यम युवक-युवती सुसंवाद, व्यसनमुक्ती अभियान, रक्तदान शिबीर, पशुरोग निदान व उपचार शिबीर या विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.

कृषि विद्यार्थ्यांनी प्रयोगशाळेतील तंत्रज्ञान शेतकऱ्यांच्या बांधावर नेणे ही त्यांची नैतिक जबाबदारी आहे. पारंपरिक शेतीला आता आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देणे अनिवार्य आहे.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन आदिती आचार्य, प्रास्ताविक व आभार डॉ. अनिलकुमार कांबळे यांनी मानले. डॉ. दयानंद मोरे, डॉ. प्रभाकर आडसूळ, डॉ. ज्ञानेश्र्वर सुरडकर, दशरथ सुरवसे, सुधाकर स्वामी, उत्तम पवार, दीपक जाधव, यांच्या सहकार्यामुळे कार्यक्रम यशस्वी झाला.

## राजर्षी शाहू महाविद्यालयात स्वर-तालनिनाद संगीत समारोहाचे आयोजन

**लातूर :** येथील राजर्षी शाहू महाविद्यालयातील संगीत विभाग प्रमुख प्रा. हरिसर्वोत्तम जोशी यांच्या सेवापूर्ति निमीत्त प्रा. हरिसर्वोत्तम जोशी व परिवाराच्या वतीने दि. २५ मार्च २०२६ रोजी राजर्षी शाहू महाविद्यालयाच्या प्रांगणात सायंकाळी ६.०० वा. स्वर- तालनिनाद संगीत समारोहाचे आयोजन करण्यात आलेले आहे. या स्वर-तालनिनाद संगीत समारोहामध्ये कोलकाता येथील जगविख्यात महिला तबलावादक विदुषी रिम्पा शिवा वांचे स्वतंत्र तबलावादन, धारवाड येथील प्रथितयश शास्त्रीय गायक पं. कुमार मर्डर यांचे शास्त्रीय गायन व उदयोन्मुख तबलावादक चि. समीहन जोशी याचे स्वतंत्र तबला वादन होणार आहे. स्वतंत्र तबला वादनाच्या लहरा संगीतीसाठी बेळगाव येथील श्री. योगेश रामदास व गायनाच्या संवादिनी संगती साठी लातूर येथील प्रा. शशिकांत देशमुख हे उपस्थित राहणार आहेत.

तरी लातूर व पंचक्रोशितील सर्व संगीत प्रेमी रसिक, प्रेक्षक, श्रोत्यांनी या संगीत मैफिलीचा रसास्वाद घेण्यासाठी उपस्थित राहावे असे आवाहन प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे, उपप्राचार्य प्रा. सदाशिव शिंदे, पर्यवेक्षक प्रा. भीमराव पाटील व संयोजक प्रा. हरिसर्वोत्तम जोशी व परिवाराच्या वतीने करण्यात आलेले आहे.

# पालकांनी मुलांचे 'मित्र' नव्हे तर 'पालक' व्हावे : डॉ. भूषण शुक्ल

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २४ मार्च :** आजच्या तंत्रज्ञानप्रधान युगात पालकत्वाची आव्हाने, संधी आणि गुंतागुंत या विषयावर मार्गदर्शन करणारी पालकशाळा कृषि उत्पन्न बाजार समिती परिसरातील स्व.दगडोजीराव (दादा) देशमुख स्मृती भवन येथे रविवार (दि.२२) रोजी यशस्वीरित्या संपन्न झाली. सावली सेंटर फॉर मेंटल हेल्थ अँड रिसर्च, लातूर व सोसायटी फॉर वेलबेईंग, अवेअरनेस अँड रिहॅबीलीटेशन (स्वर), लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम पार पडला. यावेळी श्रीमती सुनंदा जगताप, शरद झरे यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून पालक शाळेचे उदघाटन झाले. सावली सेंटर फॉर मेंटल हेल्थ अँड रिसर्च, लातूरच्या २० व्या वर्धापनदिनानिमित्ताने आयोजित विविध स्पर्धेच्या विजेत्या विद्यार्थ्यांचा उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. त्यानंतर प्रसिद्ध बालमानसोपचार तज्ञ डॉ. भूषण शुक्ल (पुणे) यांची 'तंत्रज्ञान युगातील पालकत्व - कानगोष्टी पालकत्वाच्या' या विषयावर प्रदीर्घ मुलाखत घेण्यात आली. ही मुलाखत मनोविकार व मानसोपचार तज्ञ डॉ.

### सावली व स्वरच्या पालकशाळेत तंत्रज्ञानयुगातील पालकत्वावर मार्गदर्शन

मिलिंद पोतदार (लातूर) यांनी घेतली.

पालक म्हणून जडणघडण जन्मापासून होत असली तरी पिढ्यांमधील अंतर कमी करण्यासाठी पालकांनी जुळवून घेण्याबरोबरच मुलांनीही पालकांशी जुळवून घेणे आवश्यक असल्याचे डॉ. शुक्ल यांनी सांगितले. मुलांमध्ये आई-वडिलांविषयी कृतज्ञतेची भावना असणे गरजेचे आहे.

पालकांनी मुलांशी 'मित्र' म्हणून न राहता 'पालक' म्हणूनच भूमिका बजावावी, असे त्यांनी स्पष्ट केले. शिस्त ही मुलांनी स्वतःवर लादलेली पाहिजे. कोणता हट्ट पुरवायचा आणि कोणता नाही, याची स्पष्टता पालकांनी ठेवावी. मुलांना आनंदी ठेवणे महत्त्वाचे असले



तरी अनावश्यक लाड करू नयेत. 'आपल्याला जी गोष्ट मिळाली नाही, ती माझ्या मुलाला मिळाली पाहिजे' ही भूमिका चुकीची असल्याचेही त्यांनी अधोरेखित केले.

मुलांकडून एखाद्या गोष्टीसाठी धमकी मिळाल्यानंतर पालकांना वाटणारी अस्वस्थता ही चांगल्या पालकांची लक्षणे असल्याचे सांगून, तू माझ्यापासून दूर होऊ नकोस, असे मुलाला सांगतानाच ती गोष्ट न देण्याचा निर्धार पालकांनी ठेवावा, असे मत डॉ. शुक्ल यांनी व्यक्त केले.

एखादी गोष्ट हवी असणे हे मुलाचे दुःख असते, पण ती देऊ न शकणे हे पालकाचे दुःख असते. हे दोन्ही दुःख सहन करण्याची तयारी पालक व मुलांनी दाखवली पाहिजे. 'आपले दुःखाचे नाते आहे,' हे पालकांनी मुलाला सांगितले पाहिजे, असेही त्यांनी स्पष्ट केले.

आजी-आजोबांच्या भूमिकेवर बोलताना डॉ. शुक्ल म्हणाले की, त्यांनी रसायनशास्त्रातील 'कॅटलिस्ट' सारखी भूमिका बजावली पाहिजे. तेव्हाच कुटुंब संस्था योग्यरित्या चालू शकते.

लातूरमध्ये विद्यार्थ्यांसाठी मोबाईल फोन मर्यादित करण्याचा 'लातूर पॅटर्न' शाळा व महाविद्यालयांमध्ये राबविला गेला पाहिजे, असे मत त्यांनी व्यक्त केले.

कार्यक्रमाला उपस्थित पालकांनी या विषयात रस दाखवत मोठ्या संख्येने सहभाग घेतला.

मुलाखतीनंतरच्या परस्पर संवाद सत्रात पालकांनी विविध प्रश्न उपस्थित केले. मुलांवर स्क्रीन टाइमचे होणारे परिणाम, डिजिटल व्यसनमुक्ती, पालक व मुलांमधील प्रभावी संवाद, तसेच बदलत्या काळातील शिस्त व स्नेह यांचा समतोल या विषयांवर पालकांच्या शंकांचे निरसन डॉ. भूषण शुक्ल यांनी सविस्तर केले. प्रत्येक प्रश्नाला वैयक्तिक पद्धतीने उत्तर देत त्यांनी पालकांना व्यावहारिक मार्गदर्शन केले. पालकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद व संवादातील सहभाग यामुळे हा कार्यक्रम अधिकच फलदायी ठरल्याचे आयोजकांनी सांगितले. या पालकशाळेमुळे तंत्रज्ञानाच्या युगात पालकत्वाच्या दिशा स्पष्ट करण्यास मोलाची मदत झाल्याची भावना पालकांनी व्यक्त केली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक कु.आरोही मिलिंद पोतदार, सूत्रसंचालन पूनम बनसोडे यांनी तर आभार....यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सावली सेंटर फॉर मेंटल हेल्थ अँड रिसर्च, लातूर व सोसायटी फॉर वेलबेईंग, अवेअरनेस अँड रिहॅबीलीटेशन (स्वर), लातूर यांच्या पदाधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com



# मनपाच्या स्थायी समिती सभापतीपदी विरेंद्रसिंघ गाडीवाले

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २४ मार्च-**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका स्थायी समितीच्या सभापती पदी स. विरेंद्रसिंघ गाडीवाले यांची निवड करण्यात आली. तर शिक्षण महिला व बालकल्याण सभापतीपदी सदिच्छा सोनी पाटील व उपसभापतीपदी निरंजना राजु लांडगे यांची निवड करण्यात आली.

महानगरपालिकेच्या सभागृहात आज विशेष सभा बोलाविण्यात आली. जिल्हाधिकारी तथा पिठासीन अधिकारी राहुल कर्डीले यांच्या उपस्थितीत स्थायी समिती सभापती व अन्य पदांसाठी निवड प्रक्रिया घेण्यात आली. यात स्थायी समिती सभपतीपदी स.विरेंद्रसिंघ गाडीवाले यांचा एकमेव अर्ज आल्याने त्यांची सभापतीपदी बिनविरोध निवड करण्यात आली तसेच शिक्षण महिला व बालकल्याण सभापती पदी सदिच्छा सोनी पाटील व उपसभापतीपदी निरंजना राजु लांडगे यांचीही बिनविरोध निवड करण्यात आली.

यावेळी मनपा आयुक्त महेशकुमार डोईफोडे, नगरसचिव तथा उपआयुक्त स. अजितपालसिंघ संधु हे उपस्थित होते.

महापालिकेच्या तिजोरीची चावी म्हणजे स्थायी समिती सभापती हे पद सांगितले जाते. या पदावर ज्येष्ठ व अनुभवी नगरसेवक म्हणून स. विरेंद्रसिंघ गाडीवाले यांची निवड करण्यात आली. स. विरेंद्रसिंघ गाडीवाले यांनी काँग्रेसच्या काळातही स्थायी समितीचे सभापती पद भुषवले होते. हा त्यांचा पुर्वानुभव पाहता ही संधी त्यांना पुन्हा मिळाली आहे.

यावेळी महानगरपालिकेच्या महापौर कविता संतोष मुळे, गटनेते ॲड. महेश कनकदंडे, संतोष मुळे, बैजु सोनी पाटील, दिलीप कंदकुर्ते, बाळु खोमणे प्रविण साले यांच्यासह नगरसेवक मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

# हिमायतनगर तालूक्यात पाच लाखाचा गुटखा जप्त

**तभा वृतसेवा**
**हिमायतनगर, दि. २४ मार्च-**

तालूक्यातील पोटा बु. येथून महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधित केलेला गुटखा, सुगंधीत पानमसाला यावर छापा मारून पोलीसांनी पावनेपाच लाखाचा मुद्देमाल जप्त केला आहे. हि कारवाई दि.२३ रात्री उशिरा करण्यात आली आहे. आठवड्यातील हि दुसरी मोठी कारवाई मानली जात आहे.



हिमायतनगर तालूक्यात शासनाने प्रतिबंधित केलेल्या गुटख्याची मोठ्या प्रमाणात साठा, विक्री होत आहे. या पाश्वभूमिवर ऑपरेशन फ्लॅश आउट अंतर्गत दि. २३ मार्च रोजी रात्री उशिरा पोटा बु. येथून शेख बाबा वलीसाहब यांच्या टिनपत्राच्या घरात साठवणूक केलेला गोवा- १००० पानमसाला, वजिर केसर युक्त, जि आय जर्दा,बाजीराव पान मसाला,सुगंधी पानमसाला,टोबॅको आदिसह विविध कंपन्याचा गुटखा साठ्यावर पोलीसांनी छापा मारून ४ लाख ८८ हजार तिनशे रूपयाचा मुद्देमाल जप्त केला आहे. हि कारवाई जिल्हा पोलीस अधिक्षक अविनाशकुमार,अप्पर पोलीस अधिक्षक अर्चना पाटील, अप्पर पोलीस अधिक्षक सुरज गुरव व उप विभागीय पोलीस अधिकारी डि. एस. हाके, पोनि. अमोल भगत यांच्या मार्गदर्शनागाली सहाय्यक पोलीस निरिक्षक विशाल वाठोरे, सपोनि मिलिंद कात्रे, पोहेकाँ. बालाजी पाटील, पो. कॉ. सपना सुर्यवंशी, यांनी हि कारवाई केली आहे. आठवड्यातील हि दुसरी कारवाई आहे. पोटा बु. येथूनच दि. १८ रोजी एलसीबीच्या पथकाने सव्वा लाखाचा गुटखा साठा जप्त कारवाई केली होती. पोलीस उपमहानिरिक्षक शहाजी उमाप यांनी जिल्हाभरात या कारवाईची मोहीम हाती घेतली असून, अनेक ठिकाणी मोठ्या कारवाया करण्यात आल्या आहेत. परंतू हिमायतनगर शहरातील ते दोन्ही गुटखा किंग अद्याप हि मोकाटच आहेत. पोहेकाँ. श्यामसुंदर नागरगोजे यांच्या फिर्यादीवरून आरोपी सय्यद सत्तार सय्यद कादर वय ४८ वर्ष रा. पोटा बु. ता. हिमायतनगर यांच्या विरूद्ध हिमायतनगर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, अधिक तपास हिमायतनगर पोलिस करित आहे.

## आमदार चिखलीकर आजपासून कार्यकर्त्यांना कौठा येथे भेटणार

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २४ मार्च-**

कंधार-लोहा विधानसभा मतदारसंघाचे आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर हे बुधवार दिनांक २५ मार्च पासून कौठा भागातील माजी आमदार मोहनराव हंबर्डे यांच्या संपर्क कार्यालयात कार्यकर्त्यांच्या भेटीसाठी उपलब्ध राहणार आहेत.

कंधार-लोहाचेआमदारप्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या वसंतनगर स्थित साई सुभाष निवासस्थानासमोर नांदेड मनपाच्या वतीने मल्ल निसारण लाईनचे आंथरण्याचे काम सुरू आहे. यामुळे रस्ता खोदण्यात आला आहे. कार्यकर्त्यांना येण्यासाठी त्रास होऊ नये यासाठी आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर हे माजी आमदार मोहन हंबर्डे यांच्या कौठा भागातील रवी नगर येथील संपर्क कार्यालयात भेटीसाठी उपलब्ध राहणार आहेत. कार्यकर्त्यांनी यांची नोंद घ्यावी असे आवाहन त्यांच्या कार्यालयातर्फे करण्यात आला आहे.

## लाड-पागे नियुक्त्या प्रलंबित : नगरसेवक साहेबराव गायकवाड यांचा तातडीचा पाठपुरावा

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २४ मार्च-**

नांदेड-वाघाळा शहर महानगरपालिकेमध्ये लाड-पागे समितीच्या शिफारसीनुसार वारसांना देण्यात येणाऱ्या नोकरीची अनेक प्रकरणे दीर्घकाळ प्रलंबित असल्याबाबत नगरसेवक साहेबराव गायकवाड यांनी प्रशासनाकडे तातडीने लक्ष घालण्याची मागणी केली आहे.

महानगरपालिका आयुक्तांना दिलेल्या निवेदनात त्यांनी नमूद केले की, महानगरपालिकेतील कायमस्वरूपी सफाई कर्मचाऱ्यांच्या निधनानंतर शासन नियमांनुसार त्यांच्या वारसांना अनुकंपा तत्वावर नोकरी देणे आवश्यक आहे. लाड-पागे समितीच्या शिफारसीनुसार आवश्यक कागदपत्रे सादर करूनही अनेक वारसांची नियुक्ती दीर्घकाळ प्रलंबित असून संबंधित कुटुंबांना आर्थिक व मानसिक अडचणींचा सामना करावा लागत आहे.

शासन नियमांनुसार अर्ज प्राप्त झाल्यानंतर निश्चित कालमर्यादेत नियुक्ती प्रक्रिया पूर्ण करणे अपेक्षित असताना संबंधित विभागाकडून होत असलेल्या विलंबाबाबत त्यांनी नाराजी व्यक्त केली आहे. प्रलंबित सर्व प्रकरणे तात्काळ निकाली काढून पात्र वारसांना नियुक्तीपत्र द्यावे तसेच विलंबास



कारणीभूत बाबींची चौकशी करून जबाबदारी निश्चित करावी अशी मागणी त्यांनी केली आहे.

यासोबतच पुढील काळात अशा प्रकारचा विलंब होऊ नये यासाठी नियुक्ती प्रक्रियेस निश्चित कालमर्यादा ठरवून स्पष्ट आदेश देण्यात यावेत, अशीही मागणी करण्यात आली आहे. या निवेदनाच्या प्रती खासदार, सफाई आयोग सदस्य, महापौर तसेच संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांना पाठविण्यात आल्या आहेत.

**मुख्य मागण्या**

लाड-पागे समितीतील प्रलंबित प्रकरणे तात्काळ निकाली काढावे, पात्र वारसांना त्वरित नियुक्तीपत्र द्यावी, विलंबाची जबाबदारी निश्चित करावी, विलंब करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करावी, नियुक्ती प्रक्रियेस कालमर्यादा ठरवावी, संबंधित कुटुंबांना तातडीने दिलासा द्यावा आदी मुख्य मागण्या करण्यात आल्या.

## मुदखेडमध्ये ईद-उल-फित्र उत्साहात साजरी

**मुदखेड** -पवित्र रमजान महिन्यानंतर येणारा आनंदाचा सण ईद-उल-फित्र मुदखेड शहरात दि. २१ मार्च रोजी मोठ्या उत्साहात आणि भक्तिभावाने साजरा करण्यात आला. शहरातील ईदगाह मैदानावर सकाळी मोठ्या संख्येने मुस्लिम बांधव एकत्र येऊन सामूहिक ईदची नमाज अदा केली. यावेळी मेहराजउल हसन यांच्या नेतृत्वाखाली ईदची सामूहिक नमाज पठण करण्यात आले. नमाजानंतर त्यांनी देशात शांतता, बंधुभाव आणि संपूर्ण जगात सुख-समृद्धी नांदो यासाठी विशेष दुवा (प्रार्थना) केली. नमाज संपल्यानंतर मुस्लिम बांधवांनी एकमेकांना आलिंगन देत ईद मुबारकच्या शुभेच्छा दिल्या. शहरातील विविध भागांतही आनंदाचे वातावरण पाहायला मिळाले. लहान मुलांपासून ते ज्येष्ठ नागरिकांपर्यंत सर्वांनी उत्साहाने ईद साजरी केली. या प्रसंगी शहरातील अनेक मान्यवर व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. ईदच्या निमित्ताने सर्वत्र बंधुभाव, एकता आणि आनंदाचे वातावरण निर्माण झाले. रमजान ईद निमित्ताने माजी नगराध्यक्ष राम चौधरी यांच्या वतीने दरवर्षीप्रमाणे याही वर्षी ईद निमित्त सर्व मुस्लिम बांधवासह सर्वांना बुंदीच्या पाकिटाचे वाटप करण्यात आले आणि शुभेच्छा दिल्या. यावेळी माजी नगराध्यक्ष राम चौधरी, काँग्रेस कमिटीचे तालुकाध्यक्ष प्रतापराव देशमुख बारडकर, संदिप देशमुख बारडकर, मुजिब पठाण, गिरिष कोत्तावार,सूर्यकांत चौदंते,करिम खाँ साब, गोविंद गोप्पनपले, गंगाधर डांगे, प्रशांत मुंगल, शिवानंद देवके, रमेश बोडके,विठ्ठल आचार्य, गजानन संबोड, इमरान शेठ मच्छीवाले, श्याम चंद्रे,संजय आउलवार,डॉ. संदीप पचलिंग, प्रवीण काचावार, माजी नगरसेवक कैलास गोडसे, माजी उपाध्यक्ष लक्ष्मणराव देवदे,प्रवीण गायकवाड,पप्पू सोनटक्के,खुर्शीद सेठ, बबलूसेठ किरणावाले, संदीप मोडावन भाजपचे माधव पा. कदम, शहराध्यक्ष, रामसिंग चव्हाण, अँड. कमलेश चौदंते, चांदू बोकेफोड़, किशोर पारवेकर, मुलतानी सेठ, म.गौस सेठ, नगरसेवक अविनाश चौदंते, कपिल लोखंडे, गफ्फार भाई पारेवाले, एकबाल कुरेशी, प्रभाकर पांचाळ, रफिक भाई मसालेवाले, मोहम्मद बुरहान,एम. आय.एम शहराध्यक्ष मो.हुसेन,वाजीद भाई,यांच्यासह विविध पक्षातील कार्यकर्ते व सामाजीक कार्यकर्ते यांनी ईद निमित्त मुस्लिम बांधवाना शुभेच्छा दिल्या. यावेळी जिल्हा पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक धीरज चव्हाण सपोनि बी.आर. कांबळे, पोलीस उपनिरीक्षक शिवाजी शिंदे,आकाश सरोदे,गवई, पो. हे.का. किशोर पाटील, चंद्रशेखर मुंडे,अरविंद शिनगारपुतळे, यांच्यासह पोलिस ठाण्यातील अन्य पोलीस कर्मचारी होमगार्ड यांनी कडक पोलीस बंदोबस्त ठेवला होता.


## स्वारातीम विद्यापीठ प्रशासकीय इमारतीमधील शौचालय दुरुस्ती

**तभा वृतसेवा**
**नवीन नांदेड, दि. २४ मार्च-**

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड येथील प्रशासकीय इमारतीमध्ये गेल्या अनेक वर्षापासून परीक्षा विभागातील शौचालय व डॉ. बाबासाहेब आंबेडकरा अध्यासन केंद्रा समोरील दिव्यांग व्यक्तीचे शौचालय नाळदुरुस्त असल्याची बातमी दैनिक तरुण भारत ने प्रकाशित केली होती. सदरील बातमीचे दाखल घेऊन विद्यापीठ प्रशासनाने वेळेतच शौचालयाचे साफसफाई केल्याचे दिसून आले आहे.

तरुण भारत इफेक्ट

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड येथील प्रशासकीय इमारतीतील काही विभागात शौचालयांच्या अवस्था वाईट झाली होती. ही वाईट परिस्थिती दैनिक तरुण भारतच्या हाती लागल्याने येथील स्वछेतेची होनारी हेळसांड सवीस्तार मांडली होती.सदरील



बातमीची दखल घेऊन. विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांच्या आदेशाने संबधीत अधिकारी व विभागाने ताबडतोब शौचालयाचे काम पुर्ण केल्याबद्दल संबंधित विभागातिल कर्मचाऱ्यानी आंनद व्यक्त करून विद्यापीठ प्रशासनाचे व संबधित वाभागाचे अभिनंदन करून आभार मानले.

## उज्वलकुमार पालेकर यांची शिवसेना अनुसूचित जाती विभागाच्या तालुकाध्यक्षपदी निवड

**तभा वृतसेवा**
**देगलूर, दि. २४ मार्च-**

तालुक्यात शिवसेना (शिंदे गट) संघटनात्मकदृष्ट्या अधिक सक्षम करण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण पाऊल उचलण्यात आले असून, उज्वलकुमार सटवाजी पालेकर यांची तालुका (अनुसूचित जाती विभाग) अध्यक्षपदी अधिकृत निवड करण्यात आली आहे.

नांदेड जिल्ह्याच्या वतीने आयोजित आढावा बैठकीत ही घोषणा करण्यात आली. जिल्हाप्रमुख उमेश मुंढे तसेच जिल्हाध्यक्ष यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडलेल्या या बैठकीत पक्ष संघटन मजबूत करण्यावर विशेष भर देण्यात आला.

या प्रसंगी जिल्हा उपप्रमुख व्यंकटराव पाटील खतगावकर, तालुका प्रमुख गंगाधरजी तमलूरकर, शहर प्रमुख व्यंकटरावजी पुरमवार, जिल्हा सचिव दत्ता पाटील कोकणे, तालुका संघटक रंगरावजी जाधव, हणेगाव सर्कल प्रमुख विठ्ठलरावजी नरुचे, शाखा प्रमुख रवीजी भाले यांच्यासह शिवसेनेचे पदाधिकारी व शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थित माजी.आ.शंकरअण्णा धोंडगे यांचा पक्ष प्रवेश

**तभा वृतसेवा**
**लोहा, दि. २४ मार्च-**



शिवसेनेचे मुख्य नेते तथा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत २९ मार्च रोजी बैल बाजार मैदानावर राज्यस्तरीय शेतकरी अधिवेशन व शिवसेना पक्ष प्रवेश सोहळ्याचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती शिवसेनेचे शेतकरी नेते शंकर अण्णा धोंडगे यांनी शासकीय विश्रामगृह येथे दिली.

या कार्यक्रमाला जवळपास ४० हजार शेतकरी उपस्थित राहणार असे माजी. आ.शंकर अण्णा धोंडगे यांनी सांगितले

शिवसेना नेते राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली माजी आ.शंकर आण्णा धोंडगे यांचा शिवसेनेत प्रवेश केला. या पुर्वी बीआरएसमध्ये प्रवेश केला, त्यानंतर एमआरएसची स्थापना केली आणि नंतर उपमुख्यमंत्री शिंदे यांच्या नेतृत्वाखाली राज्यातील अनेक कार्यकर्त्यांनी शिवसेनेत काम करण्यासाठी प्रवेश केला.

यावेळी दता पवार, मारोती पंढरे, माजी जिल्हा परिषद उपाध्यक्ष दिलीप धोंडगे, शिवराज पाटील धोंडगे, शिवसेना तालुकाप्रमुख नागोराव उमरेकर, शिवसेना तालुकाप्रमुख संतोष यंडाळे, नंदाजी इंगळे, जीवन वडजे, पिंटू माळवदे, अमण पेटकर, अशोक सोनवळे आदी उपस्थित होती.

## नवोदय प्रवेश परीक्षेत अटकळी शाळेचे घवघवीत यश.

**आदमपूर** -पी एम श्री जिल्हा परिषद अटकळी शाळेतील ७ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत.नुकताच नवोदय विद्यालय प्रवेश परीक्षेचा निकाल जाहीर झाला असून बिलोली तालुक्यातील अटकळी येथील पी एम श्री जिल्हा परिषद केंद्रीय वरिष्ठ प्राथमिक शाळेने उल्लेखनीय यश संपादन



केले आहे. या परीक्षेत शाळेतील एकूण ७ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून,यामध्ये केरूर येथील शाहिस्ता गौस सय्यद, गंगासागर दिलीप पोलकमवाड, आर्या विकास भालेराव, प्रविण सुरेश मुर्के, काशिनाथ मोहन झुरुडवाड, साफिया जुबेर शेख आणि ऋतुजा संदीप जाधव यांचा समावेश आहे. विद्यार्थ्यांच्या या यशामुळे शाळेच्या शैक्षणिक गुणवत्तेचा पुन्हा एकदा ठसा उमटला आहे. या यशाबद्दल शाळा व्यवस्थापन समिती, मुख्याध्यापक तसेच शिक्षकवर्ग यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.तसेच, विद्यार्थ्यांच्या यशामागे त्यांच्या पालकांचे आणि कुटुंबीयांचेही महत्त्वपूर्ण योगदान असल्याचे मत व्यक्त करण्यात आले.

## समाजाला परत देणे हाच खरा कर्मयोग; म्हणूनच बाबासाहेब खरे कर्मयोगी :सद्गुरु ज्ञानराज माणिकप्रभु महाराज

**तभा वृतसेवा**
**बिलोली, दि. २४ मार्च-**

समाजाकडून आपण सतत घेत असतो; परंतु त्याला परत देत नाही, ती एक प्रकारची चोरीच आहे. स्वत:पुरते जगणे हे पाप असून समाजासाठी जगणे हाच खरा कर्मयोग आहे, असे प्रतिपादन सद्गुरु ज्ञानराज माणिकप्रभु महाराज यांनी केले. रविवार (ता२२) रोजी सगरोळी (ता. बिलोली) येथे संस्कृती संवर्धन मंडळाचे संस्थापक कर्मयोगी के. ना. तथा बाबासाहेब देशमुख यांच्या जन्मशताब्दी समारोप कार्यक्रमात ते आशीर्वादपर भाषणात बोलत होते. यावेळी व्यासपीठावर संस्थेचे चेअरमन प्रमोद देशमुख, जन्मशताब्दी महोत्सव समितीचे प्रमुख अरविंद देशमुख उपस्थित होते.

बाबासाहेबांकडे जमीन, मान-सन्मान व संपत्ती सर्व काही होते. ते इच्छित असते तर पुण्यासारख्या ठिकाणी राहून आपल्या कुटुंबाला सर्व सुखसोयी देऊ शकले असते; परंतु त्यांनी समाजाचे देणे लागतो ही जाणीव ठेवून सगरोळीसारख्या दुर्गम भागात शिक्षणाचा दीप प्रज्वलित केला आणि अनेकांचे आयुष्य घडविले. बाबासाहेबांमध्ये ऋजुता, साधेपणा




आणि निरागसता होती. कोणताही दिखाऊपणा नव्हता. लहान मुलांप्रती त्यांना विशेष प्रेम होते. मुलांमधील निरागसता ओळखून त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य त्यांच्या शिक्षणासाठी समर्पित केले. ही संस्था म्हणजेच बाबासाहेबांचे जिवंत रूप आहे, असेही त्यांनी नमूद केले. यावेळी मंत्रोच्चारात बाबासाहेब देशमुख यांच्या पुतळ्याचे अनावरण व बाबांच्या जीवनावर प्रकाश टाकणाऱ्या कर्मयोगी बाबासाहेब देशमुख स्मरणिकेचे प्रकाशन झाले.

विद्यार्थ्यांनी बाबासाहेबांचा जीवनप्रवास नाटिकेतून जिवंत केला, यावेळी उपस्थितांमध्ये भावनिक वातावरण निर्माण झाले होते. कार्यक्रमासाठी परिसरातील नागरिक, माजी विद्यार्थी व संस्थेचे हितचिंतक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## श्रीराम जन्मोत्सवानिमित्त भव्य दुचाकी रॅली; हनुमान पेठ ते अशोक नगरपर्यंत भगव्या ध्वजांनी सजणार मार्ग

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २४ मार्च-**

श्रीराम जन्मोत्सवाच्या पार्श्वभूमीवर नांदेड शहरात धार्मिक उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून, या निमित्ताने बजरंग दल, विश्व हिंदू परिषद, मातृशक्ती व दुर्गा वाहिनी यांच्या संयुक्त विद्यमाने भव्य दुचाकी रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे. गुरुवारी, (ता.२६) सकाळी ८.३० वाजता ही रॅली पार पडणार असून, शहरातील विविध भागांतून हजारो दुचाकीस्वार या रॅलीत सहभागी होणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली आहे.

शहरातील श्री पंचवटी हनुमान मंदिर, हनुमान पेठ येथून रॅलीची सुरुवात होणार असून, महावीर चौक मार्गे प्रमुख मार्गांवरून संचलन करत श्रीराम मंदिर, अशोक नगर येथे रॅलीचा समारोप होणार आहे. रॅलीदरम्यान संपूर्ण मार्ग भगव्या ध्वजांनी सजविण्यात येणार असून, जय श्रीरामच्या घोषणांनी वातावरण दुमदुमणार आहे. फलक आणि घोषवाक्यांच्या माध्यमातून धार्मिक संदेश देण्यात येणार आहे. या दुचाकी रॅलीसाठी आयोजकांकडून व्यापक नियोजन करण्यात आले आहे. सहभागी दुचाकीस्वारांनी शिस्त राखत रॅलीत सहभागी व्हावे आणि वाहतूक नियमांचे काटेकोर पालन करावे, अशा सूचना देण्यात आल्या आहेत. रॅलीदरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी स्वयंसेवकांची नियुक्ती करण्यात आली असून, मार्गावर विविध ठिकाणी नियंत्रण पथके तैनात राहणार आहेत. पोलिस प्रशासनाशी समन्वय साधून वाहतूक व्यवस्था सुरळीत ठेवण्यासाठी विशेष नियोजन करण्यात आले आहे. या उपक्रमाच्या माध्यमातून श्रीरामाच्या आदर्शांचे स्मरण करून समाजात शिस्त, संस्कार, बंधुभाव आणि राष्ट्रप्रेमाचा संदेश देण्याचा उद्देश असल्याचे आयोजकांनी स्पष्ट केले.



विशेष म्हणजे, मातृशक्ती व दुर्गा वाहिनीच्या महिला कार्यकर्त्यांचाही या रॅलीत उत्स्फूर्त सहभाग राहणार असून, महिलांचा सहभाग ही या उपक्रमाची ठळक बाब ठरणार आहे. महिला व मुलींना यावेळी मोफत भगवे फेटे बांधण्यात येणार आहे. रॅलीच्या मार्गावर विविध ठिकाणी नागरिकांकडून स्वागताची तयारी सुरू असून शहरातील नागरिकांनी या दुचाकी रॅलीत सहभागी व्हावे असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

# यशोदा हॉस्पिटल सिकंदराबाद येथे बेसल सेल कार्सिनोमा कॅन्सरवर मात

**भा वृतसेवा**
**ंदेड, दि. २४ मार्च-**

यशोदा हॉस्पिटल हे कर्करोगाच्या ादानापासून ते उपचारापर्यंत अत्याधुनिक वा प्रदान करते येथे कार्यरत तज्ञ डॉक्टर हे र्करोग स्टेजिंग सिस्टमचा वापर करतात. ट्यूमरचा आकार, लिम्फ नोडचा सहभाग ाणि कर्करोग पसरला आहे की नाही ासारख्या घटकांचे मूल्यांकन करतात ानंतर उपचारांची दिशा ठरवून उपचार ले जातात अशी माहीती सिंकदराबाद थील यशोदा कॅन्सर ईन्सिटीट्यूटचे डीकल ऑनकॉलॉजी व हिमॅटॉलॉजी भागाचे क्लीनिकल डायरेक्टर डॉ.भरत वासवाणी यांनी दिली




आयोजित पत्रकार परिषेदेत पुढे ते म्हणाले की , माहूर येथील दत्त शिखरावरील गोवर्धन मठाचे प्रमुख गोवर्धन बापू बन यांना गेल्या २ वर्षी पूर्वी अचानकपणे तीव्र पोटदुखी तसेच अपचनाचा त्रास जाणवत होता त्यामुळे त्यांनी नांदेड येथील अष्टविनायक हॉस्पिटलचे संचालक डॉ.अमोल देवसरकर यांच्याकडे तपासणी केली असता डॉ.अमोल यांनी तातडीने त्यांना असलेल्या गंभीर अशा बेसल सेल कार्सिनोमा कॅन्सर बाबत शंका आली त्यावर त्यांनी आढळलेल्या गाठीची बायप्सी केली असता टेस्ट पॉझिटिव्ह आल्यानंतर तातडीने यशोदात कार्यरत वरीष्ठ कॅन्सरतज्ञ डॉ.भरत वासवाणी यांच्याकडे त्यांना रेफर केले.

या कॅन्सर संदर्भात डॉ.वासवाणी यांनी सांगितले की, बेसल सेल कार्सिनोमा म्हणजे एखाद्या व्यक्तीला सूर्यप्रकाशाच्या संपर्कात आल्यावर त्वचेवर होणारा कर्करोगाचा प्रकार. त्यामुळे, बेसल सेल कार्सिनोमा हा गुदद्वाराच्या कर्करोगाच्या दुर्मिळ प्रकारांपैकी एक आहे जो एक अंत्यत वेगाने पसरणारा कॅन्सर आहे त्यामुळे तातडीने उपचार करत रेसेक्शन शस्त्रक्रिया डॉक्टर प्रसाद बाबू व टीम यांनी केली यात गुद्वार ट्यूमर तसेच त्याच्या सभोवतालच्या काही निरोगी ऊतक काढून टाकल्या कारण गुदद्वाराचा कर्करोग शरीराच्या इतर अवयवांमध्ये पसरला नव्हता ही जमेची बाब होती असे त्यांनी नमूद केले असुन यशोदा हॉस्पिटल सिकंदराबाद संदर्भातील अधिक माहीतीसाठी सहाय्यक व्यवस्थापक किरण बंडे ९१५४१६७९९७ किंवा अनिल जोंधळे यांच्याशी ९१५४९ ९५४६३ या क्रमांकावर संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे.

**जाहीर प्रगटन !!**
**तहसिलदार उमरी तथा तालुका दंडाधिकारी उमरी यांचे न्यायालयात इ.कि. फौ. अर्ज.क्र./२०२५**

श्री श्रीमती साहेबराव उत्तम गायकवाड
विरुध्द
ग्राम पंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय रहाटी खु ता. उमरी, जि. नांदेड.
प्रकरण - जन्म/मृत्यू (जन्म) नोंद घेणे बाबत.

ज्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदार नामे साहेगराव उत्तम गायकवाड रा. रहाटी ता.उमरी जि. नांदेड यांनी कार्यालयात हजर राहुन जन्म/ मृत्यू नोंदणी कायदा २०२३ व सुधारी शासन निर्णय दिनांक १२ मार्च, २०२५ अन्वये दिनांक १६/०२/२०२६ रोजी नोंद घेण्यासाठी इ.कि. फौ. अर्ज दि. // रोजी दाखल केला आहे.

अर्जदार यांची मुलगी मयुरी साहेगराव गायकवाड यांचा जन्म दिनांक १२/१०/२०१७ रोजी झाल्याची नोंद मौ. रहाटी खु ता.उमरी जि. नांदेड येथे उपलब्ध नाही.

त्याअर्थी या जाहीर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस व संबंधीतास कळविण्यात येते की, वरील अर्जदार यांच्या जन्माची/मृत्युची नोंद घेण्यासाठी कोणाचा काही आक्षेप अथवा उजर असल्यास त्यांनी लेखी आक्षेप या कार्यालयास सदर जाहीर प्रगटनापासून १५ दिवसाच्या आत सादर करावा, नंतर प्राप्त होणा-या आक्षेपाचा विचार केल्या जाणार नाही १५ दिवसात आक्षेप प्राप्त न झाल्यास सदरच्या अर्जावर एकतर्फी आदेश पारीत करण्यात येईल.

दिनांक-१६/०२/२०२६
स्थळ - उमरी

तहसिलदार उमरी

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# हिंगोली जिल्हा परिषदेच्या १० कोटींच्या अंदाज पत्रकाला मान्यता

## शिक्षणासाठी ९५ लाख तर पाणीपुरवठासाठी १ कोटीचा निधी राखीव



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २४ मार्च**

हिंगोली जिल्हा परिषदेच्या सेस फंडातील १० कोटींच्या अंदाजपत्रकाला प्रशासक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक गायकवाड यांनी मान्यता दिली आहे. या अंदाजपत्रकात शिक्षण विभागासाठी ९५ लाख तर पाणी पुरवठा व स्वच्छता विभागासाठी १ कोटीचा निधी राखीव ठेवण्यात आला आहे. याशिवाय दिव्यांग कल्याणसाठी ५१ लाख रूपये ठेवण्यात आले आहेत.

जिल्हा परिषदेच्या मुख्य लेखा व वित्त अधिकारी दिगंबर माडे यांनी जिल्हा परिषदेच्या सेस फंडातील अर्थसंकल्प सादर केला. यावेळी प्रशासक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक गायकवाड, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी सुधीर ठोंबरे, प्रकल्प संचालक नामदेव केंद्रे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी समृध्दी दिवाने, विजय बोराटे, केशव गड्डापोड, कार्यकारी अभियंता प्रियंका राजपूत, शिक्षणाधिकारी संदीप सोनटक्के, आसावरी काळे, डॉ सखाराम खुणे, अतुल वायसे, उपमुख्य लेखा व वित्त अधिकारी बाबुलाल राठोड यांच्यासह अधिकारी उपस्थित होते.

यावेळी मुख्य लेखा व वित्त अधिकारी माडे यांनी अर्थसंकल्प सादर केला. यामध्ये सन २०२६-२७ या आर्थिक वर्षात सेस फंडातील १० कोटी रूपयांचे अंदाजपत्रक सादर करण्यात आले. यामध्ये इमारत व दळवणवळणासाठी निधी, तसेच शिक्षण विभागासाठी ९५ लाख रूपये, आरोग्य विभागासाठी ९७ लाख रूपये, महिला व बालकल्याणसाठी ३५ लाख रूपये, पाणी पुरवठा व स्वच्छता विभागासाठी १ कोटी रूपये, अनुसूचीत जाती जमाती व इतर मागास कल्याण विभागासाठी ७० लाख रूपये, दिव्यांग कल्याणसाठी ५१ लाख रूपये, कृषी विभागासाठी ४७ लाख रूपये, पशुसंवर्धन विभागासाठी ५५ लाख रूपयांची तरतुद करण्यात आली आहे. यासोबतच पंचायत विभागासाठी ३५ लाख रूपये, जलसंधारण विभागासाठी १५ लाख रूपये, आदिवासी कल्याणसाठी १५ लाख रूपये, मार्ग व पूलासाठी ५० लाख रूपयांची तरतुद करण्यात आली आहे.

जिलहा परिषदेच्या या अंदाजपत्रकास प्रशासक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक गायकवाड यांनी मान्यता दिली आहे. विविध विभागांनी योजनांसाठी दिलेला निधी वेळेत खर्च करावा तसेच वैयक्तिक व सार्वजनिक लाभाच्या योजना हाती घेण्याच्या सूचना यावेळी गायकवाड यांनी सर्व विभाग प्रमुखांना दिल्या.

# विविध मागण्यांसाठी शेतकऱ्यांचा टायर जाळून कनेरगाव-जिंतुर रास्तारोको



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २४ मार्च**

हिंगोली जिल्ह्यात मागीलवर्षी शेतकऱ्यांचे अतिवृष्टीच्या पावसाने मोठ्या प्रमाणावर सोयाबीन व इतर पिकांचे नुकसान झाले यानंतर राज्य सरकारने मोठ पॅकेज जाहीर करून शेतकऱ्यांना दिलासा देण्याचा प्रयत्न केला मात्र राज्य सरकारने घोषित केलेला विमा अद्यापही शेतकऱ्यांना मिळाला नसल्याने शेतकरी रस्त्यावर उतरले होते.

यासह हिंगोली जिल्ह्यांमध्ये अनेक ठिकाणी अवैध गौण खनिज उत्खनन झाल्यानंतर सुद्धा जिल्हाधिकारी यांनी गौण खनिज नियमानुसार भरणा केल्या नसल्याचे तक्रार शेतकऱ्यांनी केली यामध्ये अनेक कंपन्यांनी जिल्ह्यामध्ये अवैध उत्खनन केले व या उत्खननाला जिल्हा गौणखनिज अधिकारी व उपविभागीय अधिकारी तसेच जिल्हाधिकारी यांनी मोठ्या प्रमाणावर आर्थिक गैरव्यवहार केल्याची तक्रार शेतकऱ्यांनी केली. सेनगाव तालुक्यामध्ये आज जवळपास सहा महिन्यापासून कुठलाही रोजगार हमीचे कामे चालू नसल्याने शेतकरी यांनी विहीर गायगोठे व इतर रोजगार हमीची कामे कधी करायचे असा प्रश्न शेतकऱ्यांनी विचार केला

हिंगोली जिल्ह्यांमध्ये सत्तरच्या वर बोगस जैविक पेस्टिसाइड कंपन्या कार्यरत असून यावर जिल्हा कृषी अधीक्षक चकार शब्दही बोलायला तयार नाहीत तसेच कारवाई करायला तयार नाहीत या अनुषंगाने क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे पदाधिकारी तथा शेतकरी यांनी मंगळवारी कनेरगाव जिंतूर महामार्ग हाताळाफाटी या ठिकाणी अडवून टायर जाळले व जिल्हा प्रशासनाचा निषेध व्यक्त केला. यावेळी प्रशासनाच्या वतीने मोठा बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. यावेळी गजानन कावरखे (मराठवाडा अध्यक्ष क्रांतिकारी शेतकरी संघटना), नामदेव पतंगे, सतीश इडोळे, प्रवीण मते, राहुल कावरखे, बबन कावरखे, अशोक कावरखे, दीपक सावके, शांतिराम सावके यांच्यासह मोठ्या संख्येने शेतकरी, आणि सर्व विभागाचे अधिकारी,कर्मचारी उपस्थित होते.

# अनखळी येथील जलजीवन मिशनच्या कामाची तक्रार

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २४ मार्च**



औंढा नागनाथ तालुक्यातील ग्राम पंचायत अनखळी येथे जलजीवन मिशन अंतर्गत पाईपलाईन कामात अनियमितता व धमकी तसेच सरपंच महिला असताना इतर व्यक्तीचा हस्तक्षेप यासंदर्भाचे निवेदन पंचायत समिती कार्यालयामध्ये मंगळवारी (ता.२४) मार्च रोजी देण्यात आले. सदरील निवेदन गटविकास अधिकारी गोपाळ कल्हारे यांनी स्वीकारले.

निवेदनात ग्रामपंचायत अनखळी येथे जलजीवन मिशन अंतर्गत पाईपलाईन खोलीकरण काम करण्यात आले आहे. या कामासंदर्भात गावकऱ्यांच्या माघारी (संमतीचा) ठराव तयार करण्यात आला आहे.परंतु सदर ठरावावर गावकऱ्यांच्या ऐवजी एकाच व्यक्तीने सर्व सह्या केल्या असल्याचा संशय आहे, ही बाब अत्यंत गंभीर असून यामध्ये अनियमितता झाल्याची शक्यता आहे.याशिवाय ग्रामपंचायतीशी कोणताही अधिकृत संबंध नसताना काही व्यक्तींकडून मला व इतर ग्रामस्थांना धमक्या दिल्या जात आहेत व अयोग्य/असभ्य भाषेत बोलले जात आहे. महत्वाची बाब म्हणजे सरपंच महिला आहे. सदर प्रकरणाची सखोल चौकशी करण्यात यावी. बनावट खोट्या सह्या असल्यास संबंधितांवर कायदेशीर कारवाई करण्यात यावी. ग्रामपंचायत कामकाजात अनधिकृत हस्तक्षेप करणाऱ्या व्यक्तीवर तात्काळ कारवाई करण्यात यावी. धमकी देणाऱ्या व्यक्तींविरुद्ध योग्य ती कायदेशीर कार्यवाही करण्यात यावी व ग्रामस्थांना संरक्षण देण्यात यावे. रंगनाथ पांडुरंग संबरकर, बंडु सोपानराव चापके, रंजना संबरकर, सकुबाई संबरकर, कुंताबाई चापके निवेदन देतेवेळी उपस्थित होते.



**हिंगोली- नांदेड परिक्षेत्राचे पोलिस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी मंगळवारी हिंगोली ग्रामीण पोलिस ठाण्याला भेट दिली. यावेळी त्यांनी पोलिस ठाण्याची तपासणी केल्यानंतर पोलिस निरीक्षकांसह कर्मचाऱ्यांचे कौतुक केले. यावेळी पोलिस अधीक्षक डॉ निलाभ रोहन, अप्पर पोलिस अधीक्षक कमलेश मीना, पोनि मोहन भोसले, पोनि श्यामकुमार डोंगरे यांची उपस्थिती होती. छाया- लखन यादव**

## संक्षिप्त वृत्त

### शहीदांना जिल्हाधिकारी कार्यालयात अभिवादन



हिंगोली- येथील जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात शहीद दिन साजरा करण्यात आला. यानिमित्त शहीद भगतसिंग, सुखदेव व राजगुरु यांच्या प्रतिमेस अपर जिल्हाधिकारी महेंद्रकुमार कांबळे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. यावेळी उपजिल्हाधिकारी (सामान्य), अनिल माचेवाड, मनकर्णा जाधव यांच्यासह विविध विभागाचे अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

### लघुलेखन परिक्षा शुल्क प्रतिपूर्तीसाठी अर्ज करा

हिंगोली- शासकीय संगणक टंकलेखक बेसिक कोर्स लघुलेखन परीक्षाशुल्क प्रतिपूर्ती योजनेअंतर्गत लाभ घेण्यासाठी पात्र विद्यार्थ्यांनी अमृत संस्थेच्या अधिकृत संकेतस्थळावर दि. ३० एप्रिल, २०२६ पर्यंत ऑनलाईन पद्धतीने अर्ज करावेत, असे आवाहन अमृतच्या जिल्हा व्यवस्थापकांनी केले आहे. महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत शासकीय संगणक टंकलेखन बेसिक कोर्स लघुलेखन परीक्षा दरवर्षी जून व डिसेंबर महिन्यात ऑनलाईन पद्धतीने आयोजित करण्यात येते. माहे जानेवारी २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या परीक्षेचा निकाल दिनांक १० मार्च २०२६ रोजी जाहीर करण्यात आला आहे. या परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या खुल्या प्रवर्गातील आर्थिक दुर्बल घटकातील अमृताच्या लक्षित गटातील (ब्राह्मण, कायस्थ, कोटी, मारवाडी, पटेल, राजपूत, यलमार, आयगार, राजपुरोहित, पाटीदार, वैश्य, नायर, नायडू, कम्मा, बनिया, बंगाली, त्यागी, सेनगुनथर, गुजराती, ठाकूर, जाट, हिंदू नेपाली, भूमिहार, लोहाणा, कानडी इ.) विद्यार्थ्यांना परीक्षाशुल्क प्रतिपूर्तीचा लाभ देण्यात येणार आहे. यासाठी अर्जासोबत सन २०२५-२६ किंवा सन २०२६-२७ या आर्थिक वर्षातील उत्पन्न प्रमाणपत्र अथवा इडब्ल्यूएस प्रमाणपत्र, राष्ट्रीयत्व व अधिवास प्रमाणपत्र, लक्षित गटातील जात नमूद असलेला शासकीय पुरावा (उदा. टी.सी./एल.सी./शालेय निर्गम उतारा), माहे जानेवारी २०२६ परीक्षेत उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र, बँक खाते तपशीलासाठी पासबुकची प्रत किंवा रद्द केलेला धनादेश आदी कागदपत्रे अर्जासोबत अपलोड करणे आवश्यक आहे. पात्र विद्यार्थ्यांनी निर्धारित मुदतीत आवश्यक कागदपत्रांसह ऑनलाईन अर्ज सादर करून या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन अमृतच्या जिल्हा व्यवस्थापकांनी केले आहे.

### ५५ वाहन चालकांविरूध्द पोलिसांची कारवाई

हिंगोली- अवैध वाहतुक करणाऱ्या तसेच वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या ५५ वाहन चालकांवर पोलिस विभागाच्यावतीने सोमवारी विविध ठिकाणी कारवाई करण्यात आली. या वाहन चालकांकडून ४६ हजार २५० रूपयांचा दंड वसूल केला.

# तरूणांनो व्यसनमुक्त व्हा, नामस्मरणाने जीवन समृध्द होते- प.पू. ओझा

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २४ मार्च**





तरुणांनी तंबाखू, गुटखा, दारू यांसारख्या व्यसनांपासून दूर राहून परमेश्वराचे नामस्मरण करावे, त्यातूनच खरे सुख आणि समाधान मिळते, असे आवाहन प.पू. भाई रमेश भाई ओझा यांनी सोमवारी( ता. २३) रोजी येथे केले.

येथील रामलीला मैदानावर गजराज बाल गणेश मंडळाच्या पुढाकारातून प.पू.भाईश्री रमेश भाई ओझा यांचे १९ ते २५ मार्च दरम्यान श्रीमद भागवत कथेला सुरुवात झाली आहे. हिंगोली येथे सुरू असलेल्या श्रीमद भागवत कथेमध्ये सोमवारी पाचव्या दिवशी ते बोलत होते. यावेळी त्यांनी विशेषतः तरुण पिढीला उद्देशून मार्गदर्शन करत व्यसनांच्या दुष्परिणामांवर प्रकाश टाकला.

तत्पूर्वी, कथेचे मुख्य यजमान म्हणून स्व. मखनलाल गौड यांच्या स्मृती प्रित्यर्थ नंदकिशोर शर्मा हे असून, सोमवारी २३ मार्च रोजी लक्ष्मी लाईफ केअर हॉस्पिटल, अमित हेडा इंदुमती बांगर या दैनंदिन यजमान कडून ग्रंथाची पूजा अर्चना करण्यात आली. भाई यांनी या यजमानाचे पुष्पमाला अर्पण आशीर्वाद दिले.

भाईश्री बोलताना पुढे म्हणाले, आजच्या काळात अनेक तरुण तंबाखू, गुटखा, दारू यांसारख्या घातक व्यसनांच्या आहारी जात आहेत. या व्यसनांमुळे शरीराची प्रकृती बिघडते, मानसिक संतुलन ढासळते आणि आयुष्याचे नुकसान होते. केवळ व्यक्तीच नव्हे, तर संपूर्ण कुटुंब या व्यसनांच्या परिणामामुळे दुःखी होते.

ते पुढे म्हणाले की, व्यसनामुळे माणसाचे आरोग्य, आर्थिक स्थिती आणि सामाजिक प्रतिष्ठा धोक्यात येते. त्यामुळे अशा चुकीच्या सवयींपासून दूर राहणे अत्यंत गरजेचे आहे. व्यसनातून क्षणिक आनंद मिळतो, पण त्याचे परिणाम आयुष्यभर भोगावे लागतात, असेही त्यांनी स्पष्ट केले.

याउलट, भगवंताचे नामस्मरण केल्यास मन शांत होते, विचार शुद्ध होतात आणि जीवनाला योग्य दिशा मिळते. तर नामस्मरणामुळे आत्मिक समाधान लाभते व व्यक्तीचा सर्वांगीण विकास होतो, असे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमादरम्यान उपस्थित भाविकांनीही या संदेशाचे मनापासून स्वागत केले. तरुणांनी व्यसनमुक्त जीवन जगून समाजासाठी आदर्श निर्माण करावा, असे आवाहन शेवटी भाईश्री यांनी केले. यावेळी दहा ते १५ हजार भाविकांनी लक्षनीय हजेरी लावली होती.

श्रीमद भागवत कथेत सोमवारी गोवर्धन पूजेचा पवित्र सोहळा मोठ्या भक्तिभावात पार पडला. यावेळी भगवान श्रीकृष्णांनी आपल्या करंगळीवर गोवर्धन पर्वत उचलून गोकुळातील गोपाळ, गवळणी व संवगाडी यांचे रक्षण केल्याची लीला कथेमध्ये सजीवपणे उलगडण्यात आली.

या प्रसंगी प. पू. भाईश्री रमेशभाई ओझा यांनी गोवर्धन पूजेचे आध्यात्मिक महत्त्व अत्यंत प्रभावीपणे स्पष्ट केले. त्यांनी सांगितले की, संकटाच्या काळात परमेश्वर आपल्या भक्तांचे रक्षण करतो, फक्त त्याच्यावर अढळ श्रद्धा आणि विश्वास ठेवणे आवश्यक आहे.

भाईश्रींनी अनेक संदर्भ, दाखले आणि प्रेरणादायी कथा सांगत भाविकांना भक्ती, श्रद्धा आणि नैतिकतेचा संदेश दिला. गोवर्धन पर्वत उचलण्यामागील तत्त्वज्ञान सांगताना त्यांनी अहंकाराचा त्याग, निसर्गपूजन आणि समाजातील एकतेचे महत्त्व अधोरेखित केले.

# गाव तिथे शाखा उभारणार- विपुल पिंगळे

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २४ मार्च**



युवा सेनेच्या विस्तारासाठी गाव तिथे युवा सेनेची शाखा उभारणार असल्याची माहीती युवा सेनेचे मराठवाडा निरीक्षक तथा राज्य कार्यकारणी सदस्य विपूल पिंगळे यांनी दिली.

हिंगोली येथे युवा सेनेच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांची आगामी जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर झालेल्या बैठकीत ते बोलत होते. यावेळी शिवसेना शिंदे गटाच्या युवासेनेचे जिल्हा प्रमुख राम कदम यांनी त्यांचे स्वागत केले. यावेळी लोकसभा अध्यक्ष दत्ता माने, जिल्हा संघटक संदीप मोरे, उपजिल्हा प्रमुख मयूर शिंदे, वैभव चौधरी, सचिन पेंढारकर, शिवम नाईक, विजय देशमुख, परमेश्वर जाधव, शंकर सावळे, विजय शिंदे, विशाल देशमुख, अशोक इंगळे, व्यंकटेश कऱ्हाळे, शिवराज यशवंते, विशाल ढोर, विनायक सातपूते, दिपक इंगोले, संतोष गोरे, कपील शेवाळे यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी बोलतांना आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीसाठी तरूणांना जास्तीत जास्त संधी मिळणार असून गावातील समस्या, लोकांच्या समस्या, अडचणी दूर करण्यासाठी तसेच पक्षाच्या विस्तारासाठी प्रत्येक कार्यकर्त्याने झोकून काम करावे तसेच महायुती सरकारने राबविलेल्या सर्व योजना सर्वसामान्य नागरिकांपर्यत, लाभार्थ्यांपर्यत पोहोचविण्यासाठी कार्यकर्त्यांनी प्रयत्न करावेत.

# वसमत पाटबंधारे विभागाच्या लिपीकास लाच घेतांना पकडले

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २४ मार्च**



तीन महिन्याचे वेतन देयक तयार करून अधिकाऱ्याची स्वाक्षरी घेतल्याचा मोबदला म्हणून एक हजाराची लाच घेतांना पूर्णा पाटबंधारे विभाग वसमत येथील वरिष्ठ लिपीकास लाचलूचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने रंगेहात पकडले आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहीतीनुसार पूर्णा पाटबंधारे विभागाच्या सिंचन व्यवस्थापन विभागातील एका कर्मचाऱ्याचे जुलै ते सप्टेंबर २०२५ या कालावधीत असलेले वेतन देयक थकीत होते. सदर वेतन देयक देण्यासाठी त्यांनी पूर्णा पाटबंधारे विभागाकडे मागणी केली होती. त्यानुसार पाटबंधारे विभागातील वरिष्ठ लिपीक सलीम अब्दुल अहमद शेख याने त्यांची वेतन देयक तयार करून त्यावर उपकार्यकारी अभियंत्याची स्वाक्षरी घेतली होती. तसेच सदर देयक कोषागार कार्यालयात सादर करण्यात आले होते. या कामाचा मोबदला म्हणून वरिष्ठ लिपीक सलीम शेख यांने एक हजार रूपयांच्या लाचेची मागणी केली होती.

त्यावरून संबंधित कर्मचाऱ्याने हिंगोली येथील लाचलुचपत प्रतिबंधक विभागाशी संपर्क साधून तक्रार दाखल केली होती. या तक्रारीची सोमवारी दुपारी पंचा समक्ष पडताळणी करण्यात आली होती. यामध्ये सलीम शेख याने एक हजार रूपयांची लाच मागितल्याचे स्पष्ट झाले होते. त्यावरून लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे उप अधीक्षक विकास घनवट, पोलिस निरीक्षक राजेश मलपिल्लू, सुलभा राऊत, जमादार भगवान मंडलीक, रवींद्र वरणे, सय्यद युनूस, शेख अकबर, राजाराम फुफाटे, गजानन पवार यांच्या पथकाने वसमत येथील पूर्णा पाटबंधारे विभागाच्या कार्यालयात सापळा रचला होता. ठरल्याप्रमाणे सायंकाळी वरिष्ठ लिपीक सलीम शेख याने एक हजार रूपयांची लाच घेतांना पथकाने त्यास रंगेहात पकडले. याप्रकरणी वसमत शहर पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.